

साप्ताहिक
# माणूस

६ ऑगस्ट ८३/दोन रुपये

# भाजपला झालंय तरी काय ??







## डॉक्टरांच्या घरातली भानामती कशी पकडली ?

दिल्लीत काढली. त्यांना हे ठाऊक असणार-- या महागाईच्या दिवसात पत्रकारांइतकी स्वस्त गोष्ट नाही !

## तिला सांगू नका

मुंबापुरीत जेव्हा गाड्यांचे गोंधळ होतात आणि जुन्या इमारती कोसळायला लागतात तेव्हा खरी पावसाळ्याला सुरुवात होते. आतापर्यंत या दोन आठवड्याच्या अवधीत एकूण सहा इमारती कोसळल्या. त्यात एकूण सतरा माणसे ठार झाली !

चर्नीरोड स्टेशनसमोरची चार मजली सनबीम बिल्डिंग जेव्हा कोसळली त्याच्या दुसऱ्या दिवशी त्या भागात आम्ही गेलो

ढिगाऱ्याखाली सापडून मेलेल्या तिघा जणांची अंत्ययात्रा गिरगाव चर्चमधून निघणार होती. त्यापैकी एक चेरील ॲन नावाची सहावीतली बारा वर्षांची मुलगी, आल्मेडा नावाचा एक रिटायर्ड रेल्वेऑफिसर आणि कस्टममध्ये ऑफिसर असलेला त्यांचा तीस वर्षांचा मुलगा. चेरीलचे आई-वडील दोघेही चर्चमध्ये आलेले. तिच्या वर्गातील सर्व मुलामुलींनी चर्चमध्ये तिच्यासाठी प्रार्थना केली.

आल्मेडाचा धाकटा मुलगा बॉयलसुद्धा चर्चमध्ये होता. भल्या पहाटे इमारत कोसळली तेव्हा तो कपनीत नाइट ड्युटीवर होता. एका मित्राने त्याला फोन करून कळविले की, त्याची बहीण सीरियस आहे

घरी येऊन पहातो तर कुटुंबातील फक्त आई आणि बहीण जिवंत राहिले होते. बहीण करेन जबर जखमी झाली होती. तिला नायर हॉस्पिटलला नेले होते आणि आईची स्थिती बोलण्यापलीकडची होती !

आम्ही नायर हॉस्पिटलला गेलो तोवर करेन शुद्धीवर आलेली होती. काही विचारण्यापूर्वीच तिच्या एका नातेवाइकाने बाजूला घेऊन सांगितले, तिला सांगू नका तुम्ही चर्चमधून आलात ते. तिला अजून वडील आणि भाऊ वारले आहेत हे ठाऊक नाही !

## 'मंगल' शोकसभा

गेल्या बुधवारी शेरीफ एस पी. गोदरेज यांनी घनश्यामदास बिर्लांच्या निधनानिमित्त शोकसभा आयोजित केली होती. आता हे जरा टू मचच झालं हो गोदरेजकाका ! बिर्ला परलोकी जाऊन किती किती दिवस झाले अन् तुम्ही किती उशीरा ही सभा बोलावलीत ? शोक तरी किती ताणून धरायचा ?

खरं तर या शेरीफलोकांना तसं काहीच काम नसत. माणूस मेल्यानंतर दीड दोन महिन्यानी शोकसभा बोलावणं बरोबर नव्हे. मागच्या वेळी रजनी पटेल गेल्यानतर जवळजवळ दोन महिन्यानी त्या वेळचे शेरीफ सुनील दत्त यांनी एक जंगी शोकसभा केली होती. एकदम पॉश !

तशीच ही सभा होती. बिर्ला मातोश्री सभागृह खचाखच भरलेलं सगळं एकदम चकचकीत, झगमगीत ! ही शोकसभा की, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची मीटिंग आहे हेच कळत नव्हतं !

एकूणेक सगळे मारवाडी उद्योगपती दाटीवाटीने बसले होते बरोबर त्यांच्या बायका. झुळूझुळू पातळं. कमरेला चादीचे झुबके. अत्तराचा दरवळ !

बाप्ये सुटाबुटात. काही तलम, जरीकाठी धोतरात. झब्ब्याला सोन्याची बटण. सगळा आब कसा रुबाबदार, दिमाखदार !

भाषणं झक्कास झाली. मुख्यमंत्री वसंतदादा चुकून टाटानाच श्रद्धांजली वाहू लागले. शेजारी खुद्द जे. आर. डी. टाटा गालातल्या गालात हसत होते. सगळं सभागृह हास्यकल्लोळात बुडून गेल. दादा पक्के कॉंग्रेसवाले ! ते कसले खजील होतात ?

त्यांनी आपलं विनोदी भाषण हास्याच्या कारंज्या उडवत-उडवत संपवलं.

महापौर मनमोहनसिंग बेदी यांनीही आपल्या अफाट बुद्धिमत्तेची चुणूक दाखवली. 'मरना तो सामान्य आदमी का धर्म है और बिर्लाजीने वह धर्म निभाया' असं म्हणून त्यानी आपली अतिसामान्य कुवत दाखवली.

रामकृष्ण बजाज यांनी आपला पडेल चेहरा अधिक पडेल करून अतिपडेल आवाजात आपली व बिर्लाजींची किती जवळीक होती हे दाखवलं. लोकानी टाळ्या वाजवल्या सगळे खूष झाले !

एस पी. गोदरेज हे पटेटीच्या मंगल दिवशीसुद्धा न्यू थिएटर्सच्या बगाली नायकासारखा मख्ख चेहरा करून वावरतात असं समजल. याचा प्रत्यय या सभेच्या वेळी आला. त्यानी ही सभा अत्यंत शोकसतप्त चेहऱ्याने चालवली. त्यामुळं झालं काय की, या मंगल प्रसंगाला उगीचच गालबोट लागलं. सगळं कसं आनदात चाललं होतं. गोदरेजसाहेबानी दु:खाचे अधूनमधून झाजर वाजवून बिर्लांची याद दिली !

—विष्णू जयदेव

# सामर्थ्य....जो जो करील तयाचे....

श्री. ग. मा.

१८ जुलै १९८३. म. फुले यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथाला या दिवशी शंभर वर्षे पूर्ण झाली. पुण्याच्या साहित्यपरिषदेत या निमित्ताने सभेचा एक कार्यक्रम योजला गेला होता वक्ते होते प्रा. गं. बा. सरदार आणि वि. म. दाडेकर. दाडेकरानी फुल्यांच्या ग्रंथाची थोडक्यात ओळख करून दिली तर गं. बा. सरदार यानी ग्रंथातील सर्व विचार सध्या लागू पडत असले-नसले तरी फुले यांच्यापासून प्रेरणा घेणे महत्त्वाचे आहे, विभूतिपूजा टाळली पाहिजे असे सांगितले.

शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेला ब्राह्मणांची पुरोहितशाही व सरकारी नोकराचा भ्रष्टाचार कारणीभूत आहे, असे फुले यांचे त्या काळचे प्रतिपादन आहे. सावकारशाहीचा उल्लेख फुले यांनी केलेला आहे; पण या शाहीवर आसुडाचे वळ उठलेले नाहीत याचे एक कारण, बहुसख्य सावकार गुजर-मारवाडी-जैन वगैरे ब्राह्मण नसलेल्या समाजातील होते हे असावे, असेही ग. बा. सरदारांनी आपल्या भाषणाच्या ओघात सूचित केले.

कार्यक्रम आटोपल्यावर पूर्वाश्रमीचे एक कम्युनिस्टविचारी, सध्या इंदिरानुकूल असलेले एक ज्येष्ठ व निवृत्त पत्रकार म्हणाले : शरद जोशी सध्या यापेक्षा वेगळे काय सांगत आहेत ?

शरद जोशींच्या विचारांची-चळवळीची महाराष्ट्राला सर्वप्रथम ओळख करून देणाऱ्या 'योद्धा शेतकरी' या विजय परुळकर-लिखित पुस्तकाच्या शेवटी, मलपृष्ठावर ठळकपणे शरद जोशीचे पुढील विधान छापण्यात आलेले आहे. शरद जोशी म्हणतात-

'शेतकऱ्यांचे शोषण न होता जलद आर्थिक विकास होऊ शकतो हे सिद्ध करण्यासाठी हा लढा आहे. महात्मा फुले यांनी शेतकऱ्याच्या आसुडाविषयी जे सांगितले त्यामध्ये व आज मी जे काही सांगतोय त्यामध्ये काहीही फरक नाही. फक्त फुल्याच्यानंतर हा विचार प्रथमच पुढे येत आहे आणि मी तो अर्थशास्त्रीय परिभाषेत मांडतो आहे.

'एक ऐतिहासिक महत्त्वाचा लढा आपण लढतो आहोत यामधून जगाच्या आर्थिक जडण-घडणीला नवी दिशा मिळणार आहे.'

म. फुले याची शिकवण राज्यकर्त्यांनी नेहमी डोळ्यासमोर ठेवावी, त्यांच्यापासून स्फूर्ती व प्रेरणा घ्यावी म्हणून मुंबईच्या नव्या विधानभवनासमोर म फुले याचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आलेला आहे. स्वातंत्र्यानंतरचे, आपले महाराष्ट्रातील राज्यकर्ते तरी बहुसंख्येने शेतकरी समाजातून पुढे आलेले आहेत. तरी शेतकरीसमाज मात्र फुल्यांच्या काळात होता त्यापेक्षा अधिक उध्वस्त व कर्जबाजारी झालेला आहे.

शरद जोशींची शेतकरी-चळवळही सध्या पूर्ण थंडावलेली आहे.

शेतकऱ्यांच्या एकाही चळवळीला, बंडाला आजवर आपल्याकडे पूर्णपणे यश का आले नाही ?

तिकडे चीनमध्ये शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारा माओ यशस्वी ठरतो. शेतकऱ्याची दैन्यावस्थेतून, कर्जबाजारीपणातून मुक्तता करतो. इकडे विनोबांची भूदान-चळवळ अल्पयशी, नक्षलवादी पराभूत, शरद जोशी-रुद्राप्पा-चरणसिंग यांची परागती, असे का ?

□

एक काळ माओच्या अतिगौरवाचा होता. सध्या माओचे अवमूल्यन सुरू आहे ही दोन्ही टोके सोडली तरी माओने ग्रामीण चीनचा कायापालट घडवून आणला, शेतकऱ्यांचे दैन्य घालविले, चीनला कर्जबाजारीपणातून मुक्त केले, याबाबत शंका घ्यायला जागा नाही. मराठीत पंधरा-वीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले आर. के. पाटील यांचे चीनवरचे पुस्तक पहा किंवा अगदी अलीकडचे नारगोळकरांचे. या दोन्ही व्यक्ती चीनमध्ये प्रत्यक्ष जाऊन आलेल्या. सर्वोदयी विचाराच्या. यांनी माओ-क्रांतीचे यश आणि अपयश दोन्ही बाजू दाखवलेल्या आहेत. शेतकऱ्यांची परिस्थिती पूर्वीपेक्षा खूपच सुधारली आहे असे त्यांनी मनमोकळेपणाने मान्य केलेले आहे. कुसुम नारगोळकराच्या पुस्तकाला दादा धर्माधिकारी यांची प्रस्तावना आहे. दादांनी लिहिले आहे : "चीनच्या शेतकऱ्यांचे आणि शेतमजुरांचे क्रांतिपूर्व काळातील अत्यंत खडतर आणि हलाखीचे जीवन आणि क्रांतीनंतरचे त्यांचे त्यामानाने किती तरी सुखाचे जीवन यांच्यातील तफावत अंतःकरणाला स्पर्श करते. चीनमध्येही क्वचित आळशी व कामचुकार लोक असतील; पण बेकारी, उपासमार व भीक याचा मागमूसही नाही ही गोष्ट साम्यवादी क्रांतीची जमेची बाजू आहे. तिची वास्तविकता व महत्त्व ही कुठल्याही सहृदय माणसाला मुग्ध करण्यासारखी आहे. ( आम्ही पाहिलेला चीन कुसुम नारगोळकर, पृष्ठ ६)

अशी माहिती अलीकडे येत आहे की, माओनंतरचे राज्यकर्ते माओने स्थापन केलेल्या कम्युनपद्धतीत हळूहळू बदल करीत आहेत. खाजगी शेतीला मर्यादित प्रमाणात प्रोत्साहन देण्याची त्यांची दृष्टी आहे जेथे खाजगी मालकी व्यवस्था पूर्वीपासूनच आहे त्या तैवानमध्ये किंवा युद्धोत्तर दक्षिण कोरियामध्ये शेती-शेतकऱ्याची प्रगती खूपच आहे त्यामानाने माओचा किंवा माओ-नंतरचा चीन मागेच आहे, हे खरे आहे. पण भारतापेक्षा चीन पुढे आहे, तेथील ग्रामीण-शहरी जीवनाचा आर्थिक सामाजिक-सांस्कृतिक स्तर आपल्यापेक्षा उंचावलेला आहे यात शंका नाही. अजून भारत खतांची आयात करतो आहे, परक्या देशांवर अगदी प्राथमिक गरजांसाठीही आपण अद्याप अवलंबून आहोत. चीनमध्येही ग्रामीण भाग सोडून शहरात गर्दी करण्याची प्रवृत्ती आहे; पण आपल्यासारख्या झोपडपट्ट्या, भिकाऱ्यांच्या रांगा तेथे नाहीत. नुकतेच आपल्याकडील प्रकाशकांचे एक शिष्टमंडळ चीनला भेट देऊन आले. या शिष्टमंडळाचे एक सभासद कृष्णा कृपलानी ( दिल्ली ) यांनी चीनमध्ये त्यांना सहज जे दृष्टोत्पत्तीस आले ते एका पत्राद्वारे प्रसिद्ध केलेले आहे मूळ पत्र 'टाइम्स ऑफ इंडिया' ( १२ जुलै १९८३ ) या अंकात आलेले आहे. त्याचे हे पुण्याच्या 'श्रमिक विचार' या दैनिकाच्या २० जुलै अंकातील भाषांतर-

## कृपलानींची साक्ष

'नुकतीच मी चीनला भेट देऊन आलो. भारतातील प्रकाशकांचे एक शिष्टमंडळ भारत सरकारतर्फे चीनला पाठविण्यात आले होते, त्यात माझाही समावेश होता. चिनी सरकारतर्फे अशा शिष्टमंडळाला निमंत्रण दिले गेले होते. पंधरा दिवसांच्या आमच्या दौऱ्यात आम्ही बीजिंग, चेंग डू, शांघाय आणि कॅन्टन या शहरांना भेटी दिल्या. चिन्यांचे आदरातिथ्य भरपूर होते; परंतु कुठेही भपका नव्हता. चिनी लोक मला अत्यंत मैत्रीपूर्ण वाटले, तसेच मनमोकळे आणि चांगल्या रहाणीमानात रस असलेले वाटले. जपान्यांसारखेच चिन्यानाही निसर्गाचे वेड आहे. त्यांना निसर्गाच्या सान्निध्यात रहाण्याची आवड आहे. आम्ही ज्या ठिकाणी रहात होतो तेथे किंवा अन्य ठिकाणीही दूरान्वयाने देखील माओच्या तत्त्वज्ञानाने आमचे 'ब्रेन-वॉशिंग' करण्याचा प्रयत्न केला गेला नाही किंवा चीनच्या पुरातन संस्कृतीच्या बढायाही कुणी मारल्या नाहीत. माझे सहकारी जे व्यवसायाने प्रकाशक होते ते चीनमधील प्रकाशकांशी संपर्क साधण्यात गुंतले होते. मी मात्र चीनमधील रस्त्यांवरील देखावे पहाण्यात गर्क होतो. भारतासारखेच चीनमधील रस्तेही माणसांनी भरून वाहात असतात. उलट भारतापेक्षा चीनमधील रस्त्यांवर माणसांची गर्दी जास्तच वाटली. आम्ही ज्या ज्या ठिकाणी भेटी दिल्या त्या त्या ठिकाणी माणसाच्या समुद्रातून वाट काढावी लागत होती. लहान-थोर, तरुण-वृद्ध हातात हात घालून, हसत-खिदळत, कधी आइस्क्रीम खात किंवा रस्त्यातून सरबत किंवा कोला पिताना दृष्टीस पडत असत. सर्वांचे वेष जवळजवळ सारखेच होते. पँट आणि कोट बहुधा निळ्या, हिरव्या किंवा गडद रंगाचा. बायका आणि पुरुषाचे वेष सारखेच असल्याने ओळखता येणे कठीण जात होते. चेहरेपट्टीवरून किंवा केसाच्या ठेवणीवरून ओळखणे भाग पडायचे. मला सर्वांत प्रकर्षाने काय जाणवले असेल तर श्रीमंती आणि गरिबी असे परस्पर विरोधी दृश्य मला कुठेही दिसले नाही. मी खूप प्रयत्न करूनही पंधरा दिवसांत मला एकही भिकारी कुठे दिसला नाही ! भुकेले चेहरे आणि कृश शरीरे जशी कुठे आढळली नाहीत तसेच श्रीमंती आणि भपकेबाज कपडे केलेली माणसेही कुठे दिसली नाहीत. आपल्या देशात मात्र हे दृश्य सर्रास दिसते, ही जाणीव झाली. अर्थात मी जे पाहिले ते सर्व वरवरचे होते. त्यांची आंतरिक दुःखे काय आहेत हे कळण्यास काही मार्ग नव्हता; पण एक गोष्ट स्पष्ट दिसली की, अशी जरी काही वैयक्तिक दुःखे असली तरी ती घरी ठेवून ते बाहेर पडले

असावेत. कुणा परदेशीय माणसाला दाखविण्यासाठी मुद्दाम आयोजित केलेली ही दृश्ये नव्हती, तर ती नेहमीचीच होती.

'सिनेमाची पोस्टर्स, नाटकाच्या जाहिराती किंवा नृत्याच्या जाहिरातीत कुठेही अश्लीलता किंवा उघड्या अंगाचे प्रदर्शन दिसले नाही. तरुण मुले-मुली जरी खेळकर आणि आनंदी दिसली तरी सार्वजनिक ठिकाणी चुंबन घेणे, मिठ्या मारून प्रेम व्यक्त करणे असे जे प्रकार पाश्चिमात्य देशात नेहमी पहायला मिळतात ते चीनमध्ये कुठेही दिसले नाहीत. मी जगातील अनेक देशाना भेटी दिल्या आहेत; परंतु चिनी स्त्रियाइतक्या आकर्षक स्त्रिया मला कुठेही आढळल्या नाहीत आणि ते सुद्धा फॅशनेबल कपडे, दागिने किंवा स्नो-पावडरी किंवा इतर सौंदर्यप्रसाधने न वापरता चिनी स्त्रिया नुसत्याच आकर्षक नाहीत तर त्या कार्यक्षम आहेत हॉटेल्स, रेस्टॉरन्ट, दुकाने, लिफ्टमधील कामे स्त्रिया करतातच; परंतु टॅक्सी चालवणे, बस-ड्रायव्हर म्हणूनही अनेक स्त्रिया कामे करीत आहेत हे सगळे करून कुटुंबातही बडदास्त ठेवणेही चालूच असते. चिनी स्त्रिया अत्यंत नम्र आणि आकर्षक असल्या तरी भडक अजिबात नाहीत. इंग्लंड-अमेरिकेतील स्त्रिया जी कामे करतात ती सर्व चिनी स्त्रिया करतात, त्यांच्यासारख्या रस्त्यातून भटकत मात्र नाहीत.

'मी जे काही पाहिले ते गांधीजींनी पाहिले असते तर त्याना ते खचितच आवडले असते. खरोखर ज्या देशात एकही मनुष्य उपाशी नाही, एकही विंध्या त्यालेला नाही आणि ज्या देशात प्रत्येक मनुष्य सर्व जण सारखे असल्याने ताठ मानेने वावरतो आहे, असा देश म्हणजेच गांधीजींच्या कल्पनेतील रामराज्यच ! चिनी लोक त्याला फार तर माओ राज्य म्हणतील. कारण ते देवावर विश्वास न ठेवणारे आहेत. मात्र आम्ही एका बुद्ध मंदिरात गेलो असताना बुद्धाच्या प्रचंड मूर्तीपुढे शेकडो लोक गुडघे टेकून प्रार्थना करीत असताना दिसले.

'चीनमध्ये मी जे पाहिले त्यामुळे मी फार प्रभावित झालो आणि मला रवींद्रनाथ टागोरांच्या गीतांजलीमधील ओळी आठवल्या.

'मी येथून जाताना शेवटला निरोप म्हणून शब्द उच्चारावे ते हेच की जे मी पाहिले आहे ते अगदी निरुपम-अगदी अप्रतिम आहे!'
□

## मार्क्स–लहान शेतकरी

लहान शेतकरी क्रांती करू शकत नाही असे मार्क्सचे मत होते. अशा शेतकऱ्याचे जीवन फार अलग अलग असते, परस्परसंबंध त्याच्यात कमी असतात, गरजा स्वयंपूर्ण उत्पादनपद्धतीने भागवल्या जात असल्याने समान हितसंबंधांचे एकीकरण होऊन विशाल व व्यापक वर्गीय ऐक्याची भावना त्यांच्यात निर्माण होत नाही. जमिनीच्या लहान लहान तुकड्यावरचे त्यांचे प्रेम फार तर 'पितृभू' (मार्क्सचा शब्द) या देशभक्तिपर जाणिवेपर्यंतच उत्क्रांत होऊ शकते असे मार्क्स म्हणतो. या संदर्भात मार्क्सने शेतकरी समाजस्थितीला बटाटयाच्या पोत्याची उपमा दिली. 'या लहान जमीनधारक शेतकऱ्यामधले परस्परसंबंध फक्त स्थानिक स्वरूपाचे असतात, त्यांच्या हितसंबंधाच्या एकजिनसीपणातून वेगळा समाजघटक, समान राष्ट्रीयत्वाचा बंध किंवा राजकीय संघटना अस्तित्वात येत नाही म्हणून त्याचा एक वर्ग बनलेला नसतो.' म्हणून अशा विखुरलेल्या शेतकरी समाजाचा, जरी हा समाज बहुसंख्य असला तरी प्रभाव पडत नाही, असे मार्क्सने आपल्या 'लुई बोनापार्टची १८ वी ब्रुमेअर' या पुस्तकात लिहिले आहे; पण माओने मार्क्सचे हे मत चुकीचे ठरवून दाखविले. विखुरलेल्या शेतकरी समाजालाच त्याने मोठ्या प्रमाणात संघटित करून चीनमध्ये क्रांती घडवून आणली. शेतकऱ्याच्या ठिकाणी स्वाभाविक असलेल्या दो बिघा जमिनीच्या प्रेमाचे त्याने पितृभूप्रेमात विकसन केले आणि वर्गविग्रहाचाही कौशल्याने उपयोग करून घेतला. स्वदेशप्रीती आणि समता या दोन्ही भावनाचा मेळ घातल्यामुळे माओला यश मिळाले एडगर स्नो हा माओ चीनवर लिहिणारा अलीकडचा पहिला महत्त्वाचा लेखक. माओचे हे वैशिष्ट्य त्यानेही हेरले होते. त्या अगोदर चीनमध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी तिसऱ्या इंटरनॅशनलतर्फे गेलेले मानवेंद्रनाथ रॉय यानाही माओ हा राष्ट्रवादी नेता' आहे असेच प्रकर्षाने जाणवलेले होते. आणखी एक चीन अभ्यासक, लिओनेल मॅक्स चॅसिन, आपल्या 'द कम्युनिस्ट कॉक्वेस्ट ऑफ चायना' या ग्रंथात लिहितो– Mao cleverly appealed to the insticts of social justice and propritorship which are so strong in the human heart. Mao knew how to make his soldiers dedicated workers for a powerfnl China, a respected China where justice,truth and peace would reign '( China Readings–II p. 297) म्हणजे समर्थ चीनचे, जगात मान असलेल्या देशाचे, शांतता आणि न्याय यांची शाश्वती असलेल्या नवसमाजाचे स्वप्न माओने चीनी शेतकऱ्यासमोर ठेवले, त्याच्या स्वार्थालाही खतपाणी घातले आणि त्याला नवचीन उभारणीचा ध्येयवादही शिकवला. 'जगातील कामगारानो–एक व्हा ' या मार्क्सवादी स्वप्नापेक्षा हा स्वप्नवाद वेगळा आहे. राष्ट्रवाद येथे नाकारला गेलेला नाही उलट राष्ट्रीय प्रेरणेचा आधार घेतला गेलेला आहे. असा आधार नसता तर शेतकरी आणि कामगारच नाही तर लहान कारखानदार, मध्यमवर्ग या सर्व घटकाना एकत्र करण्यात माओला जे यश लाभले ते लाभलेच नसते. चॅक–के–शेखची भ्रष्टाचारी राजवट हे जसे माओविजयाचे एक कारण होते, तसेच हे


सुमारे ३५० दिवाळी अंकातून निवड केलेल्या उत्तम साहित्याचा ग्रंथ.

**अक्षर दिवाळी-१९८२** / मूल्य रु. ४८

संपादक– प्रा य दि. फडके, प्रा. स शि. भावे, प्रा. गो. म. कुलकर्णी अरुणा ढेरे व प्रा अंजलि सोमण

मूळ मूल्य रु. ४८/ ३०-९-८३ पर्यंत सवलतीचे मूल्य रु. ३६

**अक्षर दिवाळी–१९८१** / मूल्य रु ४०

**अक्षर दिवाळी–१९८०** / मूल्य रु. ३५

- दि. ३०-९-८३ पर्यंत तीनही ग्रंथ घेणारास रु. ९०/– फक्त व पोस्टेज माफ
- एकाच पत्त्यावर किमान तीन प्रती मागवणारास पोस्टेज माफ
- १९८२ च्या दहा प्रती घेणारास रु. ३३०/– फक्त व पोस्टेज माफ

आपल्या मागणीची रक्कम मनिऑर्डरने अगर पुणे बँकेवरील ड्राफ्टने धाडा

**विश्वकर्मा साहित्यालय** २०३५ सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे-३०

व्यापक राष्ट्रीय ऐक्यही; ही सर्व वर्गांची एकजूटही महत्त्वाची ठरली.

हे ऐक्य ही एकजूट आपल्याकडे पहिल्यापासूनच नाही फुले आणि टिळक एकत्र आले नाहीत सावरकर आणि आंबेडकर यांचे जमले नाही कम्युनिस्ट पक्ष राष्ट्रीय प्रवाहापासून दूर राहिला आणि राष्ट्रीय प्रवाहाला सामाजिक आर्थिक समतेचे महत्त्व जाणवले नाही. विनोबानी एकदम ' जय जगत ' म्हटले व नक्षलवाद्यानी ' माओ आमचा चेअरमन ' अशी चक्क राष्ट्रद्रोही घोषणा केली! साम्राज्यवादविरोधी लढा आणि समानताशील विकासतंत्र याची माओने योग्य ती सांगड घातली, म्हणून आपल्यापेक्षा माओला अधिक भरीव यश प्राप्त करून घेता आले. आपण लोकशाही स्वातंत्र्याची बूज अधिक राखली हे खरे आहे; पण स्वातंत्र्याला सामर्थ्याची जोडही द्यावी लागते. तिसऱ्या जगतात भारतापेक्षा चीनचा आवाज आज अधिक ताकतवान आहे हे नाकारण्यात अर्थ नाही. क्रीडाक्षेत्रापासून अणुविज्ञानापर्यंत चीन आज आपल्या पुढे आहे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री शुल्टझ भारतात येऊन दादागिरी करून जाऊ शकतात. आंतरराष्ट्रीय कर्ज काढल्याशिवाय आपल्याला मागील कर्जावरचे व्याजही भागवता येत नाही. चीन असा परावलंबी, कर्जबाजारी नाही. दुष्काळ, महापूर चीनमध्ये आजही आहेत भ्रष्टाचार, कामचुकारपणा, कम्युनिस्ट राजवट आली की संपतो असेही नाही; पण चीनचे अग्रक्रम आपल्यापेक्षा अधिक पायाशुद्ध होते. चीनने प्रथम खेडीपाडी सुधारली, लोकाना काम दिले, संरक्षणस्थिती मजबूत केली आणि मागाहून जागतिक शांततेची कबुतरे उडवली. सावरकरांचे, गांधीजीचे थोडे तरी, वेळच्या वेळी ऐकले असते त्याप्रमाणे धोरणे आखून ती अंमलात आणली असती तर १९६२ मधली चीनकडून झालेली फजिती टाळता आली असती. पराभव समजू शकतो. माघार–चढाई हेही प्रकार युद्धात चालतात. पण रस्ते नाहीत, सैन्याला गरजेच्या वस्तूंचा पुरवठा नाही, गाफीलपणा हा चुकीच्या तत्त्वज्ञानाचा, दुबळ्या राजनीतीचाच परिणाम होता. नेहरूनी गांधीचेही ऐकले नाही आणि सावरकरांना तर ते मानतच नव्हते! संरक्षणाकडे दुर्लक्ष आणि स्वावलंबी, स्वयंपूर्णतेकडे नेणाऱ्या नियोजनाचाही अभाव नेहरूवाद चीनने दिलेल्या एकाच धक्क्याने कोसळला! या धक्क्यातून नेहरू शेवटपर्यंत वर आले नाहीत. पंचशील आणि जागतिक शांतता हवी; पण पराभूताच्या तोंडी हे शांतिमंत्र शोभून दिसत नाहीत नेहरूमुळे लोकशाही जिवत राहिली; पण पराभववादालाच एक विकृत प्रतिष्ठाही मिळत राहिली. या पराभववादातून आपले हे राष्ट्र प्रथम वर यायला हवे ही मानसिक किंवा सांस्कृतिक क्रांती येथे प्रथम घडून यायला हवी. याशिवाय शेतकऱ्याचे दारिद्र्य असो, राष्ट्रीय एकात्मता असो किंवा नियोजन असो आपले कुठलेच प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. हा देश आपला आहे, तो वैभवाकडे नेण्याची जबाबदारी आपली आहे असे मानणाऱ्या सर्वांची भक्कम एकजूट आणि लोकांना काम मिळेल असे पायाशुद्ध नियोजन, ही आजची गरज आहे द्वेषभावना न वाढवता ही गरज पुरी करता येणे शक्यही आहे खोटा–भाबडा आशावाद आणि फाजील निराशावाद दोन्ही टोके यासाठी सोडली पाहिजेत. ' सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।। हा रामदासी पुरुषार्थमंत्र अशा काळासाठीच आहे. अवताराची वाट पाहत बसण्यात काय अर्थ आहे ? □

मुक्ताफळे

# सावधान! दुहेरी निष्ठा वाढत आहे!

जनता पक्षाची सत्ता का गेली ? पक्ष का फुटला ? कारण एकच–समाजवादी विचारवंत–मधु लिमये यांनी संशोधित केलेली दुहेरी निष्ठा ! जनता पक्षाच्या बुरख्यात शिरलेला एक पक्ष जनता पक्षाशी निष्ठा आहे असे म्हणतो आणि रा. स्व. संघाशीही संबंधित राहतो याचा अर्थ काय? पक्ष फोडू पण दुहेरी निष्ठा चालू देणार नाही. फोडला–पक्ष फोडला ! नशिबाने लाभलेले सिंहासन फोडले. पण दुहेरी निष्ठा चालू दिली नाही !

निष्ठा कशी पाहिजे ? इकडून उचलून तिकडे नेता आली पाहिजे. आमचे निळूभाऊ लिमये नागरी संघटनेचे निष्ठावंत सेवक. परवा शरद काँग्रेसमध्ये डेरेदाखल झाले. निष्ठा आहे तशीच शाबूत. फक्त इकडची तिकडे. मधू लिमये–लोकदलात गेले; पण निष्ठा अभंग! लोकदलातून हाकलले तरी निष्ठा जशीच्या तशी राहणार! आपआपल्या निष्ठेचे बोचके डोक्यावर घेऊन सध्या मंडळी पक्ष शोधीत हिंडत आहेत. मोहन धारिया इंदिरा काँग्रेसमधे उडी मारतील, नाही तर शरद काँग्रेसमध्ये; पण निष्ठेसह! या मंडळीनी थोडी निष्ठा इकडे, थोडी तिकडे, असे कधीही केलेले नाही, हे लोकानी लक्षात घ्यावे. यापैकी कुणावरही एकाच वेळी दोन ठिकाणी निष्ठा ठेवण्याचा आरोप तुम्हाला करता येणार नाही!

बरं, आपल्यावर जनसंघाने थोडीशी निष्ठा ठेवल्याने एवढा मोठा जनता पक्ष फुटला, याचा पश्चात्ताप संघवाल्यांना व्हावा की नाही ? पश्चात्ताप शून्य! बाकी त्यांना पश्चात्ताप होणे कठिणच म्हणा. मध्यप्रदेशाचे त्या वेळचे मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल यांनी एकदा त्या वेळचे संघप्रमुख श्री. गुरुजी याना म्हटले–

' जनसंघपर संघ का प्रभुत्व है । '

यावर श्री. गुरुजीनी शुक्लजीना स्पष्ट सांगितले–

" संघ के विचारोंका प्रभाव मात्र जनसंघ पर ही नही, तो कॉंग्रेससहित सभी राजनीतिक दलों पर भी हो, यही हमारी इच्छा है ! वह अत्यंत हितकर होगा ! "

हे काही आम्ही केलेले संशोधन नाही. पहा पृष्ठ २५९ ' आरती आलोक की ' लेखक : हरि विनायक दात्ये. हिटलरचे आत्मवृत्त ' माइन काम्फ ' युरोपात आणि जगात राजकीय पुढाऱ्यांनी आणि लोकांनी नीट वेळी वाचलेच नाही. म्हणून दुसरे महायुद्ध सुरू होईपर्यंत हिटलर काय कर-

णार आहे याबद्दल लोक भ्रमात राहिले. सर्व पाश्चात्य विचारवंत आता हे मान्य करतात की,आमची चूक झाली.आमचे म्हणणे येथील विचारवंत तीच चूक करीत आहेत. वस्तुत: जनतापक्षाच्या निर्मीतीपूर्वी किती तरी वर्ष श्री. गुरुजींनी रविशंकर शुक्लांना हे सर्व सांगितले होते. प्रसिद्ध झालेले होते; पण अभ्यास कमी पडला आणि जनता पक्ष स्थापन करतानाच हे दुहेरीनिष्ठेचे प्रकरण पक्षात आले. मधू लिमयांनी जनता पक्ष स्थापन झाला तेव्हाच सर्वांना सांगायला हवे होते–हे बघा, दत्तावरही निष्ठा–रामावरही निष्ठा हे चालणार नाही ! थोडी निष्ठा रामावर ठेवत जा. दत्तात्रयाच्या आरतीत घुसलात तर दत्ताभोवतालची 'कुत्री'अंगावर सोडू ! कारण जनसंघावर संघाचा प्रभाव आहे हे श्री. गुरुजींनाही मान्य होते ! पण इतके वाचन करून नेमके आवश्यक ते वाचन कमी पडल्याने तेवढा गोंधळ झाला !

पण दुर्दैवाची गोष्ट अशी दिसते की, श्री गुरुजींना जे 'हितकर ' वाटत होते तसेच काही घडत चालले आहे. खासदार आबासाहेब कुलकर्णी–शरद कांग्रेसची तोफ–परवा धडाडली. १७ जुलैला सांगली येथे बोलताना त्यांनी वार्ताहरांना सनसनाटी बातमी दिली-

' अलीकडील काही घटनांचा विचार करता श्रीमती गांधी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ( अर्थात जातीयवादी शक्ती वगैरे ) यांची हातमिळवणी होत आहे असे दिसते. **जो हिंदूंचा पक्ष उचलून धरील त्याच्या पाठीशी उभे राहण्याचे संघाचे धोरण आहे.'**

खासदार आबासाहेबांनी परमगुह्य म्हणून जे सांगितले, त्याचा अर्थ इंदिरा कांग्रेसवर रा. स्व. संघाचा प्रभाव पडत चालला आहे असा होतो आणि ज्या अर्थी प्रभाव पडतो, त्या अर्थी इंदिरा कांग्रेसमध्ये दुहेरी निष्ठेची लागण झाली की काय असा आम्हाला संशय येतो ! म्हणजे आतापर्यंत मुसलमान,ख्रिश्चनांची गठ्ठा मते घेऊन, हिंदूंच्या हितसंबंधांचा लिलाव करण्याचे तंत्र आणि यंत्र आता नादुरुस्त झाले की काय ? हिंदुहिताप्रमाणे वागला नाहीत, तर मते मिळणार नाहीत असे आता मुसलमानांप्रमाणे हिंदूही बजावू लागले, असा यावरून तर्क करता येतो.

अरेरे ! काय हे देशाला दुर्दिन येत आहेत! म्हणजे यापुढे खासदार आबासाहेबांना ही हिंदुहिताविरुद्ध वागून हिंदूंचीच मते मिळण्याची संधी दुरापास्त होणार! आबासाहेब हिंदूंचा पक्ष उचलून धरायचा नाही म्हणजे नेमके काय करायचे असते ते तुम्ही कधी सांगणार ? सध्या सावरकर–जन्मशताब्दिवर्ष चालू आहे. हिंदुंचा पक्ष राजकारणात उचलून धरण्याचे पहिले पाप ज्या सावरकरांनी केले त्या सावरकरांनी हिंदूंकरता जास्त काय मागितले, याचा अभ्यास आबासाहेबांनी आताच सुरू करावा, म्हणजे पुढच्या निवडणुकीत त्यांना भाषणे करताना उपयोग होईल. आणि आबासाहेब, इंदिरा कांग्रेसचे या दुहेरी निष्ठेने जे काय वाटोळे व्हायचे ते यथावकाश होणारच आहे. **तुम्ही मात्र** शरद कांग्रेस पक्ष हिंदु हिताचा कधीही पाठपुरावा करणार नाही याची काळजी घ्या! कारण ही दुहेरी निष्ठा कालांतराने शरद कांग्रेसमधेही उपटण्याचा संभव आम्हाला दिसतो आहे.

–ग्यानबा

## ललित मुंबई

# पंचतारांकित समाजसेवा

पी. यू. सी. एल. ची सभा आटोपून घरी परतताना बराच उशीर झाला. स्टेशनवर उतरून घरचा रस्ता धरला, तेव्हा रीतसर रात्र झाली होती. मर्क्युरी दिव्यांनी काळोखाला थोडी–फार भोकं पाडून प्रकाश पाडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. पावसाला मात्र उसंतच नव्हती. पायाशी बऱ्याच उंचीपर्यंत लगट करणारं गलिच्छ पाणी रस्त्यावर साचलं होतं. रस्त्यावरच्या रहदारीत मात्र कमतरता नव्हती. बी. इ. एस. टी. च्या बसगाड्या, टॅक्सी, रिक्षा, खासगी वाहनं आणि रहदारीच्या नियमांना आव्हान देत मध्येच चुकीच्या दिशेनं येणारा एखादा सायकलवाला.

मध्येच दोन बसगाड्या ' मारू किंवा मरू ' अशा आवेशात रोरावत आल्या. जेमतेम दहा-बारा फूट रुंदीचा रस्ता. त्याच्या उजव्या बाजूला बसेस नांगरून पडलेल्या आणि डाव्या बाजूचा पूर्ण पदपथ पदपथ–निवाश्यांनी अडवलेला. शिवाय त्याच्याही पुढे येऊन रस्त्याची निम्मी रुंदी त्यांनी आणि त्यांच्या चीजवस्तूंनी अडवलेली आहेच. शिर आणि पगडी सलामत ठेवायला आता जावं तरी कुठे असा विचार करत मी डावीकडे वळले' तेवढ्यात तिथे चाललेल्या तीन अंकी स्वतंत्र, सामाजिक, कौटुंबिक, प्रक्षोभक नाटकाचा अर्थात भांडणाचा रंग भलताच चढलेला. गावठी दारूचा भपकेदार वासही मनाला सुरकुत्या पाडणारा. (हे मन अर्थातच मध्यमवर्गीय, पांढरपेशी, इत्यादी इत्यादी)

निम्म्या रस्त्याच्या पदपथावर झोपड्या आहेत. वळणावर वाहनं अधिक धोकादायकपणे अंगावर येतात. त्या पदपथावर सार्वजनिक, अनौपचारिक आणि ओपन–एअर स्वच्छतागृहं आहेत. इथेही परत पदपथावरून चालायचं तर मनाला सुरकत्या आणि नाकालाही. (कारण तेही मध्यमवर्गीय आणि पांढरपेशी ! )

पाच मिनिटांचा रस्ता. गर्दीची वेळ नाही, त्यामुळे पंधरा मिनिटांच्या अल्प कालावधीतच कापून झाला तेव्हा कुठे पी. यू. सी. एल. च्या सभेत शिकवलेले माणुसकी, भूतदया–नाही. दया नव्हेच, दुसऱ्याच्या हक्काची जाणीव, उदारमतवाद वगैरे धडे गिरवायला घ्यायला मला फुरसत मिळाली.

पा. यू. सी. एल. च्या सभेला जाताना मी

ठरवलं होतं, की आपण आपले रीतसर प्रभावित होऊ या आणि त्यांचं म्हणणं पटवून घेऊ या. पी. यू सी. एल. नंच मुंबईच्या पदपथ–निवाशांसाठी सुप्रीम कोर्टात अर्ज दाखल केला होता आणि झोपडपट्टी पाडण्याबाबत कोर्टाचा मनाई हुकूम मिळवला होता. 'इंडिया टुडे 'नं म्हटलं होतं की, झोपडपट्टी पाडण्या–न पाडण्याच्या प्रश्नावरून मुंबईत सध्या वादळ उठलं आहे त्यामध्ये इंग्रजी वृत्तपत्रं, समाजकार्यकर्ते आणि नागरी स्वातंत्र्यवाल्या निरनिराळ्या संस्थांनी झोपडपट्टी न हटवण्याची भूमिका (अर्थातच उदार आणि माणुसकीपूर्ण) घेतली आहे, तर मराठी वृत्तपत्रं आणि 'कॉन्झर्वेटिव मिडल क्लास 'नं त्याच्या विरुद्ध.

आता स्वत: होऊनच स्वत:ला 'कॉन्झर्वेटिव मिडल क्लास 'मध्ये सामील करायला कोण तयार होईल ? म्हणून तर मी ठरवलं होतं की, आपण अधिक उदारमतवादी विचार-प्रणालीनी प्रभावित होऊन टाकू या.

पी. यू सी. एल चे अध्यक्ष–सिरवई, संस्थेचा दृष्टिकोन स्पष्ट करत होते. 'झोपडपट्टी न उठवणं हेच माणुसकीला धरून आहे. झोपडपट्टी पाडणं हे 'विकेड अँड इल-लीगल' आहे.' विकेड वगैरे म्हटल्यावर मला वाटलं की, असं काही असेल, तर मग आपण बुवा पी. यू सी. एल च्या बाजूचे. इतके काही आपण दुष्ट नाही. पुढे त्यांनी स्विफ्टची एक गोष्ट सांगितली हा जोनाथन स्विफ्ट म्हणजे भयाण आणि चमत्कारिक लिहिण्याबद्दल प्रसिद्ध आहे. आयर्लंडमध्ये दुष्काळ पडला तेव्हा त्यानं लिहिलं होतं की, माणसानी आपली मुलं खावीत म्हणजे अन्नसमस्या सुटेल ! शिवाय लोकसंख्या कमी झाल्यामुळं दुष्काळाची तीव्रताही कमी होईल ! केवळ मुंबईला पेलत नाही म्हणून झोपडपट्टी पाडावी हा उपाय या दुष्काळावरच्या उपायासारखाच आहे, असं जेव्हा सिरवईंनी सांगितलं, तेव्हा अंगावर एक जबरदस्त शहारा येऊन मी ठरवलं की, असलं पाप नको रे बाबा आपल्या डोक्यावर !

सिरवईंनंतर बोलायला उठले सभेचे प्रमुख वक्ते राम जेठमलानी. त्यांना तर काय, जाहीर सभातून बोलणं, नाट्यपूर्ण वाक्यं टाकणं, भावनापूर्ण काळीजहलवी भाषणं करणं हे फारसं कठिण दिसलं नाही. राजकीय सभांमधून बोलणाऱ्या माणसाला लोकांना कसं जिंकाव, त्याची मनं कशी वळवावीत याचा भरपूर सराव असतोच. जेठमलानींच्या भाषणात आपण एखाद्या राजकीय पक्षाची निवडणूक प्रचारसभा तर ऐकत नाही ना असा सारखा भास होत राहिला. झोपडपट्टीबद्दलचा हा दृष्टिकोन घेण्यात पी. यू. सी. एल. नं जेपींचा वारसा खऱ्या अर्थानं पुढं चालवला आहे असं ठासून सांगितलं. आता त्यांच्याकडे खास जेपींचा संदेश असल्यावर आपण तरी काय बोलणार ?

## सगळं लोकशाहीला धरूनच

जेठमलानी सांगत होते, कोर्टात असं ठरलं की रस्ता हा 'पासिंग' आणि 'रिपासिंग' साठीच वापरला गेला पाहिजे. (आता हे खरं म्हणजे मला पटलं होतं; पण त्यांचं पुढचं म्हणणं ऐकल्यावर माझे डोळे कसे खाडकन् उघडले ! ) पण हे 'पास–रिपास' होणार कोण ? ज्यांना कुठं तरी जायचंय तेच. ज्यांना आपल्या घरी किंवा पंचतारांकित हॉटेलात जायचं आहे, तेच रस्त्यावरून पास–रिपास होणार ज्यांना बिचाऱ्यांना कुठंच जायचं नाही, ज्यांना जायला जागा नाही, ते त्या रस्त्यावर फिरफिर फिरणार आणि अखेर तिथेच भोवंडून पडणार! ते तुमच्याकडे मागताहेत हक्क. तोही त्या रस्त्यावर जगायचा नव्हे तर मरायचा !

मी अर्थातच भारावून इतरांबरोबर टाळ्या वाजवल्या. रस्त्यावर चालत मी तरी पंचतारांकित हॉटेलमध्ये जात नसेन; पण घरी जाण्याचा अपराध तर मी करते ना. माझं घर–चक्क मालकीहक्काचा टू रूम–किचनचा ब्लॉक. ज्याचे हप्ते मी कित्येक वर्षे भरत रहाणार आहे किंवा माझं घर म्हणजे कौलारू गळक्या चाळीतल्या, रंग उडालेल्या एक किंवा दोन खोल्या. काही असो, कितीही पडकं, विटकं असो, आहे खरं घर मला. त्यात आणखी वाईट म्हणजे मी योग्य ते सारे करही भरते. पाणी, आरोग्य, दिवाबत्ती. एखाद्या महिन्यात विजेचं बिल भरायचं राहिलं, तर पुढच्या महिन्यात येणाऱ्या लाल नोटिसमुळे मला झोप येत नाही, आपली वीज तोडतील की काय म्हणून. आयकर, जर काही भरायचा असलाच तर माझ्या उत्पन्नातून मुळी 'अॅट सोर्स' कापला जातो. छे. छे, मी एक घर असणारी, कर भरणारी, या शहराची अधिकृत नागरिक. कोण हा माझा गुन्हा ! मी शहराच्या त्या ५१% लोकसंख्येपैकी नाही, ज्यांच्या स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेवर हल्ला झाला आहे आणि सभेतले वक्ते बजावून सांगताहेत, की या परिस्थितीला मी कारणीभूत आहे. आता हे खरं म्हणजे मला माहीत नाही; पण ते म्हणतात म्हणजे असलं पाहिजे.

या माझ्या अपराधाबद्दल मला प्रायश्चित्त हे मिळालंच पाहिजे. मी घरात राहते, कर भरते, याबद्दल मला रस्त्यावरून जाण्यायेण्याचा अधिकार मिळता कामा नये. कधी गेलेच, तर अरुंद रस्त्यावर वाहनाच्या वर्दळीत सापडून मरण्याचा अधिकार मात्र मिळेल ! स्वच्छता आणि सुरक्षितता याना माझ्या घराजवळ फिरकू दिलं जाणार नाही. यामुळं माझ्या, माझ्या शेजाऱ्याच्या, आमच्या मुला-बाळांच्या आरोग्याला बाधा आला तरी बेहत्तर. भुरट्या चोऱ्या झाल्या, तर मी ते संपत्तीचं समान वाटपच समजलं पाहिजे आणि एखाद्या रात्री उशीरा घरी परत यायचं तर मी माझं जीवित–वित्त–अब्रू ही धोक्यात ठेवलीच पाहिजे !

त्यातून या शहराचं सौंदर्य वगैरे अवास्तव कल्पना माझ्या मनात असतील, तर मग हे परमेश्वरा, मला क्षमा कर. मी काय करते आहे, हे मला कळत नाही. पी. यू. सी. एल. च्या जॉइंट सेक्रेटरी दर्शना भोगीलाल म्हणतात, 'आम्ही काही असं म्हणत नाही; की या माणसांना फ्लोराफाउंटनला बस्तान ठोकू द्या; पण मी म्हणते, 'त्याला तरी काय हरकत आहे ? केवढी तरी जागा आहे. त्यात पसरिचासाहेबानी पेडेस्ट्रियम प्लाझा केल्यापासून तिच्यात भरच पडली आहे. नाही तरी सध्या तिथे कार पार्किंग लॉट आहे श्रीमंताना गाड्या ठेवायला मिळाव्यात आणि गरिबाना रहायला जागा मिळू नये हा काही न्याय नाही. तिथे बऱ्याच पदपथवासीयांची सोय लावता येईल. विधानभवनासमोर बरीच जागा आहे, तेव्हा जोतिबा फुल्यांच्या पुतळ्याच्या आजूबाजूला झोपड्या उठवता येतील. मैदानं, बागाही शिल्लक आहेतच. हे सारं लक्षात घेतलं, तर आहेत त्याची सोय लावून वर आणखीही काही जणांना आमंत्रित करता येईल. सौंदर्य, स्वच्छता, मोकळी हवा, खेळ, बागा, मैदानं, शोभा यासारख्या राजेशाही गोष्टींची अपेक्षा

भारतासारख्या गरीब देशानं करावी म्हणजे काय ?

आणि आमचे सन्माननीय नगरसेवक या बाबत योग्य ती काळजी घेतीलच– की या सर्व झोपडपट्टया उठल्या पाहिजेत त्यांना पाइप फोडून, तारा तोडून पाणी–वीज मिळाली पाहिजे. निवडणुकीत हमखास एकगठ्ठा मत देणाऱ्या या झोपडपट्टया म्हणजे नगरसेवकांची वतनं. मग त्या झोपडपट्टीमध्ये एखाद दुसरा, नगरसेवकाशी थेट संधान ठेवून असणारा दादा, त्याच्या हाताखाली दुय्यम दर्जाच्या दादांचं एक टोळकं आणि मग त्यांच्या हाताखालची फुटकळ गुंडांची फौज, त्यांनी केलेली पदपथवासियांची आणि अ–पदपथवासियांची अडवणूक आणि पिळवणूक. योग्य वेळी योग्य ठिकाणी पोचणारे हप्ते. आहाहा, सत्तेचं विकेंद्रीकरण, शासनाचं सुरळीतपण आणि नोकरशाहीची तत्परता असे लोकशाहीत अभिप्रेत असणारे सारे गुण इथं कसे साकार झाले आहेत ! त्यातून कोणी म्हणाला, की या झोपडपट्टया म्हणजे सामाजिक दुर्गुण आणि गुंडगिरीचे अड्डे बनले आहेत; तर महनीय वक्ते सांगणार, पंचतारांकित हॉटेलात याहून अधिक गुंडगिरी भरलेली आहे !–मला काय, मी आपली अधिकृत कॉन्झर्वेटिव मिडल क्लासमधली नागरिक. गुंडगिरीशी माझा संबंध ती सहन करण्यापुरताच ! तेव्हा पंचतारांकित हॉटेलमधली उच्चभ्रू गुंडगिरी कदाचित माझ्यापर्यंत पोचत नसली, तर ही दादागिरी सहन करणं हे लोकशाही न्यायाला धरूनच आहे !

सभेनंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला म्हणजे गुंडाळण्यात आला. एकानं विचारलं, झोपडपट्टीवासी इथले अधिकृत नागरिक नव्हेत. करदाते नव्हेत. महापालिकेचे कर्मचारीही नव्हेत. त्यांच्या रहाण्याची व्यवस्था करावी यात महापालिका–शासनाचा काय संबंध आहे ?–त्याला उत्तर मिळालं, तर मग तुम्ही सांगा तसं पालिका-आयुक्तांना !

दुसरा एक उठून म्हणाला, मी सिविल इंजिनियर आहे.स्वस्तातल्या झोपडया बांधायला तीनशे रुपये किंवा त्याहून कमी खर्च येईल हा तुमचा दावा मला अमान्य आहे. साधी, पण सुरक्षित, टिकाऊ घरं बांधायला याहून केवढा तरी अधिक खर्च येईल आणि तुम्ही म्हणता तशी ती गोष्ट थोडया खर्चात आटोपणार नाही.–त्याला सांगण्यात आलं, क्षुल्लक तांत्रिक बाबीवर कसला वाद घालता हो ! '

तिसरा माणूस म्हणाला, पदपथावर येऊन रहाणाऱ्या माणसांना घटनेनं कुठंही फिरण्याचे, कुठंही राहण्याचे, सार्वजनिक मालमत्तेचा ताबा मिळवून तिचा वापर करण्याचे हक्क दिलेले आहेत मग मला आणि माझ्या सह-नागरिकांना स्वच्छता आणि सुरक्षितता यांचे अधिकार नाहीत वाटतं दिलेले ?–त्याला आधीच्या भाषणात दिलेलंच उत्तर परत देण्यात आलं. अधिक सामाजिक दुर्गुण पंचतारांकित हॉटेलात असतात. तरीही त्यांचं समाधान झालं नाही. तेव्हा त्याला सांगण्यात आलं, गप्प बसा! तुम्ही प्रश्न विचारत नाही, भाषण करताहात ! पीपल्स यूनियन फॉर सिविल लिबर्टीजच्या या सभेमध्ये एक माणसाचं बोलण्याचं नागरी स्वातंत्र्य चक्क असं हिरावण्यात आलं !

□

पी. यू. सी. एल. नं आजपर्यंत किती तरी चांगली कामं केली आहेत. यापुढेही ते अशी कामं निश्चित करणार आहेत. एका प्रश्नावरची विशिष्ट बाजू घेतली म्हणजे विश्वासार्हता संपली असं होत नाही झोपडपट्टी न उठवणं यात एक मानवतावादी प्रश्न आहे. तसं एक तार्किक कारणही आहे, की मुंबईच्या आर्थिक जीवनात त्यांना स्थान आहे; पण हे दोन्हीही संकुचित दृष्टिकोनातले विचार झाले, की ज्यात वस्तुस्थितीचा संपूर्ण विचार नाही. मुंबईतली किंवा प्रगत औद्योगिक शहरातली अनधिकृत वस्ती हा एकदाच निर्माण झालेला प्रश्न नाही. तसा तो असता तर कदाचित सध्याच्या पदपथवासियांची सोय लावून तो सुटला असता ;पण इथे रोजच असे आगंतुक येतात, हा तर रोजचाच प्रश्न आहे. नव्यानं झोपडपट्टी वाढू नये म्हणून काही उपाययोजना कोणी सुचवतं आहे का ? ज्याला त्याला आपल्या घराजवळ कामधंदा मिळावा हे तत्त्वतः योग्य आणि व्यवहार्य देखील आहे. तर मग या शहराच्या कॅन्सरसारख्या अवास्तव वाढीबद्दल हा हळवेपणा का ? इथली झोपडपट्टी शाबूत ठेवण्यापेक्षा, खेडोपाडी उद्योगधंदे पोचावेत, रोजगार–योजना पोचाव्यात आणि त्यातला भ्रष्टाचार कमी व्हावा म्हणून आपला जोर खर्च करणं हे अधिक इष्ट नाही काय ?

बघू या आता कोर्टाचा निर्णय काय लागतो ते घोडा-मैदान जवळच आहे. नाही तरी मुंबईतील सारी मैदानं, बागा, अगदी महालक्ष्मीचं घोडा-मैदानसुद्धा, हात पसरून, नवनव्या पाहुण्यांच्या स्वागताला सज्ज आहेतच !

–ललिता बर्वे



# इंदिरा गांधींचा हिंदुत्वाचा नवा बुरखा भाजपला खच्ची करण्यासाठीच !

अभय गोखले

जनता पक्षातून जनसंघगट फुटून निघाल्यावर निर्माण झालेल्या भारतीय जनता पक्षाने निवडणुकांत नेत्रदीपक नाही तरी इतर पक्षाच्या (विरोधीपक्ष) मानाने चांगली कामगिरी करून लोकांच्या आशा वाढवल्या होत्या. भाजपला पर्यायी विरोधी पक्ष म्हणून नव्हे तरी एक भविष्यकाळातील आशास्थान या समजुतीने लोक त्याला नावाजत होते अटलबिहारी वाजपेयी, अडवाणी, सिकंदर बख्त, जेठमलानी यांच्यासारख्या राष्ट्रीय स्तरावरील लोकप्रिय व उदारमतवादी नेत्यांमुळे भाजप चांगली प्रगती करत होता. आपली जातीयतावादी, हिंदुत्ववादी अशी तथाकथित प्रतिमा बदलण्यात वरील नेत्यामुळे भाजपला बऱ्याच प्रमाणात यशही मिळाले होते. मुसलमान, दलितवर्ग हा भाजपकडे आकर्षित होऊ लागला होता, याचा प्रत्यय निरनिराळ्या निवडणुकात येऊ लागला होता. भाजपच्या निरनिराळ्या राष्ट्रीय स्तरावरील व राज्यस्तरावरील समित्यामध्ये अल्पसंख्याकांना पुरेसे प्रतिनिधित्व प्रथमच मिळत असल्याचे जाणवत होते. अशा प्रकारे आपल्यावरील कट्टर हिंदुत्ववादी असा मारण्यात आलेला शिक्का पुसट करण्याची जाणीव भाजपमध्ये निर्माण होऊन त्यायोगे समाजातील सर्व थरातील लोकापर्यंत पोचण्याचा प्रयत्न तळमळीने चालू होता.

हिमाचलप्रदेश विधानसभेच्या निवडणुकांत एका प्रखर आत्मविश्वासाने भाजप उतरला तो कोणत्याही विरोधी पक्षाशी तडजोड न करता एकटयाने इंदिरा कांग्रेसला लोळवण्याच्या इराद्यानेच. भाजपच्या नेत्यांनी आपल्या प्रयत्नात कोठेही कसूर न ठेवता जोरदार प्रचार केला व हिमालयप्रदेशात सत्ता काबीज करण्याचे त्यांचे प्रयत्न फक्त ५ ते ६ जागांच्या फरकाने हुकले. जनसंघाने १९७२ च्या विधानसभा-निवडणुकात पाचच जागा मिळवल्या होत्या, तर त्याचेच मोठे रूप धारण केलेल्या भाजपने चक्क २९ जागा काबीज केल्या त्या ६८ सदस्यांच्या हिमाचल-विधानसभेत ! त्याच वेळेस हरयाणातही भाजपला चांगले यश मिळण्याची संधी होती; परंतु त्यानी लोकदलाशी युती केल्याने त्यांचा परंपरागत मतदार त्यांना दुरावला व ९० सभासदाच्या हरयाणा विधानसभेत भाजपचे सात जण निवडून आले. अर्थात ही त्यांची कामगिरीही फारशी निराशाजनक नव्हती. केरळमध्ये रा. स्व. संघाच्या कामगिरीमुळे भाजपला त्याचा काही फायदा मिळेल असे वाटले होते. तसा तो त्यांना मिळाला ही; परंतु एकाच वेळेस इंदिरा कांग्रेस आघाडी व मार्क्सवादी कम्युनिस्ट आघाडी या दोन आघाड्यांशी लढण्याची पाळी भाजपवर आल्याने त्यांच्या बहुतेक उमेदवारांना आपली अनामत रक्कम गमवावी लागली ! तरीसुद्धा संपूर्ण केरळमध्ये भाजप ही एक शक्ती आहे हे मतदारांना माहीत झाले. मात्र भाजपच्या बहुतेक उमेदवारांची अनामत रक्कम जप्त होण्यामागे मोठे कारण होते ते मार्क्सवादी व इंदिरा कांग्रेस यांच्या युद्धात निर्णायक क्षणी रा. स्व. संघाने आपले वजन इंदिरा कांग्रेसच्या पारड्यात टाकल्यानेच, भाजप तर फारसे यश तेथे (केरळात) मिळवू शकत नव्हता हे ध्यानात आल्यावर इंदिरा कांग्रेसपेक्षा कम्युनिस्टांना आपले नंबर एकचे शत्रू मानणाऱ्या रा. स्व. संघाने केरळात सत्ता काबीज करण्यास इंदिरा कांग्रेसला मदत केली हा इतिहास आहे. अटलबिहारी वाजपेयी व इतर भाजपच्या उदारमतवादी नेत्यापेक्षा इंदिरा गांधी या जास्त हिंदुत्ववादी आहेत असे काही रा. स्व. संघवाले खाजगीत बोलतात त्याला काही तरी संगती आहे. हिमाचलप्रदेश, हरयाणा, केरळ, प. बंगाल या विधानसभाच्या निवडणुकांत एखाद्या राज्याचा अपवाद वगळता समाधानकारक यश मिळवणाऱ्या भाजपने मग पोटनिवडणुका जिंकण्याचा सपाटा लावला. इतका सपाटा की, भाजपमधले कट्टर रा. स्व. संघवादी त्या यशाने हुरळून जाऊन यापुढे भाजपने इतर कोणत्याही विरोधी पक्षाशी निवडणुकात तडजोड न करता एकटयाने इंदिरा कांग्रेस विरुद्ध मैदानात उतरावे व हळूहळू सत्ता काबीज करण्याचे वेळापत्रक तयार करावे असे बोलू लागले. बिहारमध्ये एक, महाराष्ट्रात लोकसभेची एक, गुजराथेतील विधानसभांच्या तीन पोटनिवडणुका भाजपने जिंकल्या. बिहारमधील जागा तर राखीव मतदारसंघातील होती. गुजराथेत १९८० च्या निवडणुकांत ९ जागा मिळवणाऱ्या भाजपने आपली सख्या बारावर नेऊन ठेवली ! त्याचे नेते व माजी मंत्री मकरंद देसाई पोटनिवडणुकीत निवडून आले. इतके दिवस इंदिरा कांग्रेसला विरोधी पक्ष म्हणून गुजराथेत टक्कर देणाऱ्या जनता पक्षाला (संघटना कांग्रेस) भाजपने या तिन्ही निवडणुकात तिसऱ्या क्रमांकावर ढकलले. जनता पक्षाशी कोणतीही तडजोड न करता इंदिरा कांग्रेसशी जोरदार टक्कर देऊन भाजपने कित्येक ठिकाणी जनता पक्षाची ताकद आपल्याकडे खेचून गुजराथेत आपणच क्रमांक दोनचा पक्ष आहोत हे सिद्ध केले. राजकोट महानगरपालिका काबीज करणाऱ्या भाजपने अहमदावाद, सुरत, बडोदा या महानगरपालिकांत जनता पक्षापेक्षा चांगली कामगिरी केली.

मध्यप्रदेशात तर भाजपने कमालच केली. प्रथम सागर (राखीव) येथील लोकसभेची जागा इंदिरा कांग्रेसकडून हिसकावून घेतली. शिवाय विधानसभेच्या दोन जागा इंदिरा कांग्रेसकडून खेचल्या व शेवटी कहर म्हणजे परंपरागत जबलपूरची लोकसभा पोटनिवडणूक

जिकून इंदिरा कॉंग्रेसला तेथे मोठा धक्का दिला. जबलपूरमध्ये नेहमीच इंदिरा कॉंग्रेसची कामगिरी चांगली होत असे. अर्थात भाजपचा या नेत्रदीपक यशामध्ये इंदिरा कॉंग्रेसमधील अंतर्गत लाथाळीची मदत होती याकडे भाजपच्या नेत्यांनी दुर्लक्ष केले व विधानसभेच्या निवडणुका आता घेतल्यावर आम्ही इंदिरा कॉंग्रेसला मध्यप्रदेशात चारी मुंड्या चीत करू अशा डरकाळ्या ते फोडू लागले. इकडे जनता पक्ष, लोकदल, समाजवादी कॉंग्रेस व कम्युनिस्ट यांची कामगिरी निराशाजनक होत असताना भाजप पुढे सरकत होता. कम्युनिस्टांनी बंगाल, केरळ व त्रिपुरात नेत्रदीपक कामगिरी केली; पण बाकी ठिकाणी त्यांची पीछेहाट होत होती. जनता पक्षामध्ये नेहमीची कुरबूर चालू होती, तर लोकदल, चरणसिंगांच्या हटवादी भूमिकेने विघटनाच्या उंबरठ्यावर उभे होते. शरद पवारांची समाजवादी कॉंग्रेस महाराष्ट्रापुरती मर्यादित राहिली होती. या पार्श्वभूमीवर भाजपने आपल्या यशाने हुरळून जाणे स्वाभाविकच होते. भाजपचे नेते एका दिलाने काम करत होते. रा. स्व. संघवाले बिथरले नव्हते, सर्व नेत्यांच्या विचारात एकवाक्यता दिसत होती. कोणी वेगळे मत नोंदवण्यासाठी जनता व इंदिरा कॉंग्रेसप्रमाणे वृत्तपत्राकडे धाव घेत नव्हता. भाजप ( जनसंघ ) व कम्युनिस्ट यांची या बाबतीतील शिस्त वाखाणण्यासारखी आहे. यशासारखे दुसरे यश नाही असे म्हणतात ! भाजपच्या यशामुळे वाजपेयींना जास्त वाव मिळाला होता व स्वतंत्रपणे निवडणुका लढवायच्या का आघाडी करून या बाबतीत पक्षात दोन गट पडूनही वाजपेयींच्या मध्यममार्गी भूमिकेस सर्वांनी एकमताने पाठिंबा दिला होता. या प्रश्नावरून भाजपत फूट पडेल म्हणून आशाळभूतपणे नजरा लावणाऱ्यांची भाजपच्या नेतृत्वाने व कार्यकर्त्यांनी निराशा केली होती आणि कर्नाटक व आंध्रच्या निवडणुका जाहीर झाल्या. इंदिरा गांधी आपल्या या बालेकिल्ल्यांमध्ये ताकदीची चाचपणी करत होत्या. कर्नाटकात गुंडूराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी धुमाकूळ घातल्याने तेथे जनता इंदिरा कॉंग्रेसवर नाराज होती तर आंध्रमध्ये सतत मुख्यमंत्री बदलण्याने तेथील जनतेच्या मनात आपल्यावर अन्याय होत असल्याची सल तयार झाली होती. आंध्रमधील तेलगू जनतेच्या प्रादेशिक भावनांना खतपाणी घालण्याचे अचूक काम तेथील लोकप्रिय नट एन. टी. रामाराव यांनी केले. या दोन्ही निवडणुकात भाजपची परिस्थिती काय होती ? कर्नाटकात असंतुष्ट इंदिरा कॉंग्रेसी नेते रंगारप्पा यांनी अर्स यांनी स्थापन केलेल्या कर्नाटक क्रांतीरंगा या प्रादेशिक पक्षाचा ताबा मिळवला होता. जनता पक्षाने आपली स्थिती सुधारण्याकरिता (आपण सत्तेवर येऊ असे जनता पक्षाला त्या वेळेस स्वप्नातही वाटत नव्हते.) क्रांतीरंगाबरोबर आघाडी केली. जागावाटपाच्या बाबतीत फिसकटल्याने भाजप या आघाडीच्या बाहेर राहिला. भाजपचे त्या वेळचे सर्वेसर्वा अध्यक्ष सुब्बया (कर्नाटक प्रदेश अध्यक्ष) आघाडीच्या विरुद्ध होते. भाजपने जनता पक्षाशी कोणत्याही प्रकारची हातमिळवणी न करता एकट्याच्या हिंमतीवर निवडणूक लढवावी असे त्यांचे रा. स्व. संघाप्रमाणे मत होते. आज त्यांची भाजपमधून हकालपट्टी झाल्यावर ते रा. स्व. संघावर तोंडसुख घेत आहेत; पण इतके वर्षे ते कधीही रा. स्व. संघाविरुद्ध एक चकार शब्दही बोलले नव्हते ! सुब्बया हे भाजपचे (जनसंघ) फार जुने कर्नाटकातील नेते. विधानपरिषदेतील भाजप गटाचे नेते. इतके वर्षे भाजप (जनसंघ) त्यांच्याच नेतृत्वाखाली कर्नाटकात फुलला व वाढीस लागला. गुंडूराव व इतर कॉंग्रेसी नेत्यांची तथाकथित भ्रष्टाचारप्रकरणे त्यांनीच प्रथम चव्हाट्यावर आणली; परंतु निवडणुकापूर्वी काही दिवस त्यांच्या निरनिराळ्या वक्तव्यावरून भाजपतील कट्टर रा. स्व. संघीयांना ते स्वामीप्रमाणे डोईजड होत आहेत असे वाटायला लागले. मग निवडणुकांत तिकिट देण्यात वाटप करताना सुब्बयांच्या माणसांना खड्याप्रमाणे बाजूला सारून कट्टर रा. स्व. संघीयांना जास्त तिकिटे देण्यात आली तेथेच सुब्बया व रा. स्व. संघ यांच्या पहिला खटका उडाला ! नंतर सुब्बयांचे काय झाले ते शेवटी पाहू या.

## भाजपचा धक्का

कर्नाटकात भाजपने एकला चलो रे धोरण स्वीकारल्यावर आंध्रमध्येही तोच मार्ग पत्करला. आंध्रमध्ये इंदिरा कॉंग्रेसला टक्कर देण्यासाठी तेलगूदेशम, जनता, भाजप, लोकदल, कम्युनिस्ट यांची आघाडी करण्याचे प्रयत्न झाले; परंतु एन. टी. रामाराव या विरोधी पक्षांची ताकद ओळखून असल्याने व त्याला स्वतःच्या ताकदीबद्दल विश्वास असल्याने त्याने या पक्षांना अपमानकारक जागा देऊ केल्या व ही आघाडी फिसकटली. तरीही नंतर एन. टी. रामारावने फक्त भाजपशी वेगळा करार करून त्यांना २३ जागा देऊ केल्या होत्या; परंतु त्या वेळेस एन. टी रामाराव व तेलगुदेशम कोणीच नव्हते त्यामुळे त्यांच्यासारख्या मागे इतिहास नसलेल्या प्रादेशिक पक्षाकडून विधानसभेच्या एकंदर २९४ जागांपैकी फक्त २३ जागाच मिळवणे भाजपसारख्या अखिल भारतीय पक्षाला अपमानकारक वाटले. शिवाय भाजप हा एकच पर्याय असे ओरडणाऱ्या त्यांच्या नेत्यांना प्रादेशिक पक्षाशी २३ जागात तडजोड करण्यात व एकच पर्याय असे ओरडण्यातील विसंगती लक्षात आली. सर्वच विरोधी पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला कर्नाटक व आंध्रमध्ये अनपेक्षितपणे इंदिरा कॉंग्रेसचा धुव्वा उडाला ! ज्या जनतालाटेतही ( १९७७ ) इंदिरा कॉंग्रेसचे हे दोन बालेकिल्ले शाबूत राहिले होते ते उध्वस्त झाले ! कर्नाटकात जनता–क्रांतिरंगा आघाडीला सर्वांत जास्त जागा मिळाल्या. गुंडूरावची सद्दी संपली जनता पक्षाला कर्नाटकात क्रांतिरंगाच्या सहाय्याने जास्त जागा मिळाल्याने त्या पक्षाची सर्वत्र जी ससेहोलपट चालली होती तिला थोडासा लगाम घातला गेला. जनता–क्रांतिरंगा आघाडीला मग भाजप व इतर विरोधी पक्षांनी पाठिंबा दिल्याने कर्नाटकात हेगडे यांचे विरोधी पक्षीय सरकार सत्तेवर आले. जनता पक्ष क्रांतिरंगा यांना एवढ्या जागा मिळाल्याने त्यांचे नेते चक्रावून गेले होतेच; पण भाजपने स्वतंत्रपणे जागा लढवून १८ जागा जिंकल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. कारण विसर्जित विधानसभेत त्यांचे फक्त चारच आमदार होते तेही अभेद्य जनता पक्षाच्या ताकदीवर निवडून आलेले. त्यापूर्वीच्या विधानसभा-निवडणुकात त्या वेळच्या जनसंघाच्या उमेदवारांना केरळप्रमाणे कर्नाटकातही अनामत रकमा घालवाव्या लागत होत्या. या पार्श्वभूमीवर भाजपचे

यश नक्कीच भव्य होते व ते एकटयाच्या हिमतीवर मिळवलेले होते. सुब्बयाच्या मते तर तिकिटवाटपाच्या वेळेस रा. स्व. संघीयानी सुब्बयाला खच्ची करण्यासाठी घाणेरडे राजकारण केले नसते तर भाजपला किमान पस्तीस जागा जिकता आल्या असत्या तर जनता पक्षाच्या मते भाजप त्यांच्या आघाडीत असता तर, त्या आघाडीने किमान १८० ते २०० ( २२४ पैकी ) जागा जिकल्या असत्या.

आंध्रमध्ये इंदिरा कांग्रेसचे पानिपत झाले ! एन. टी. रामारावने प्रथमच निवडणुका लढवून एका अखिल भारतीय पक्षाचा दारुण पराभव केला तो त्याच्याच बालेकिल्ल्यात दोनतृतियांश जागा जिकून ! तो आला, त्याने पाहिले व तो जिकला या उक्तीप्रमाणे रामारावने एकाच प्रयत्नात आंध्रमध्ये सत्ता काबीज केली. इंदिरा कांग्रेसप्रमाणे इतर विरोधी पक्षाचे पण पानिपत झाले. जनता पक्षाचा एकच आमदार निवडून आला तर भाजपचे तीन, लोकदल, समाजवादी कांग्रेसचे कोणीच निवडून आले नाही. भाजपने या निवडणुकात आंध्रमध्ये पाय रोवला हेच भाजपच्या दृष्टीने निवडणुकीचे सार. मात्र भाजपने आंध्रमध्ये खरी खळबळ माजवली ती त्या निवडणुकीनंतर लगेच आंध्रमध्ये झालेल्या हिमायतनगरच्या विधानसभा—पोटनिवडणुकीत. या निवडणुकीत भाजपचे उमेदवार नरेंद्र हे तेलगूदेशमच्या उमेदवाराचा जवळजवळ २८ हजार मतांनी पराभव करून निवडून आले ! आश्चर्याची गोष्ट म्हणजे या पोटनिवडणुकीत इंदिरा कांग्रेस उमेदवाराची अनामत रक्कम जप्त झाली. इथपर्यंत भाजपचा प्रवास नीट चालला होता. यशामुळे सर्वांच्यात एकवाक्यता होती; परतु भाजपच्या यशस्वी वाटचालीला गालबोट लागले ते नंतर झालेल्या दिल्ली महानगरपालिका व मेट्रॉपॉलिटन कौन्सिलच्या निवडणुकीत. आंध्र व कर्नाटकात जनतेने इंदिरा कांग्रेसला हात दाखवल्याने त्याचीच पुनरावृत्ती दिल्ली निवडणुकांत होईल या आशेने भाजपनेते गाफील राहिले. त्यात दिल्ली हा भाजपचा परंपरागत बालेकिल्ला. मग काय विचारता ! दिल्ली ही जणू आपलीच मक्तेदारी असल्यागत भाजपचे नेते समजत होते. तिकिटवाटपाच्या बाबतीत रा. स्व. सघ व विगर रा. स्व. संघीय असे दोन तट पडून बंडखोरीला ऊत आला. कांग्रेसी परंपरे- सारखे तमाशे झाले आणि एकदाची निवडणूक पार पडली. इंदिरा कांग्रेसला तिसरा परिणामकारक तडाखा बसला नाही तर अनपेक्षितपणे इंदिरा कांग्रेस सत्तेवर आली व इंदिरा कांग्रेसचे पानिपत करू असे बरळणाऱ्या भाजपचा साफ धुव्वा उडाला, तो सर्व परिस्थिती भाजपला अनुकूल असताना ! भाजपच्या दिल्लीतील अपयशाची बरीच कारणे सागितली जातात. त्यामध्ये ही निवडणूक इंदिरा कांग्रेसच्या भवितव्याचा प्रश्न बनल्याने लाखो रुपयांचा चुराडा करून जिकण्यात आली. यापासून रास्वसंघाने इंदिरा कांग्रेसला मदत केली इथपर्यंत मजल मारली जाते. याबाबतीत इंदिरा कांग्रेसने भरपूर पैसा खर्च केला हे गृहीत धरले तरी भाजपही याबाबतीत मागे नव्हता. शिखांनी, दिल्ली-निवडणुकांवर बहिष्कार घालावा या अकालीदलाच्या आवाहनाची मली मोठी पोस्टर्स भाजपनेच आपल्या खर्चाने छापली होती ना ? रा. स्व. संघाने फक्त कट्टर संघीयांचाच प्रचार केला हे कारण मात्र पटण्यासारखे आहे. कित्येक ठिकाणी संघीयानी इंदिरा कांग्रेस उमेदवारांना मते दिल्याचे बोलले जात होते. इंदिरा गांधी या हिंदुत्ववादी असल्याचा साक्षात्कार संघीयांना याच निवडणुकांत झाला असावा. कारण या निवडणुकांत भाजपने आपली बरीच परंपरागत हिंदू मते गमावली ती इंदिरा कांग्रेसला मिळाली. याउलट भाजपने चार मुस्लीम उमेदवार मुस्लीम बहुसंख्य विभागातून निवडून आणले तर इंदिरा कांग्रेसचा जेमतेम एक मुस्लीम उमेदवार निवडून आला. गमत म्हणजे दिल्लीच्या निवडणुकानंतर कुठे जातीय दंगल झाली, कुठे खुट्ट झाले तरी त्यामध्ये सी. आय. ए. प्रमाणे रा. स्व. सघाला त्यामध्ये गोवण्याचे इंदिरा गाधीचे व त्यांच्या गोतावळयाचे उद्योग अचानक बंद झाले, हा काही योगायोग नाही. त्यानतर बडोद्याची दंगल झाली, मालेगावची दंगल झाली. उत्तर प्रदेशात बारीक-सारीक दंगली झाल्या; पण त्यामध्ये आर. एस. एस. वर आगपाखड करण्यात आली नाही. इतकेच काय, आसामच्या भयानक दंगलीत कित्येक मुसलमान मारले गेले; पण त्या बाबतीतही आर. एस. एस. ला फारसे जबाबदार धरण्यात आले नाही.

## हिंदूंचे राजकारण

दिल्लीत भाजपला बसलेला दणका पेकाट मोडणारा होता. आजवरची दिल्लीतील भाजपची प्रतिष्ठा धुळीस मिळाली होती. भाजप हाच एकमेक पर्याय असे म्हणणाऱ्यांना तोंड दाखवायची जागा उरली नाही. दिल्लीच्या निवडणुकींपासून भाजपच्या अधोगतीला सुरुवात झाली. याच निवडणुकीपासून इंदिरा गाधीनी आर. एस. एस. शी सधान साधून हिंदूची भाजपची परंपरागत मते आपल्याकडे खेचण्याचा उद्योग सुरू केला असा कित्येकाचा समज आहे. दिल्लीच्या निवडणुकांनंतर मग मध्यप्रदेश, राजस्थान, गुजराथमध्ये विधानसभा व लोकसभेच्या पोटनिवडणुका झाल्या. आतापर्यंत मध्यप्रदेशात होणाऱ्या प्रत्येक पोटनिवडणुकीत एखाद-दोन अपवाद वगळता भाजपने इंदिरा कांग्रेसला दणका दिला होता; पण विधानसभाच्या या वेळेच्या दोन्ही पोटनिवडणुकीत भाजपचा पराभव झाला व मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री अर्जुनसिंग याचे स्थान पक्के झाले. राजस्थानमध्ये भाजपने आपली जागा राखली; पण इंदिरा कांग्रेसकडून जागा हिसकावून घेता आली नाही. गुजराथेत आतापर्यंतच्या पोटनिवडणुकांत भाजपने जनताला तिसऱ्या स्थानावर फेकले होते व काही जागा जिकल्याही होत्या; पण गुजरात इंदिरा कांग्रेसमधील दुफळीचा फायदा भाजपला पोरबंदर लोकसभा निवडणुकीत उठवता आला नाही. भाजपची पोरबंदरला हार झालीच; पण तो जनताच्या खाली तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला. दरम्यान इंदूर महापालिका काठावर जिकल्यानंतर भोपाळ महानगरपालिकेत भाजपला दारुण पराभव पत्करावा लागला आणि त्यानंतर मध्यप्रदेशात झालेल्या लहानसहान नगरपालिकांच्या निवडणुकांत सत्तेवर येण्यासाठी टपून बसलेल्या भाजपचा दारुण पराभव झाला. आता भाजपचे नेते कितीही म्हणोत की आम्ही पूर्वीच्या जनसंघापेक्षा चागली कामगिरी केली; पण एकच पर्याय म्हणणाऱ्याना असा बचाव शोभत नाही आणि या सर्व प्रकारावर मात केली ती जम्मू-काश्मीरमधील भाजपच्या अतिशय दारुण पराभवाने ! पूर्वीच्या जनसघाने कमावलेले सर्व या निवडणुकीत भाजपने गमावले ! हिंदुत्ववाद्यांचा एवढा दारुण पराभव

जम्मूमध्ये यापूर्वी कधीही झाला नव्हता. इंदिरा गांधींनी हिंदूंची मते लाटली व भाजपला बघत ठेवले. जम्मूमहापालिकेतील भाजपची नॅशनल कॉन्फरन्सबरोबरची युती भाजपला नडली. अर्थात येथेही फरुख अब्दुल्लाचा काटा फक्त इंदिरा गांधीच काढू शकतील असा विश्वास वाटल्याने रा. स्व. संघाने आपले वजन इंदिरा गांधींच्या पारड्यात टाकले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण रीशीकुमार कौशल, चमनलाल गुप्ता, ठाकूर बलदेवसिंग यासारखे भाजपचे मोहरे हरणे अजूनही अशक्य वाटतंय. इंदिरा गांधी या हिंदूंची मते एवढ्या मोठ्या प्रमाणावर एकट्या खेचू शकतील अशी शक्यता जरा कमीच वाटते. अर्थात नॅशनल कॉन्फरन्सला पाठिंबा द्यायचा की नाही या प्रश्नावरून भाजपमध्ये दोन तट पडले होते हे त्यांच्या पराभवाचे एक कारण होतेच. इंदिरा गांधी हिंदुत्ववाद्यांची भूमिका यशस्वीपणे जम्मूमध्ये पार पाडू शकल्या हे त्यांचे कौशल्य. त्यामुळे त्यांच्यावर व त्यांच्या पक्षावर हिंदूंचा पक्ष म्हणून शिक्का मारला जाईल; पण त्याची पर्वा त्यांनी का करावी? इंदिरा गांधींची सेक्युलर प्रतिमा ताबडतोब पुसून टाकणे शक्य होईल का? व त्याकरता विरोधी पक्षांनी काय केले? आज पंजाबमध्येही इंदिरा गांधी हिंदूंचेच राजकारण करत आहेत याची विरोधी पक्षांनी नोंद घेतली आहे का?


## भाजप खच्ची करण्यासाठीच

जम्मू-काश्मीरमधील दारुण पराभवानंतर मात्र आता भाजपमध्ये विसंगत सूर निघू लागलेत एके काळचे भाजपचे मोठे नेते, कामगार पुढारी मध्यप्रदेशातील हुकुमचंद कछवाई यांना मध्यंतरी भाजपमधून डच्चू देण्यात आला हुकुमचंद कछवाई हे उज्जैनमधून निवडून येत. जनसंघाच्या उभारणीत व प्रगतीत त्यांचा फार मोठा वाटा होता. नंतर कर्नाटकातील भाजपचे माजी अध्यक्ष ए. के. सुब्बया यांचा नंबर लागला. ज्या माणसाने भाजप वाढविण्याकरिता खस्ता खाल्ल्या त्याला एका क्षणात उडवण्यात आले. सुब्बयाने ज्याला राजकारणात आणले त्या शिवाप्पाला कर्नाटकात भाजपचे प्रांताध्यक्ष म्हणून नेमण्यात आले. सुब्बया व कछवाई या दोघांच्याही विकेटस् आर. एस. एसनेच काढल्या अशी बोलवा आहे व त्यात बरेच तथ्य आहे. सुब्बया आता कर्नाटकात प्रादेशिक पक्षाची स्थापना करत असून तो किती आमदारांना आपल्याकडे खेचतो याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. सुब्बया आता रा. स्व. संघावर तुटून पडलाय व एक दिवस वाजपेयींचीही आपल्यासारखीच अवस्था होईल असे त्यांचे भाकीत आहे. आता थोड्याच दिवसांनी होणाऱ्या कर्नाटकातील नगरपालिकांच्या निवडणुकात सुब्बयाला आपली ताकद अजमावता येईल. त्याचप्रमाणे भाजपच्या विरोधात तो लढणार असल्याने त्याच्या हकालपट्टीचा भाजपवर कितपत प्रतिकूल परिणाम झालाय हेही पहाता येईल. अर्थात सुब्बयाचा बलराज मधोक होण्याचीच शक्यता जास्त आहे. वसंतराव ओक, पीतांबरदास, मधोक, सोंधी यांच्यासारखा आता सुब्बया व कछवाई यांनाही बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. हे सत्र कुठे थांबणार हे त्यांचे त्यांनाच ठाऊक; परंतु जे घडत आहे ते चांगले नव्हे असे माझ्यासारख्या भाजपबद्दल आशा बाळगणाऱ्याला वाटते. भाजपमध्ये काही मुद्द्यांवर दोन गट पडले आहेत. त्यायोगे पक्षाची ताकद खच्ची होत आहे हे काही बरे नव्हे. भाजपची रा. स्व संघाच्या बाबतीतील स्थिती 'धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय' अशा प्रकारची झाली आहे. रा. स्व. संघाच्या जास्त आहारी गेले तर भाजपला मुस्लीम दलीत व इतर अल्पसंख्याकांचा कधीच विश्वास संपादन करता येणार नाही व केंद्रस्थानी सत्ताही मिळविता येणार नाही. भाजपने एकला चलो रे धोरण स्वीकारावे हा कट्टर संघीयांचा सल्ला तर भाजपला विनाशाकडे नेणारा आहे. जर भाजपने आपली प्रतिभा सेक्युलर बनवण्यासाठी आर. एस. एस. शी संबंध तोडले तर भाजपला कार्यकर्तेच मिळणार नाहीत व त्यांची स्थिती समाजवाद्यांप्रमाणे नेते अनेक पण अनुयायी कमी अशी होऊन बसेल. रा. स्व. संघ हा भाजपला कार्यकर्ते पुरवणारा कारखाना आहे.

सुब्बयाने भाकीत केलंय की, वाजपेयींचीसुद्धा त्याच्यासारखीच शेवटी स्थिती होईल. या म्हणण्यात तथ्य आहे. आज वाजपेयींना स्वतःचे महत्त्व वाढविण्यासाठी आर. एस. एस. ची गरज आहे तर आर. एस. एस. ला वाजपेयींची, त्यांच्या मोठमोठ्या सभा जिंकणाऱ्या अमोघ वक्तृत्वाची गरज आहे; परंतु एकमेकांना वाटणारी ही गरज कधी संपणारच नाही असे नव्हे. १९८० च्या निवडणुकीत जनता पक्षाचा पराभव झाल्यावर आर. एस. एस. ला जाचणारा एक लेख वाजपेयींनी इंडियन एक्सप्रेसमध्ये लिहिला. आर. एस. एस. चे बिग बॉसेस वाजपेयींवर त्याबद्दल अजून नाराज आहेत. शिवाय वाजपेयी नेहमी या कडव्या संघीयांविरुद्ध काही निर्णय घेतात त्यामुळे त्यांचा जळफळाट होतो. मग येन केन प्रकारे कडवे लोक त्यांना विरोध करतात. १९८० च्या लोकसभा निवडणुकात नवी दिल्ली मतदारसंघातून वाजपेयी पराभूत होता होता वाचले हे कशाचे द्योतक आहे? भाजपची ताकद मर्यादित असल्याने इतर विरोधी पक्षांशी समझोता करावा ही वाजपेयींची वास्तववादी भूमिका माधुर, भंडारी, जोशी या कट्टर संघीयांना पटत नाही. शेवटी बहुमताच्या रेट्यामुळे त्यांना वाजपेयींपुढे झुकावे लागते!

सिकंदर बख्त, जेठमलानी, शांतिभूषण इत्यादी आर. एस. एस बद्दल फारसे प्रेम नसलेले नेते भाजपत टिकून आहेत ते केवळ वाजपेयींच्या भरवशावरच. याचा अर्थ भाजपची काही प्रगती व्हावी असे कट्टर संघीयांना खरोखरच वाटत असेल तर त्यांनी आपली दुहेरी भूमिका सोडून द्यावयास हवी. इंदिरा गांधींना त्यांना पाठिंबा द्यायचा असला तर त्यांनी तो खुशाल द्यावा त्यांना कोणीच अडवलेले नाही; पण मग भाजप पाठिंब्याचे नाटक त्यांनी सोडून द्यावे. सर्वच संघवाले अशी भूमिका घेतात असं मग म्हणायचं नाही; पण इंदिरा गांधींना जो हिंदुत्वाचा बुरखा सध्या पांघरला आहे तो केवळ भाजपला खच्ची करण्यासाठीच हे ओळखून त्यांच्या जाळ्यात आर. एस. एस ने फसू नये हीच सदिच्छा!

आज पंजाबमध्ये इंदिरा गांधींनी हिंदूंच्या बाजूने भूमिका घेतली आहे ते अकाली व शिखांना एकाकी पाडण्यासाठीच. पंजाबचा गुंता न सोडवण्यात त्यांचे दोन हेतू आहेत. एक म्हणजे हिंदूमध्ये आपल्या पक्षाबद्दल आपुलकी निर्माण करणे व पंजाबचा प्रश्न हा फक्त अकालींनीच निर्माण केला आहे, त्यात त्यांना हिंदूंची साथ नाही हे दाखवून देणे व पंजाबात भाजपला शह देणे हे इंदिरा गांधींचे उद्देश आहेत. तेव्हा सच्च्या आर. एस. एस. कार्यकर्त्यांनी कोणत्याही परिस्थितीत आज भाजपचे हात मजबूत करणे ही काळाची गरज आहे. आज त्यांनी या बाबतीत कसूर केली तर त्यांनीच स्थापना केलेली राजकीय आघाडी (भाजप—जनसंघ) त्यांच्यासमोरच मोडून पडलेली त्यांना पहावी लागेल. ☐



# दि इस्लामिक बाँब

लेखक : स्टीव्ह वेसमन
हर्बर्ट क्रोस्ने

रूपांतर : मो. ग. तपस्वी
दिल्ली

लेखांक : चौथा

## इस्रायल बाँबनिर्मितीची कहाणी

सद्दाम हुसेन तसे स्पष्ट म्हणत नसले तरी त्यांना अणुबाँब तयार करायचा होता याचे भरपूर संकेत ते मधूनमधून देत होते. त्यांना इस्रायलची धास्ती होती. अरबांविरुद्ध अणुबाँबचा प्रयोग करायलाही इस्रायल कमी करणार नाही आणि त्याला ठोश्यास ठोसा म्हणून अरबांनीही आवश्यक ती सर्व सामग्री प्राप्त करून सुसज्ज असले पाहिजे असे ते म्हणायचे. एकीकडे इस्रायलची भीती आणि दुसरीकडे अण्वस्त्रांनी सज्ज असे समस्त पश्चिम आशियातील राष्ट्र बनण्याची आकांक्षा बाळगून इराक अण्वस्त्रसिद्धतेच्या दिशेने चालत होता.

इराकची अण्वस्त्रसज्ज होण्याची आकांक्षा तसे पाहिल्यास इस्रायलवर मात करण्यापेक्षा समस्त आखाती देशांत एक जबरदस्त राजकीय शक्ती म्हणून उदयाला येण्याच्या जिद्दीनेच जास्त पछाडलेली होती. सऊदींना, इराणींना आणि इतर अरबांनाही आतल्या आत इराकची ही प्रगती पहावत नव्हती; पण ते काहीही का असेना, इराकला वचक आणि वेसण या नात्याने इस्रायलच्या शस्त्रागारात अणुबाँब दाखल झालेला होता हे मात्र खरे. वरकरणी तो काहीही म्हणो, इस्रायलचे अण्वस्त्र-धोरण तसे नेहमीच संदिग्ध रहात आलेले आहे.

अमेरिकेच्या परराष्ट्र-कचेरीतील एका अधिकाऱ्याने या संदिग्धतेचे मोठे समर्पक वर्णन केले. ते म्हणाले- 'आपल्याजवळ अणुबाँब आहे असा समज इस्रायल अरब-विश्वात पसरवू चाहतो आणि त्याचबरोबर तो आपल्या मित्रांना खात्रीलायकपणे सांगत असतो की, त्याच्यापाशी बाँब नाही. इस्रायलजवळ बाँब आहे या समजुतीने अरब त्याच्यावर चौफेर हल्ला चढवायला धजत नाहीत आणि

अशा प्रकारे लिबिया आणि इतर अरब देशांचा पैसा, फ्रान्सने पुरविलेली उपकरणे, यंत्रे आणि संयंत्रे यांच्या बळावर पाकिस्तान इस्लामी देशाचा पहिला अणुबॉंब प्राप्त करायला निघाला होता; पण तेलसमृद्ध अरब देशांमध्ये एक देश असा होता की, त्याला अण्वस्त्रांच्या क्षेत्रात एकटया पाकिस्तानकडे नेतृत्व जावे हे मंजूर नव्हते. तो देश होता इराक. त्याचा नेता सद्दाम हुसेन. त्याच्या पक्षाचे नाव 'बाथ सोशॅलिस्ट पार्टी'. फ्रान्स, इटली वगैरे पाश्चिमात्य देश, इराकी आणि पाकिस्तान या दोघांतील स्पर्धेचा लाभ उठवत होते, दोघांना झुलवत होते....

आंतरराष्ट्रीय जगतात आपले हात अण्वस्त्रांनी माखलेले नाहीत हे त्याला दाखवता येते '

इस्रायली याबाबत जे काही मोजकेच बोलत आले आहेत त्यावरून त्याच्या तळघरात अणुबाँब आहे हे निर्विवाद ! 'पश्चिम आशियात अण्वस्त्राचा प्रादुर्भाव आधी आम्ही करणार नाही,' हे त्यांचे नेहमी-चेच वाक्य आहे; पण सर्वांत स्पष्ट संकेत मिळतो तो इस्रायलचे राष्ट्रपती इब्राहिम काझीर यांच्या वाक्यातून. जेरुसलेम येथे डिसेंबर १९७४ मध्ये विज्ञान-लेखकांच्या परिषदेत ते म्हणाले होते-'अण्वस्त्र-क्षम व्हावे हा आमचा नेहमीचाच उद्देश आहे आणि आता ती क्षमता आमच्यात आलेली आहे.' काझीर स्वत: प्रख्यात जीवभौतिक-शास्त्रज्ञ आहेत आणि इस्रायलच्या संरक्षणमंत्रालयाचे माजी मुख्य वैज्ञानिकही आहेत हे लक्षात घेता हा संकेत मोलाचा ठरतो.

या परिषदेत त्यांना जेव्हा फारच खोदखोदून विचारण्यात आले तेव्हा त्यानी सांगितले, 'या क्षमतेचा अर्थ असा आहे की, अगदी अल्पकाळात-म्हणजे काही दिवसाच्या आत-प्रत्यक्षात आम्ही अण्वस्त्रसज्ज होऊ शकतो. आमच्या हातात अण्वस्त्रे असलीच पाहि-जेत अशी गरज आम्हाला भासली की आम्ही अण्वस्त्रसज्ज होऊ शकतो.' काझीर यांनी हे म्हटले १९७४ अखेरीस; पण त्याच्या सुमारे वर्षभर आधीच इस्रायलना तशी गरज भासली असली पाहिजे. म्हणजे ऑक्टोबर १९७३ मध्ये जेव्हा इजिप्तशी युद्ध चालू होते, युद्धात इस्रायल मार खात चालला होता, इजिप्तने आपल्या अवचित हल्ल्यानी इस्रायलला चकित केले होते. सिनाईच्या वाळ-वंटात त्याने केलेले प्रतिहल्ले कुचकामी ठरत होते, गोलान टेकडयां-वरून सीरियाचे रणगाडे इस्रायलमध्ये उतरून येण्याचा धोका होता. 'टाइम' साप्ताहिकाच्या १२ एप्रिल १९७६ च्या अंकात म्हटले आहे की, 'पंतप्रधान गोल्डा मायर यांनी ९ ऑक्टोबरच्या भल्या पहाटे हुकुम सोडला होता की, अणुबाँब तयार ठेवा !'

'टाइम' पुढे म्हणते- 'आणि पुढल्या ७८ तासांच्या आत इस्रायलींनी वीस किलो टनी तेरा अणुबाँब एका गुप्त भुयारात सज्ज केले आणि खास फॅन्टम आणि के-फिर विमानानी ते रवानाही केले. ही विमाने त्यासाठी आधीच जय्यत तयार होती. या बाँबचा प्रयोग करण्याची सर्व यंत्रणा या विमानात होती. हे तेरा अणुबाँब त्यांनी वाळवंटी-शस्त्रागारात नेले आणि आजमितीसही ते तेथेच केव्हाही 'सुटण्याच्या' तयारीत सज्ज आहेत !'

इस्रायलींनी या बातमीचा तावडतोब अधिकृत इन्कार केला आणि प्रत्यक्षात असे काही घडल्याचा दुसरा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. तरीही इस्रायलचे संरक्षणमंत्री मोशे दायान यांच्याकडूनच ही बातमी 'टाइम'ला मिळाली असली पाहिजे असे आम्ही बिन-दिक्कतपणे म्हणतो. कारण इस्रायलला याचा मानसिक लाभ मिळा-यचा तो मिळाला होता.

पण अमेरिकन 'सीआयए'ने देखील याबाबत गुप्त माहिती मिळवली होती. घटना १९६८ मधली आहे. 'राष्ट्रीय गुप्त माहितीची अनुमाने' या मथळयाखाली सीआयएने जो अहवाल सादर केला होता त्यात स्पष्ट म्हटले होते की, इस्रायलजवळ अण्वस्त्रे आहेत. हा अह-वाल 'अत्यंत गोपनीय' होता. कित्येक वर्षे तो सुरक्षित पडून होता, १९६७ ते ७७ या काळात सीआयएच्या विज्ञान आणि तंत्रशास्त्र-विभागाचे उपसंचालक असलेले कार्ल डके यानी परमाणुनियमन-आयोगाला फेब्रुवारी १९७६ मध्ये जिलेल्या गुप्त माहितीत तो अह-वाल प्रकट करण्यात आला. डकेट यांच्या या गुप्त अहवालाचा काही भाग आयोगाने अभावितपणे दोन वर्षांनंतर ५५० पानी अगोपनीय अहवालात अंतर्भूत केला

१९६८ च्या आपल्या अहवालात इस्रायलजवळ अणुबाँब असल्याचे अनेक सज्जड पुरावे देण्यात आले होते. अणुबाँब टाकण्यासाठीच ज्या प्रकारची उड्डाणे करावी लागतात, तसल्या उड्डाणाचा सराव इस्रायलची 'ए-चार' जातीची खास जेट विमाने करीत असल्याचे त्यात म्हटले होते. इस्रायलला जाऊन आलेल्या अमेरिकन वैज्ञानिकां-नीही इस्रायल परिष्कृत युरेनियम तयार करीत असल्याची माहिती आणली होती. सीआयएने दिमोना येथे असलेल्या इस्रायलच्या परमाणुकेंद्राभोवतीची हवा आणि माती यावर अद्यावत् यंत्र-उप-करणांनी भाग घेतला होता. सर्व पहाण्याचा निष्कर्ष होता, इस्रायल-जवळ अत्यंत उच्च प्रतीचे परिष्कृत युरेनियम आहे आणि कित्येक अणुबाँब तयार करण्यास पुरेल इतका त्याचा साठाही आहे.

डकेट यांनी परमाणु-नियमकांना सांगितले होते की, मी हा गुप्त अहवाल सीआयएचे संचालक रिचर्ड हेम्स यांना दिला व तो घेऊन जातीने राष्ट्रपती लिंडन जॉन्सन यांच्याकडे गेले. डकेट म्हणाले की, राष्ट्रपतीनी सीआयए-प्रमुखाना याबाबत अगदी कुणाजवळ अवाक्ष-रही काढू नका-अगदी डीन रस्क आणि रॉबर्ट मॅकनामारा यांच्या-जवळसुद्धा बोलू नका अशी ताकीद दिली होती. डीन रस्क हे जॉन्सन

यांचे परराष्ट्रमंत्री आणि मॅकनामारा संरक्षणमंत्री होते.

१९७४ मध्ये सीआयएने आणखी एक अहवाल सादर केला. त्यातील माहिती, पुरावे आणि घटना आणखी ताज्या होत्या त्याचा गोषवारा 'अण्वस्त्रांचा आणखी प्रसार' या मथळयाने देण्यात आलेला होता. फक्त इस्रायलचाच नव्हे सर्व जगाचाच या दृष्टीने अभ्यास करण्यात आला होता. निष्कर्ष होता–'इस्रालयने यापूर्वीच अण्वस्त्रे तयार केली आहेत.' अहवालात म्हटले होते की, इस्रायलने नुसती अण्वस्त्रेच तयार केली आहेत असे नव्हे तर ती वाहून नेण्यास सक्षम अशी अत्याधुनिक लढाऊ विमानेही तयार केली आहेत.

या अहवालातील फक्त दोनच परिच्छेद जनप्रसारणासाठी देण्याचे ठरले होते. आमचे काही सहकारी एबीसी टी व्ही करता 'क्लोजअप' फिल्म तयार करीत होते. सीआयएमधील एका सूत्राने त्याना हा अहवाल दिला. 'पश्चिम आशियातील अण्वस्त्रस्पर्धा' हाच त्या फिल्मचा विषय होता. कोणते दोन परिच्छेद वापरावयाचे ते ठरल्यानंतर सीआयएच्या माणसानेच चूक केली आणि ते तेवढे दोनच परिच्छेद वगळून बाकी सर्व अहवाल 'खुला' केला.

सीआयएचे हे सूत्र म्हणजे दुसरे–तिसरे कुणी नसून कार्ल डकेट हेच होते. १९७६ मध्ये सीआयएने नव्यानेच सुरू केलेल्या 'जनसंपर्क अभियानाच्या' अंतर्गत एक कॉकटेल पार्टी आणि बडा खाना योजला होता. आमंत्रित होते अमेरिकेच्या विमानशास्त्र आणि खगोलशास्त्र-संस्थेचे १५० वैज्ञानिक. ही संस्था अत्युच्चाधिकार असलेली आहे. अनेक गुपितांची देवाणघेवाणही दोघात होत आली आहे; पण परमाणु–माहितीचा प्रश्न येताच हे सहकार्य थांबले आहे आणि तिथून पुढे अमेरिकनांना आपल्याच बळावर जी काय माहिती मिळवायची ती मिळवावी लागली आहे. डकेट यांच्या १९७६ च्या अहवालावरच अमेरिकेचे सारे अदाज आधारलेले आहेत. ते कितपत रास्त मानायचे ?

एका इस्रायली वैज्ञानिकाची मुलाखत आम्ही घेतली. तो म्हणाला-सीआयएचे गणित हास्यास्पद आहे. प्रत्यक्ष माहितीवर ते आधारलेले नाही. गणित काय कोणीही माडू शकते. मग त्यांनी स्वत:च हिशोब केला, गणित माडले. दिमोना येथील अणुभट्टी कधी सुरू झाली, जास्तीत जास्त ती किती तास चालते, त्यातून किती प्लुटोनियम सिद्धांतत: तयार होऊ शकते, असे गणित त्यांनी माडले आणि जेव्हा इस्रायलजवळ वीसेक अणुबाँब असू शकतील हेच उत्तर आले तेव्हा ती कागद फेकून देत ते म्हणाले, 'हे असे 'मूर्खपणाचे' गणित असते पहा. इस्रायलजवळ प्लुटोनियमपासून तयार केलेला बाँबच नाही. इस्रायली अणुबाँब अस्तित्वातच नाही !

फ्रेंचांनी दिमोना-भट्टी इस्रायलला विकली होती. परमाणुविज्ञानातील आणि तत्रज्ञानातील अन्य मदतही त्याला दिली होती म्हणून आम्ही फ्रेंचांना गाठले. फ्रेंच अणुशक्ति-आयोगाचे माजी प्रमुख डॉ. फ्रान्सिस पेरिन यांनी आम्हाला सांगितले–'इस्रायलींजवळ अणुबाँब आहे अशी आमची खात्री आहे. वर्षाकाठी एक-दोन बाँब तयार

## गरज भासताच अण्वस्त्रसज्ज होता आले पाहिजे या दृष्टीने इस्रायलने पावले टाकायला

करता येण्याइतक्या सर्व सोयी त्यांच्यापाशी आहेत.

इस्रायलजवळ अणुबाँब आहे अशी खात्री फ्रेंचांना–एकटया डॉ. पेरिनना नव्हे–वाटत होती. अमेरिकनांना तर त्याची माहिती होती. बहुतेक सुजाण इस्रायलीही तसे मानीत होते. आम्ही जेवढ्या म्हणून अरबांशी बोललो त्यातल्या प्रत्येकाला याबाबत मुळीच संशय नव्हता. म्हणजे इस्रायलच्या गुपिते फुटू देणाऱ्यानी आपले काम कसे बेमालूम केले होते आणि इस्रायल सरकार इन्कार करीत असतानाच अणुबाँबनिर्मितीसाठी लागणारी सर्व सामग्री जमविण्यासाठी माणसे आणि मेहनत या कामात झोकत होते. आपले ईप्सित साध्य करण्यासाठी काय काय करावे लागते याचा जणु वास्तुपाठच इस्रायलने इस्लामिक बाँबनिर्मात्यासमोर ठेवला होता.

पण इस्रायलची बाँबनिर्मितीची कहाणी लांबलचक, खळबळजनक आणि तितकीच रहस्यमयही आहे. तिच्या मुळाशी प्रेरणा स्वत:चे अस्तित्व टिकवण्याची आहे. इस्रायलला चारी बाजूनी अरब देशांनी वेढलेले आहे. अरबांजवळ विस्तीर्ण भूप्रदेश आणि अफाट लोकसख्या आहे. माणसाला माणूस किंवा इंचाला इंच अशा तुलनेने इस्रायल अरबांशी कधीच टिकू शकणार नाही. अरबांनी मनात आणले तर ते इस्रायलचा गळा दाबून त्याचे अस्तित्वच समाप्त करू शकतील, म्हणून अरबांनाही जरब बसवील असा अणुबाँब इस्रायलने मिळवला पाहिजे अशी इस्रायलची याबाबतची एकूणच भूमिका राहिलेली आहे. आपल्या या भूमिकेचा त्याने बभ्रा केला नसेल; पण विशिष्ट

डकेट यांनी या मंडळीसमोर 'अगोपनीय' अहवाल सांगितला. 'जगातील घडामोडीची गुप्त माहिती' हे त्या अहवालाचे शीर्षक होते. सहाजिकच प्रश्नोत्तरे झाली. एकाने सरळच विचारले–'इस्रायलजवळ अणुबाँब आहे ही अफवा खरी आहे काय ?'

डकेट यांनीही तितकेच सरळ उत्तर थंडपणे दिले–'इस्रायलजवळ केव्हाही वापरण्यास सिद्ध असे दहा ते वीस अणुबाँब तयार आहेत.' डकेट यांनी हा गौप्य-स्फोट सीआयएच्या मुख्य कचेरीत केला आणि 'तुम्हाला म्हणून सांगतो' असे अनौपचारिक स्वरूप त्यांच्या कथनाला होते; पण चार दिवसांनंतर त्याचे ते कथन 'वॉशिंग्टन पोस्ट' मध्ये छापून आले. प्रतिक्रिया भयानक विस्फोटक झाली. 'गुपिते फुटण्याचा सर्वात मोठा मूर्खपणा' असे या घटनेचे वर्णन गुप्त माहिती-विषयक चिकित्सा समितीच्या अध्यक्षानी केले. सीआयएचे प्रमुख जॉर्ज बुश– आता उपराष्ट्रपती–तर भयानक हादरलेच, त्यानंतर थोडयाच दिवसात कार्ल डकेट सीआयएमधून 'निवृत्त' झाले. प्रकृती बरी रहात नाही ही सबब देण्यात आली; पण डकेट यानी जे सांगितले त्याचा इन्कार कोणीही केला नाही!

म्हणजे १९६८ मध्ये बरेच, १९७६ मध्ये दहा ते वीस अणुबाँब इस्रायलपाशी झालेले होते असे सीआयएला वाटते; पण ही बातमी कितपत विश्वसनीय मानायची ? अमेरिकनाना गणिते माडून उत्तरे काढायची सवय आहे, अचूक माहिती त्यांना असतेच असे नाही. सीआयए इस्रायलशी सहकार्य करीत होती आणि आजही करते.

काळापलीकडे ते गुपितही त्याने राखलेले नाही.

ती कहाणी अशी आहे. १९५२ मध्येच इस्रायलने गरज भासताच अण्वस्त्रसज्ज होता आले पाहिजे याच दृष्टीने पावले टाकायला सुरुवात केली. पंतप्रधानाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली त्यासाठी अणुशक्तिआयोग स्थापन केला. अमेरिकेशी आवश्यक ते करार केले. 'तरण–ताल' धर्तीची संशोधनअणुभट्टी मिळवली. अण्वस्त्रप्रतीचे अत्यंत परिष्कृत युरेनियमही अमेरिकेने इस्रायलला दिले. तेल-अवीवच्या दक्षिणेला नहाल सोरेक येथे भट्टी उभी राहिली. त्यासाठी बाहेरच्याचे निरीक्षण आणि तपासणी–हमीही इस्रायलने दिली.

पण झुल्फिकार अली भुत्तो आणि सद्दाम हुसेन याच्याप्रमाणेच इस्रायलचे बेन गुरिआँ यांनीही फक्त एकाच स्रोतावर विसंबायचे सोडून फ्रान्सशी सख्य केले. फ्रान्समधील गाय मॉले यांच्या समाजवादी सरकारला हिटलरच्या अत्याचाराला बळी पडलेल्या ज्यूंबद्दल स्वाभाविक सहानुभूती होती. बेन गुरिआँ यांच्या मपाई पक्षाला या सहानुभूतीचा लाभ मिळाला. फ्रान्सने १९५६ पासून इस्रायलला लष्करी क्षेत्रात हवी ती सर्व आणि भरपूर मदत केली. इतकेच नव्हे तर परमाणु–इंधनाबाबतचा एक करारही इस्रायलशी केला आणि इस्रायली बॉबनिर्मितीचा मार्ग प्रशस्त करून दिला. या करारामुळे इस्रायलला २४ औष्णिक मेगॅवॅट-क्षमतेची नैसर्गिक युरेनियम परिष्कृत करण्याची भट्टी उभारण्यास हिरवा कंदील मिळाला.

या करारावर सह्या झाल्या ऑक्टोबर १९५७ मध्ये, बांधकाम सुरू झाले लगेचच नेगेव वाळवंटात. तेथे इस्रायलने यासाठी दिमोना नावाचे नवे नगरच उभारायला घेतले. लोकांनी विचारले काय बांधता आहात येथे ? बेन गुरिआँने उत्तर दिले 'कापडगिरणी !' वास्तविक दिमोनाच इस्रायलच्या अण्वस्त्रसज्जतेचे मज्जा–केंद्र ठरणार होते. आपले अस्तित्व टिकविण्यासाठी इस्रायलने जणु तो 'तिसरा डोळाच' प्राप्त केला होता !

ज्या आंतरराष्ट्रीय नियंत्रणाचा मुद्दा फ्रान्सने स्वत: आपल्यासाठी ठोकरला होता, तोच मुद्दा इस्रायलवर लादणे फ्रान्सला अप्रशस्त वाटत होते. म्हणून कोणत्याही अटी वगैरे न घालता फ्रान्सने इस्रायलला अण्वस्त्रसज्ज होण्यासाठी लागणारी सर्व ती मदत अगदी बिनदिक्कतपणे पुरवायला सुरुवात केली.

'आम्ही सारेच दरवडेखोराच्या टोळक्यात रहात आहोत.' डॉ. गोल्डश्मितने मान्य केले होते. ते म्हणाले की, 'याबाबत अतिशय गोपनीयता पाळण्याचा इस्रायलचा आग्रह आम्हीही मान्य केला, कारण नाही तर अरबांनी इस्रायलला सामग्री पुरवणाऱ्या कंपन्यांवर दात ठेवला असता आणि त्याना काळ्या यादीत टाकले असते !'

इस्रायली वैज्ञानिकांनी हेवी वॉटर तयार करण्याचा एक अभिनव उपाय शोधून काढला होता. ती पद्धती त्याने फ्रान्सलाही दिली. मृत–सागरातील फॉस्फेटसाठ्यापासून युरेनियम काढण्याची कलाही इस्रायली वैज्ञानिकांनी आत्मसात केली होती आणि तीही त्यांनी फ्रेंचाना सर्रास वापरू दिली. इतकेच नव्हे तर तंत्रविज्ञान आणि लष्करी सामग्री फ्रान्सला पुरवून इस्रायलने फ्रान्सला अनन्यसाधारण मदत केली. फ्रेंच अणुबॉबनिर्मितीतही त्याचा वाटा मोठा आहे.

या मदतीची गुरुकिल्ली अशी होती : इस्रायली वैज्ञानिकांनी शस्त्रास्त्रनिर्मितीच्या क्षेत्रात अद्भुत प्रगती केली होती. 'शावित' आणि 'जेरिको' प्रक्षेपास्त्र–प्रणाली याच्या साक्षी आहेत. फ्रान्सची परमाणु–प्रहार–शक्ती उभारण्याच्या कामी इस्रायली शास्त्रज्ञाने फार बहुमोल कामगिरी केली अर्थातच याच्या मोबदल्यात इस्रायलला त्याचा अणुबॉब तयार करण्यासाठी लागेल ती सर्व मदत करायला फ्रान्सही कृतज्ञतेने तयार होता. ही माहिती आम्हाला ज्या फ्रेंच आणि अमेरिकन सूत्रांनी दिली त्याची नावे आम्हाला येथे देता येणार नाहीत. फ्रान्सला दिलेल्या मदतीच्या मोबदल्यात त्याने इस्रायलला दिमोना येथे अत्यंत मोक्याची अणुभट्टी उभारून दिली. फ्रेंच परमाणु–कार्यक्रमात इस्रायलला हवे ते पाहू आणि निरखू दिले. विशेषत: इस्रायलला स्वतःचा अणुबॉब तयार करण्यासाठी अपरिहार्य ठरणारी अशी खूपशी माहिती आणि आकडेवारीही आपल्या परमाणु-विकास–कार्यक्रमातून त्याला घेऊ दिली. वापरलेल्या परमाणु–इंधनावर पुन्हा प्रक्रिया करून घेण्याचे लहानसे सयंत्रही त्याने इस्रायलला दिले.

यातून फ्रान्स आणि इस्रायल यांचे सख्य जोडले गेले. ते दि गॉल यांच्या राजवटीतही चालू राहिले; पण १९६० मध्ये फ्रान्सने आपल्या पहिल्या अणुबॉबचा स्फोट केल्यानंतर दि गॉल यांनीच फ्रान्सचे हे सख्य परमाणु–क्षेत्रातून तरी समाप्त केले ते आपल्या आठवणीच्या पुस्तकात म्हणतात–'तेलअवीव आणि पॅरिस यांच्यातील हे अनुचित लष्करी सहकार्य सुवेझ–अभियानानतर मी स्वतःच समाप्त केले. कारण तेव्हापासूनच फ्रान्सच्या सर्वच सेवांमध्ये प्रत्येक पातळीवर इस्रायलीचे अस्तित्व सुरू झालेले होते.'

**सुरुवात केली. अणुशक्तिआयोग स्थापन केला. अमेरिकेशी आवश्यक ते करार केले.**

खरी स्थिती ही होती की, फ्रेंच सहकार्यामुळे फ्रेंच अणुबॉबचा स्फोट होताच इस्रायललाही अणुविस्फोट करण्याचे तंत्र अवगत झाले होते आणि एकाऐवजी दोन (फ्रान्स आणि इस्रायल) राष्ट्रे अण्वस्त्र-सज्ज होत होती. फ्रान्सला नेमके येथूनच सहकार्य संपायला हवे होते. इस्रायलने अणुबॉब तयार तर केला; पण त्याचा स्फोट आजवर कधीही का केला नाही हे गूढ यामुळेच थोडे उकलते.

कारण अशा स्फोटातून ज्या ज्या गोष्टीची नोद करायची त्या त्या सर्व नोदी फ्रेंच स्फोटामधून इस्रायलला मिळालेल्या होत्या आणि म्हणूनच त्याला आपल्या बॉबचा वेगळा स्फोट करून पाहण्याची गरज उरलेली नव्हती.

परमाणुक्षेत्रातील सहकार्य–कराराचा अंत होताच फ्रान्सने इस्रायलला दिमोनाबाबत पाळण्यात येत असलेली सारी गुप्तता सोडून देऊन जाहीरपणे करायचे ते करण्याची गळ घातली आणि दिमोना-भट्टी विदेशी–बहुधा आंतरराष्ट्रीय तपासणीसाठी खुली करावी असेही सांगितले. यामुळे इस्रायल बराच अस्वस्थ झाला. कारण इस्रायलला तोवर आकडेवार माहिती आणि ज्ञान मिळालेले असले,

तरी सामग्री मिळू लागायला अद्याप अवकाश होता.

दिमोना–अणुभट्टीचा उद्देश पहिल्यापासूनच अण्वस्त्रोपयोगी प्लुटोनियम तयार करणे हाच होता. फ्रेंचांनीच ती भट्टी दिली होती. आता त्यांनी सहकार्य समाप्त केल्यानंतर इस्रायलला ती ट्टी स्वतःच्याच ज्ञान–विज्ञानाचा वापर करून पूर्ण करणे भाग होते. ती पूर्ण करायला त्याला सात वर्षे लागली, हे मग कसे? आम्ही फ्रेंचांना आणि अमेरिकनांनाही याबाबत विचारले. स्वतः इस्रायलींना याबाबत कुणी फार चवकशा केल्या तर ते आवडत नसे; पण आम्हाला जी माहिती मिळाली त्यावरून अमेरिकेचे दडपण आले असावे असेच म्हटले पाहिजे.

आयसेनहॉवर–प्रशासनाला दिमोनाच्या 'त्या कापडगिरणी'-बाबत संशय आला होता. यू–टू या हेर–विमानांनी गुप्तपणे घेतलेल्या छायाचित्रांवरून तो संशय बळावला होता. वॉशिंग्टनमधील इस्रायली राजदूताला बोलावून अमेरिकेला वाटणारी चिंता कळविण्यात आली होती. इकडे त्याच सुमाराला अगदी एकामागून एक सीआयएची गुपिते योजनापूर्वक फुटू देण्यात येत होती. 'टाइम' आणि 'वॉशिंग्टन पोस्टमध्ये' ठळक मथळ्याने आलेल्या 'त्या' बातम्यांमुळे इजिप्तचे नासर इतके संतापले होते की, 'आपण ४० लाख इजिप्शियन सैनिकांसह चाल करून जाऊन दिमोना येथील इस्रायलचा परमाणु–तळ उध्वस्त करून टाकू!' अशी जाहीर धमकी त्यांनी दिली होती. संकट गडद होत चालले होते. अखेरीस इस्रायलचे पंतप्रधान बेन गुरिआँ यांना आपल्या संसदेपुढे जावे लागले






आणि दिमोना–अणुभट्टी पूर्णपणे वैज्ञानिक, वैद्यकीय आणि औद्योगिक कामांसाठीच वापरली जाईल आणि अणुवीज–केंद्रे उभारण्याचे प्रशिक्षण इस्रायली इंजिनियरांना तेथे देण्यात येईल असे त्यांनी निक्षून सांगितले. आपण अण्वस्त्रे तयार करीत आहोत याचा तो इस्रायली सरकारने केलेला पहिला इन्कार होता; पण इस्रायलच्या मित्रांना किंवा शत्रूंनाही तो खरा वाटला नाही, यात आश्चर्य नाही.

अमेरिकेचे नंतरचे राष्ट्रपती जॉन केनेडी आणि लिंडन जॉन्सन यांनीही इस्रायलला दबावाखाली आणण्याचे प्रयत्न चालू ठेवले. दिमोनाला अमेरिकन वैज्ञानिकांनी भेट दिली. त्यात त्यांना अण्वस्त्रनिर्मितीचा मागमूसही आढळला नाही. कारण तोवर भट्टी सुरूच झालेली नव्हती. जॉन्सन यांनी समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याचे एक परिपूर्ण संयंत्र इस्रायलला देऊ केले; पण त्यासाठी अण्वस्त्रनिर्मितीचा संपूर्ण कार्यक्रमच इस्रायलने सोडून द्यायला हवा अशी अट घातली. या सर्व दडपणामुळे इस्रायली मंत्रिमंडळात बाँबच्या निर्मितीविरुद्ध असणाऱ्यांचे हात बळकट झाले, निदान १९६७ चे युद्ध संपेपर्यंत तरी त्यांचा विरोधच प्रभावी ठरला. १९६७ पर्यंत इस्रायलला थांबावे लागल्याची तर्कसंगत कारणे हीच असावीत.

फ्रेंचांनी सहकार्य–करार मोडल्यानंतर अण्वस्त्रनिर्मितीत वापरावयाचे प्लुटोनियम पुन्हा प्रक्रियेसाठी इस्रायलला फ्रान्सकडून मिळणे बंद झाले तेव्हा त्याने ते कुठून तरी दुसरीकडून मिळवले असावे असाही एक तर्क आहे. याबाबत आम्ही दोन अत्यंत उच्चपदस्थ सूत्रांना गाठले. एक होता इस्रायलशी व्यवहार करणारा फ्रेंच परमाणु–कार्यक्रमातील उच्च अधिकारी आणि दुसरा होता एक वरिष्ठ इस्रायली अधिकारी.

त्यांनी सांगितलेली माहिती आश्चर्यकारक होती. दोघांनीही एकच माहिती व कबुली दिली हेही थक्क करणारेच होते. फ्रेंच म्हणाला– 'उभय देशांतला करार असा होता की, फ्रान्सने दिमोनासाठी लागणारे नैसर्गिक युरेनियम द्यायचे, वापरलेले इंधन आणि त्यातून निघालेले प्लुटोनियम इस्रायलने फ्रान्सला परत पाठवायचे आणि त्यावर पुन्हा प्रक्रिया करून फ्रान्सने ते परत इस्रायलला द्यायचे. तदनुसार इस्रायलींनी ४० टन इंधन पॅरिसला पाठवले; पण फ्रेंचांनी त्यातले फक्त निम्मेच म्हणजे सुमारे २० टन प्लुटोनियमच पुन्हा प्रक्रिया करून इस्रायलला पाठवले. नंतर करारच मोडला आणि बाकीचे पाठवायचे फ्रान्सने रद्द केले. जे २० टन पाठवले त्यातून नागासाकी–धर्तीचे १५–२० अणुबाँब तयार करता आले असते. आमच्यावर करार मोडल्याचा आरोप इस्रायलने केला आणि तो खराही होता.'

इस्रायली सूत्राने सांगितले– 'खरे पहाल तर फ्रान्सने पुन्हा प्रक्रिया करून आम्हाला एक ग्रामदेखील प्लुटोनियम पाठवलेच नाही. त्याचे काय झाले? आम्ही फ्रान्सला प्लुटोनियम पाठवले. ते शुद्ध करून त्याने पाठवले नाही. उलट करारच मोडून टाकला. तेव्हा मग आम्ही आमच्याजवळ राहिलेले युरेनियम, प्लुटोनियम फ्रान्सला परत पाठवलेच नाही. त्याच सुमाराला सहा दिवसांचे युद्ध सुरू झाले आणि फ्रेंचांनी आमचा सगळाच पुरवठा बंद केला.

खरे काय असेल? फ्रान्सच्या अणुशक्तिसंबंधित मंत्रालयाच्या संयुक्त बैठकीचा 'तो' शब्दश. इतिवृत्तात एका फ्रेंच वैज्ञानिकाकडून आम्हाला मिळाला होता. त्यातही म्हटले होते की— 'इस्रायलजवळ आधीपासूनच भरपूर प्लुटोनियम असले पाहिजे असे गिरॉर्द यांचे मत होते तर डॉ. गोल्डश्मित म्हणाले होते की, त्यापासून इस्रायलला कित्येक बाँब तयार करता येणे सहज शक्य आहे.' याचा अर्थ फ्रान्सने दिलेली दिमोना—भट्टी ठरल्या मुदतीत प्लुटोनियमवर पुन्हा प्रक्रिया करू लागली होती किंवा फ्रान्सनेच अस्त्रोपयोगी प्लुटोनियम इस्रायलला सरळ पुरवले होते यापरता वेगळा होतच नाही.

ते काहीही असो, फ्रान्सने अण्वस्त्रप्रसाराला चक्क मदतच केली होती. इस्रायल हा काही एकच देश त्या प्रसारात आलेला नव्हता, तर इराक आणि पाकिस्तानदेखील त्यात गुरफटले होते. जागतिक समज असा पसरला होता की, फ्रान्समध्ये तुम्हाला काहीही मिळू शकेल. तुमच्याजवळून फ्रान्सला हवे आहे ते म्हणजे समजा तेल किंवा ज्ञान-विज्ञान देण्याइतका पैसा असेल तर त्याच्या मोबदल्यात फ्रान्स तुम्हाला अगदी अणुबाँबसुद्धा देईल!

एका अमेरिकन सूत्राने याचेच वर्णन मोठ्या मिस्किलपणे केले. तो म्हणाला— 'फ्रेंच परमाणुउद्योग एखाद्या फ्रेंच अभिसारिकेसारखा आहे जरा भुरळ घातली की, शय्यासोबतीला तयार आणि आता तर तिला त्यातच मजा येऊ लागल्याने ती सर्वांशीच अशी सोबत करायला बिनदिक्कत सिद्ध आहे.'

इस्रायलने प्रत्यक्षात बाँब तयार केला असो वा नसो, त्याने तो निर्माण करण्याचे सर्व सामर्थ्य प्राप्त केले होते. इतकेच नव्हे तर अणुबाँबवाहक विमाने आणि प्रक्षेपण—सामग्रीही जय्यत तयार केली होती यात वाद नाही 'शक्ति' आणि 'जेरिको' प्रणाली तसेच 'लान्स' प्रक्षेपास्त्र-प्रणाली इस्रायलने स्वतःच तयार केल्या होत्या. आजही प्रक्षेपणाच्या क्षेत्रात इस्रायल जगात सर्वांच्या आघाडीवर आहे. एखादी प्रणाली आठ-दहा वर्षे प्रत्यक्षात वापरात ठेवून मग ती जाहीर करण्याची इस्रायलला सवय आहे. त्यामुळे परमाणु—अस्त्रे वहनाची आणखी कोणकोणती साधने वा प्रणाली त्याने विकसित केली आहे ते सांगता येत नाही. 'लान्स' प्रणालीचेच पहा ना, ती प्रणाली पंधरा वर्षे वापरून झाल्यावर आपण ती विकसित केल्याचे इस्रायलने जाहीर केले.

मग प्रश्न असा येतो की, फ्रान्सने करार मोडल्यानंतर इस्रायलने अणुबाँबसाठी लागणारे अत्यंत परिष्कृत युरेनियम कोठून आणले? सीआयएला इस्रायल अणुबाँब तयार करीत असल्याचा 'वास' लागला होता हे खरे; पण त्यासाठी लागणारे मूलभूत द्रव्य तो कोठून आणतो आहे याचा कोणताही सुगावा लागलेला नव्हता. अमेरिका इस्रायल अणुसज्ज होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करीत होती. सीआयए गुप्त माहितीच्या आधारे तोच ग्रह पक्का करीत होती. अण्वस्त्रोपयोगी युरेनियम तयार करण्याची प्रक्रिया, अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स आणि चीन या पाचच देशांना अवगत होती. यातल्याही फक्त अमेरिकेनेच उल्लेखनीय युरेनियमची निर्यात केली होती.

इस्रायलच्या संभाव्य अण्वस्त्रसज्जतेबाबत अमेरिकेतील सरकार चिंताग्रस्त असतानाच परमाणुगुपिते हस्तगत करण्याचा मोठाच कट खुद्द अमेरिकेतच शिजला होता. सीआयएला त्याचाही सुगावा लागला पण तोवर उशीर झाला होता. पेन्सिल्व्हानिया प्रांतात अपोलो येथे न्युक्लियर मटेरियल्स अँड एक्विपमेन्ट कॉर्पोरेशन (न्युमेक) या नावाचे एक लहानसे अणु—इंधन तयार करणारे संयंत्र होते. इस्रायलशी घनिष्ठ संबंध असलेले परमाणुरसायनतज्ज्ञ डॉ. झॅल्मन शापिरो त्याचे संचालक होते. नेमके किती परिष्कृत युरेनियम इस्रायलला मिळाले याची सीआयएलाही काही माहिती नव्हती; पण, या न्युमेकमधून डॉ. शापिरो यांच्याचमार्फत ते इस्रायलच्या हाती लागले असावे अशी सीआयए अधिकाऱ्यांना खात्री वाटत होती. त्याचा कयास होता की, सुमारे २०० पौंड किंवा अनेक अणुबाँब तयार करायला पुरेसे होईल इतके परिष्कृत युरेनियम इस्रायलला देण्यात आले आहे.

इतर अमेरिकन तपासणी-यंत्रणांना परिमाणाची इतकी खात्री नव्हती. न्यूमेकच्या एकूण दहा चौकशा झाल्या; पण एकाही चौकशीतून डॉ. शापिरो याच्याविरुद्ध कोणताही आरोप ठेवण्याइतका पुरावा मिळाला नाही. वास्तविक परिष्कृत युरेनियम विनापरवाना दुसऱ्या कोणत्याही देशाच्या सरकारला देणे हा देहांत शासनाइतका गंभीर गुन्हा होता; पण शापिरो याच्यावर साधा फौजदारी खटलाही भरण्यात आला नाही!

तरीही या अणुइंधननाट्याचा मुख्य सूत्रधार डॉ. शापिरो हेच होते. रसायनशास्त्रात पीएचडी घेतलेले, ६० वर्षांचे हे गृहस्थ आधी


**DIAMOND GROUP**

Ward 9, H. No. 637/1, Station Road,
ICHALKARANJI

*For* **quality Warping, Sizing, weaving, Bleaching, & Mercersing.**

*Phone : 2442*

शास्त्रज्ञ म्हणून यहुदी संघटनेचे सक्रिय कार्यकर्ते होते. इस्रायलमधील शास्त्रीय कामासाठी पैसा, माहिती आणि उपकरणे मिळवून देण्यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केलेले होते. इस्रायली आणि अमेरिकन अधिकाऱ्यांशी त्यांचा निकट संपर्क होता. वेस्टिंगहाउस येथे ॲडमिरल हायमन रिकव्हर्स यांच्या पहिल्या परमाणुशक्तिचलित पाणबुडीच्या भट्टीवर त्यांनी काम केले होते.

१९५७ मध्ये अमेरिकेच्या परमाणु-कार्यक्रमातील दोन अनुभवी मित्रांच्या सहकार्याने डॉ. शापिरो यांनी अपोलो येथे न्यूमेकची स्थापना केली. आयजनहॉवर यांनी 'शांततेसाठी अणु-कार्यक्रम' जाहीर केला होता. तेव्हा अनेक अणुबीज-केंद्रे अस्तित्वात यावयाची हे उघडच होते. म्हणून न्युमेकने अशा बीजकेंद्रांना लागणारे युरेनियम-ऑक्साइड इंधन तयार करावे असे शापिरोंनी ठरविले.

न्युमेकचा धंदा भरभराटीला आला. शापिरो हे अणु-इंधन-उद्योगातील एक बडे प्रस्थ बनले. बीजकेंद्रांखेरीज त्यांना परमाणु-शक्तिचलित पाणबुड्यासाठी सरकारी मालकीच्या अण्वस्त्रोपयोगी युरेनियमचे इंधनात रूपांतर करण्याचे कंत्राटही मिळाले. परमाणु-शक्तिचलित रॉकेटसाठी इंधन तयार करून देण्याचे कामही त्यांना मिळाले. परदेशातही न्युमेकला मोठमोठी गिऱ्हाइके मिळाली आणि अमेरिकन सरकारच्या परवान्याने न्युमेक अत्यंत परिष्कृत युरेनियम फ्रान्स, जर्मनी, नेदरलॅण्डस् आणि जपान या देशांना पाठवू लागले. तोकाइ-मुरा येथील जपानच्या पहिल्या प्लुटोनियम-इंधन प्रयोग-

शापिरो यांना अनेकदा कानपिचक्याही देण्यात आल्या होत्या. संयंत्राला इतक्या इस्रायलींनी भेटी द्याव्यात आणि त्यांच्या कर्मचाऱ्यात एक इस्रायली धातुशास्त्रज्ञही असावा याबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली होती.

१९६४ मध्ये चीनने आपल्या पहिल्या अणुबाँबचा स्फोट केला आणि सीआयएला शंका आलीच की, चीनला अपोलो येथील डॉ. शापिरो यांच्या न्युमेकमधूनच त्यासाठीचे शस्त्रोपयोगी युरेनियम मिळाले असावे.

आणि १९६४ व ६५ मध्ये अणुशक्तिमंडळाने केलेल्या चौकशीत जेव्हा चोख हिशोबाअंती त्यांना आढळून आले की, न्युमेकमधून सुमारे ३६१.६ पौंड युरेनियम गायब झालेले आहे, तेव्हा सर्वांचेच धाबे दणाणले! एवढ्या युरेनियममधून तर अनेक अणुबाँब तयार केले जाऊ शकतात. हे युरेनियम कुठे गेले असेल? कुणी नेले असेल? कुणी जाऊ दिले असेल? डॉ. शापिरोंभोवती संशयाचे काळे ढग दाटी करू लागले.

शापिरो मात्र, 'त्यात काय मोठेसे' या थाटात म्हणाले, 'काय की बुवा, कदाचित् अनवधानाने टाकाऊ किरणोत्सर्गी द्रव्याबरोबर ते गाडून टाकले असेल!' खोदाखोदी झाली. काही युरेनियम हाती लागले; पण ते होते गायब असलेल्याच्या दहा टक्क्यांइतकेच! 'मोठ्या भांड्यात पदार्थ शिजवला की भांड्याला तो थोडा-फार लागतोच की!' असे यावर स्पष्टीकरण शापिरोंनी दिले. मंडळाने ते

**धंद्याचा भाग म्हणून न्युमेकला अमेरिकेतील अनेक अतिगुप्त प्रक्रियाकेंद्रातही**

शाळेचा आराखडाही न्युमेकनेच तयार करून दिला.

सुरुवातीला इस्रायलचे तंत्रविज्ञान-सल्लागार आणि प्रशिक्षण व खरेदी यांचे सहायक-केंद्र म्हणून न्युमेक काम करीत असे. नंतर खुद्द इस्रायलमध्येच न्युमेकने आपली एक शाखा उघडली. स्ट्रॉबेरी, इतर फळफळावळ आणि भाजीपाला खराब होऊ नये म्हणून त्याच्यावर माफक किरणोत्सर्जनाचा प्रयोग करणे हे या शाखेचे काम होते. या शाखेला इंग्रजी आद्याक्षरानुसार इसोरॅड म्हणत. या उपक्रमात इस्रायलचे अणुशक्ति-आयोग हे शापिरो यांचे भागीदार होते.

खुद्द न्युमेकमध्ये किमान एक इस्रायली धातुशास्त्रज्ञ काम करीत होता आणि अपोलो येथील त्याच्या संयंत्राला इस्रायली अधिकारी वरचेवर भेटी देत होते. त्यात वॉशिंग्टनमधील इस्रायली वकिलातीतील वैज्ञानिक ॲटेशेही असत.

धंद्याचा भाग म्हणून न्युमेकला अमेरिकेतील अनेक अति-गुप्त-प्रक्रिया-केंद्रातही मुक्तद्वार होते. शस्त्रोपयोगी प्रतीचे प्लुटोनियमचे आणि अत्यंत परिष्कृत युरेनियमचे मोठमोठे साठेही त्याला हाताळायला मिळत. अर्थातच यासाठी न्युमेकला अमेरिकेच्या अणुशक्ति-मंडळाचा रीतसर परवाना होता; पण न्युमेकच्या संयंत्रात सुरक्षाव्यवस्था अतिशय ढिसाळ होती. अनेकदा त्याबाबत मंडळाच्या अहवालात नोंदीही येत होत्या. विशेषत:, 'सरकारी मालकीचे युरेनियम आणि न्युमेकचे व्यापारी-साठे यांची सरमिसळ करता आणि आल्या-गेल्या युरेनियमच्या नीट नोंदीही ठेवायला विसरता म्हणून

अंशत: स्वीकारले; पण तरीही बाकीच्या २०० पौंडांचा हिशोब त्यांनी शापिरो यांच्याकडे मागितला.

तसे पाहिले तर चोरी करायला किंवा लहान लहान पॅकेट्समधून बाहेर पाठवायला हे युरेनियम काही तसे फार नव्हते. पोरासोरांनीही हे काम केले असते; पण ते जर का कुणा परदेशाच्या हाती गेले असेल वा दिले असेल, तर तो त्यातून कित्येक बाँब बनवू शकणार होता. डॉ. शापिरो यांनी किंवा न्युमेकमधल्या कुणी दुसऱ्याने ते जाऊ दिले असेल तर त्याला अणुशक्ति-कायद्यानुसार देहांताचीच शिक्षा झाली असती!

असे असूनही का कुणास ठाऊक इतका झाडझडून आणि कसून या गायब युरेनियमचा शोध घ्यायला हवा होता, तितका काही तो घेण्यात आला नाही. अणुशक्तिमंडळाने दोनदा, अमेरिकन काँग्रेसने स्वतंत्रपणे आणि एफबीआयने जुजबी रीतीने या प्रकरणाचा तपास केला; पण हिशोब नीट ठेवला नाही, नोंदी चोख नाहीत- अशासारख्या शेऱ्यांखेरीज न्युमेकवर किंवा डॉ. शापिरो यांच्यावर कोणतेही बालंट आले नाही. फक्त 'हरवलेल्या' या युरेनियमची जवळजवळ दहा लक्ष डॉलर्स किंमत डॉ. शापिरो यांच्याकडून वसूल करण्यात आली. त्यांनं सुरक्षा-व्यवस्थेत असलेला मुक्त-प्रवेश-परवाना काढून घेण्यात आला. शापिरो यांनी न्युमेकमधला आपला हिस्सा ॲटलांटिक रिचफिल्डला आणि त्या कंपनीने तो अणुभट्टीनिर्मात्या बॅबकॉक आणि विलकॉक्स या कंपनीला विकून टाकला. डॉ. शापिरो

पुन्हा वेस्टिंग हाउस कंपनीत नोकरीला परत गेले. या प्रकरणावर पडदा टाकण्यात आला.

पण पुन्हा एकदा शापिरो यांच्याकडे सीआयएची नजर वळलीच. इस्रायलला शस्त्रोपयोगी युरेनियम कुठून तरी मिळाल्याचा ' वास ' सीआयएला लागला. त्याच सुमारास न्युमेकमधून २०० पौंड युरेनियम बेपत्ता झालेले होते. पिट्सबर्ग येथील आपल्या घरात शापिरो यानी अमेरिकेतील ज्यू वैज्ञानिकांची एक बैठक बोलावली होती, तिला इस्रायलचा एक शास्त्रज्ञ–अधिकारी हजर होता आणि त्याने शास्त्रज्ञाना इस्रायलसाठी काही विशिष्ट माहिती मिळवण्यास सांगितले होते अशी माहिती सीआयएला मिळाली. नंतर डॉ. शापिरो त्याच इस्रायली अधिकाऱ्याला पीट्सबर्ग–विमानतळावर भेटायला गेले होते असेही सीआयएला कळले होते. ही माहिती सीआयएला एफबीआयकडून मिळाली होती. तरीही परिस्थितिजन्य असा कोणताही पुरावा शापिरो याच्याविरुद्ध मिळाला नाही आणि ते ' हरवलेले ' युरेनियम डॉ. शापिरो यांनीच पळवले हे सिद्ध झाले नाही ! प्रकरण १९७५ त बंद करण्यात आले आणि कोणताही खटला उभा राहिला नाही. त्यानतरही प्रसंगाप्रसंगाने कितीदा तरी चौकशा व तपास झाले; पण शापिरो यांच्याविरुद्ध काहीही निघाले नाही !

तरीही वॉशिंग्टनमधल्या वरिष्ठ तज्ज्ञांनी आम्हाला सांगितले की, इस्रायलने प्रत्यक्षात परिष्कृत युरेनियम मिळवले होतेच. सीआयएचे माजी उपसंचालक कार्ल डकेट यांनी आम्ही घेतलेल्या एबीसी–वार्तापटातील मुलाखतीत जाहीरपणे म्हटले होते- ' या समस्येवर माझ्याबरोबर काम करणाऱ्या वरिष्ठ विश्लेषकाचे मतही माझ्या मताशी... आणि सीआयएमधील बहुतेक निष्कर्षांशीही ..ततोतंत जुळणारे होते की...शस्त्रनिर्मितीसाठी लागणारे परिष्कृत युरेनियम इस्रायलला मिळाले न्युमेककडूनच !'... 'याच माहितीच्या आधारे सीआयएने १९६८ सालीच कळविले होते की, इस्रायल अणुबाँब तयार करू शकत आहे !'

पण शे-दोनशे पौंड युरेनियमने काय होते आहे? इस्रायलला आपल्या शस्त्रास्त्रागाराचा विकास करण्यासाठी आणखी २०० टन युरेनियम हवे होते. सहा दिवसांच्या युद्धाने दाखवून दिले होते की, याबाबत कुणावरही विसबून राहाता येणार नाही. भरवश्याच्या म्हशीला टोणगेच होण्याचा संभव जास्त. म्हणून इस्रायलने परमाणुगुपिते हस्तगत करण्याच्या बाबतीत सर्वांत मोठी राज्यक्रांती घडवावी तसे आपल्या ' प्लुम्बॅट अभियानाने ' घडवून आणले आणि २०० टन युरेनियम हस्तगत केले.

' प्लुम्बॅट मोहीम ' इतकी अप्रतिम वठली की, इस्रायलच्या अरब आणि इस्लामिक शत्रूंनीही तसलीच अचाट साहसे हाती घेण्याचे ठरविले. ती साहसकथा श्वास रोखून ऐकावी अशीच आहे, स्तिमित करणारी आहे, एखाद्या कादंबरीसारखी सरसही आहे. ती साहसकथा बरोबर आहे असे म्हणावे लागते. कारण ती अनेक पारायणे होत सर्वश्रुत झाली आहे. ती चूक असावी असेही म्हणावे लागते. कारण तिच्यात अविश्वसनीय रहस्यकथेचा भाग अधिक आहे. तो आपल्याला सांगतो की, इस्रायलच्या साहसवीरांनी भर समुद्रातून एक जहाज कसे पळविले आणि त्यातून हवे ते युरेनियम कसे हस्तगत केले.

पण वस्तुस्थिती अशी आहे की, इस्रायलीनी ते युरेनियम चोरले नाही. त्यानी ते विकत घेतले आणि त्याची किंमत पुरेपूर आधीच मोजली होती. फक्त यासाठी त्यानी बरीच गुंतागुंतीची आणि काहीशी चमत्कारिक बेनामी व्यवस्था केली. त्यानी ते जहाज पळवले नाही, ते त्यांच्याच मालकीचे होते. लंडनच्या ' संडे टाइम्स ' च्या अंतर्भेदी चमूने व्यवस्थित माहिती काढून ती ' दि प्लुम्बॅट अफेयर ' या पुस्तकात बव्हंशी प्रसिद्धही केली आहे.

पूर्वी आम्ही ज्या बेल्जोन्युक्लिअर कंपनीचा उल्लेख केला आहे त्याच कंपनीपासून ही कहाणी सुरू होते. त्या कंपनीची मूळ संस्था होती ' सोसायटी जनरल द बेल्जिक. ' या सोसायटीचे बेल्जियन कॉंगोमधील बत्तेवर जबरदस्त नियंत्रण होते. खनिज पदार्थांचा व्यवहार करणाऱ्या आपल्या एका शाखेमार्फत या सोसायटीचे नियंत्रण राजसत्तेवर होते. ती शाखा युरेनियम ऑक्साइडच्या पर्वतावरच जणु काही विराजमान होती या पदार्थालाच ' पिवळी पोळी ' असेही म्हणत. अँन्टवर्पजवळ हे युरेनियम ऑक्साइड कणग्यात भरून सुखरूप व सुरक्षित ठेवले होते.

इस्रायलला हेच युरेनियम विकत हवे होते; पण सरळ सौदा करून ते घेणे अशक्य होते. कारण दिमोना भट्टी आंतरराष्ट्रीय नियंत्रण आणि तपासणीसाठी इस्रायलने खुली केलेली नव्हती आणि युरोपच्या सामायिक बाजाराची परमाणु-संस्था ' युरेटम ' अशा विक्रीस कधीही राजी झाली नसती. म्हणून इस्रायलीना कुणाच्या तरी आडून हा सौदा करणे भाग होते. ज्याच्या आडून हा सौदा करायचा त्याच्याबद्दल कुणालाही संशय येऊनही चालणार नव्हते. म्हणून इस्रायलने दुसऱ्या महायुद्धातील वीर हर्बर्ट शुल्झन याच्या पश्चिम जर्मनीतील आसमारा कॅमी या फर्मची निवड केली. ही लहानशी कंपनी होती. आधी १९६४ मध्ये इस्रायलीनी शुल्झनला येरुशलेममध्ये सुटी घालवण्यासाठी निमंत्रणही दिले. त्याचा सर्व खर्च केला. मग त्याच्या फर्मकडे काही किरकोळ ऑर्डरीही नोंदविल्या; पण आता मात्र त्यांनी शुल्झनला ' सोसायटी जनरल ' कडून २०० टन युरेनियम ऑक्साइड विकत घेशील का म्हणून विचारले. त्याने हो म्हणताच ऑर्डर नोंदवायला सांगितले.

आसमारासारखी लहानशी फर्म आजवर औद्योगिक साबण, सॉफ्टनर्स, डीकन्टॅमिनन्टस यासारख्या वस्तूच विकत आलेली आहे आणि तिने यापूर्वी कधीही युरेनियम विकत घेतलेले नाही, या गोष्टीची दखल ' सोसायटी जनरल ' ने काही घेतली नाही. त्यांनी फक्त एकच प्रश्न विचारला–किंमती चुकती करण्याची हमी काय ? शुल्झनने झ्यूरिचमधल्या एका लहान बॅंकेचे नाव सांगितले. सोसायटी जनरलच्या अधिकाऱ्यांनी बॅंकेकडे चौकशी केली. शुल्झनच्या आस-

**मुक्तद्वार होते. प्लुटोनियम-युरेनियमचे मोठमोठे साठेही त्याला हाताळायला मिळत.**

मारा कंपनीच्या खात्यावर आपल्याकडे ४० लाख डॉलर्स जमा असल्याचे बँकेने सांगितले. ही रक्कम इस्रायलने आधीच त्या बँकेत ठरल्याप्रमाणे जमा केलेली होती.

पण युरेटमला पटविणे तितके सोपे नव्हते. त्यांनी प्रश्न विचारला, एका लहानशा रासायनिक कंपनीला एवढ्या युरेनियमचे करावयाचे आहे तरी काय ?' पण शुल्झनने त्यांना सांगितले, 'आमची कंपनी लवकरच फार मोठ्या प्रमाणावर खनिजरसायनांचे उत्पादन हाती घेणार असून त्यासाठी आम्हाला युरेनियमचा वापर करायचा आहे. महान सामर्थ्यशाली 'सोसायटी जनरल' ने त्याला पाठिंबा दिला आणि १९६८ च्या ऑक्टोबरात हा सौदा पक्का झाला. या युरेनियमवर खास प्रक्रिया करण्याची परवानगीही युरेटमने आसमाराला दिली आणि हे युरेनियम जहाजातून जेनोआला आणि तिथून मिलान येथील सायका नावाच्या रोगण आणि रासायनिकांच्या कंपनीला पोचते करण्याचा परवानाही दिला.

जहाजाची व्यवस्था करणे त्याहून सोपे होते. १९४७ मध्ये अरबांविरुद्धच्या युद्धात ब्रिटिशांनी घातलेल्या नाकेबंदीतूनही इस्रायला शस्त्रास्त्रे नेऊन पोहोचवण्याचे काम केलेल्या आपल्या एका जुन्या मित्राला इस्रायलींनी पाचारण केले. त्याच्याकडे अँण्टवर्पहून भूमध्य सागरात २०० टन युरेनियम घेऊन येण्यास समर्थ असे जहाज मिळवण्याचे काम सोपवण्यात आले. या तुर्कस्थानात जन्मलेल्या इस्रायलच्या जुन्या मित्राचे नाव होते–बरहॅम यॅरिसल.

त्याने शोध केला आणि २६००–टनी जर्मन जहाज शीसबर्ग मिळवले, जहाज दहा वर्षांचे होते. किंमत पडली १ लक्ष ६० हजार पौंड. इस्रायलींनी ती हॅम्बर्गमधील एका बँकेमार्फत चुकती केली. यॅरिसलने काही पुढ चालक नेमले. त्यातील काही स्पेनचे होते, काही पोर्तुगालचे तर काही मारोक्कोचे. पीटर बॅरो नावाचा एक आंग्लभाषी कॅप्टनही त्याने नेमला. हा तरुण कप्तान या जहाजचालकासह नेपल्सला प्रवासावर गेला आणि तिथून रॅाटरडॅमला परत आला. तिथे त्याने कोणतेही कारण-बिरण न देता सर्व चालकांना तेथेच थांबायचे आदेश दिले.

येथून पुढे जे घडले तोच इस्रायलच्या योजनेचा मुख्य भाग होता. सोसायटी जनरलच्या गोदामापासून अँण्टर्पबंदरापर्यंन्त आणि तिथून जेनोआ आणि मिलानपर्यन्त युरेनियम नेण्याची परवानगी युरेटमने आसमाराला दिली होती. शुल्झनने बेल्जियमच्या एका अत्यंत नाणावलेल्या मालवाहतूक कपनीला हे काम दिले की, तिने सोसायटीच्या गोदामातून माल उचलायचा आणि खास आगगाडीने अँण्टवर्पला नेऊन तो जहाजावर चढवायचा. हे काम त्या कंपनीने चोख केले. अँण्टवर्पच्या किनाऱ्याला शुल्झनचे शीसंबर्ग जहाज उभे होतेच आणि त्याचे सर्व चालक आणि खलाशी नवे होते. विशेष दक्षतेने सीलबंद केलेल्या ५६० तेलपिंपांतून ते युरेनियम शीसंबर्गवर चढविण्यात आले. प्रत्येक पिंपावर गूढ शब्द लिहिलेला होता–'प्लम्बॅट'. १७ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीनंतर त्या तथाकथित कॅप्टन बॅरोच्या मार्गदर्शनाखाली शीसंबर्ग युरेनियम घेऊन निघाले जेनोआकडे; पण ते जहाज आणि त्यातील माल जेनोआला कधीच पोहोचला नाही; जेनोआ–ऐवजी कॅप्टन बॅरो ते जहाज पूर्वभूमध्यसमुद्रात सायप्रस आणि तुर्कस्थान यांच्या मध्यात घेऊन गेला. तेथे एक इस्रायलचे एक मालवाहू जहाज तोफा बसवलेल्या होड्याच्या पहाऱ्यात आधीच आलेले होते. शीसंबर्गवरील सर्व माल त्या जहाजावर चढविण्यात आला.

इस्रायलींना हवे होते ते युरेनियम मिळाले आणि कुणालाही त्याचा पत्ता लागला नाही ! काही तासांनी, २ डिसेंबरला शीसंबर्ग जहाज इस्कदरन या लहानशा तुर्की बदराला लागले. तिथून ते पालेरमोला गेले. तिथे एका नव्या कॅप्टनने पुन्हा त्याच स्पॅनिश, पोर्तुगीज आणि मोरोक्कन चालकांसह पुढचा प्रवास सुरू केला. इस्रायलने सर्व मोहीम कशी बिनबोभाट आणि बेमालूमपणे पूर्ण केली!

सहा महिन्यांनंतर 'युरेटमला' जाग आली. त्यानी सायका कंपनीला विचारले– 'युरेनियम पोहोचल्याचे कागदपत्र अद्याप पाठविले नाहीत ते ?' सायका कंपनीने काही तरी मोघम उत्तर दिले. जून १९६९ मध्ये आसमारा केमी कंपनीने 'युरेटमला' कळविले की, ते यरेनियम जेनोआ आणि मिलानला पोहोचलेलेच नाही!

'मग ते गेले तरी कुठे ?' आसमाराने कळविले की, त्याची पूर्ण किंमत आम्ही चुकती केली होती. ते युरेनियम आम्ही आमच्या एका गिऱ्हाइकाच्या आदेशाने विकत घेतले होते. या गिऱ्हाइकाची आधीची सूचना होती की, ते मिलानमध्ये सायका कंपनीकडे पाठवावे; पण नंतर त्याने आपला विचार बदलला.

आसमाराचे हे 'गिऱ्हाइक' होते तरी कोण ? युरेटमने एक कडक पत्र लिहून विचारणा केली. उत्तर आले बॅानमधल्या एका बड्या वकिलाच्या फर्मकडून. 'आसमाराच्या गिऱ्हाइकाचे नाव "व्यापारिक–गुपित" आहे आणि ते जाणून घेण्याचा युरेटमला कोणताही अधिकार पोचत नाही !'

आपली चांगली आगभर झाल्याचे युरेटमला कळून आले. जगात हसे होण्याच्या भीतीने प्रकरण दडपून टाकण्यात आले. अशी आहे इस्रायलने युरेनियम कोठून आणि कसे मिळवले त्याची साहसकथा !

हे सर्व प्रकरण आणखीनच मसालेदार बनविणारी घटना जुलै १९७३ मध्ये घडली. म्युनिकच्या ऑलिंपकमध्ये ब्लॅक सप्टेंबरच्या दहशतवाद्यांनी अकरा इस्रायली खेळाडूंचे मुडदे पाडले होते. त्याच्या सूडाखातर इस्रायलच्या एका धडक तुकडीने नॉर्वेच्या लिलचॅमर या लहानशा गावात उत्तर आफ्रिकेतील अहमद बुचीकी नावाच्या एका अरबाला गोळ्या घातल्या होत्या. त्यांना मारायचे होते अली हसन सलामे नावाच्या माणसाला. बुचीकी तोच आहे असा धडकतुकडीचा गैरसमज झाला. या प्रकरणात झालेल्या धरपकडीत डॅन आरबेल नावाचा एक इस्रायली हेरही पकडला गेला.

झालेल्या चौकशीत दिलेल्या जबानीत या आरबेलने आणखीनच खळबळ उडवून दिली त्याने सांगितले की, 'ते शीसंबर्ग जहाज माझे होते आणि ते युरेनियम घेऊन इस्रायलला गेले.' म्हणजे आरबेलचाही वापर इस्रायलची त्या जहाजावरील बेनामी मालकी लपविण्यासाठीच केला होता. याला म्हणतात नाट्य !

इस्रायलने अर्थातच या सर्व प्रकरणी कानावर हात ठेवले. पश्चिम आशियात अण्वस्त्राचा प्रादुर्भाव करणारे इस्रायल हे पहिले राष्ट्र कधीच नसेल हाच मंत्र ते घोकत आहेत. बरोबरच आहे. जवळच्याच सायप्रसमध्ये ब्रिटिशांनी आपले अणुबाँब साठवले आहेत. अमेरिकन आरमाराचा अण्वस्त्रसज्ज सहावा तांडा पूर्वभमध्यसागरात सतत

गस्त घालतोच आहे. तेव्हा इस्रायल काही पहिले राष्ट्र नक्कीच नसणार आहे, दुसरेदेखील नसणार आहे. असेलच तर ते तिसरे राष्ट्र असेल !

एक छोटेसे राष्ट्रही अणुबॉंब तयार करू शकते हाच यातील बोध आहे. अणुबॉंब हस्तगत करू इच्छिणाऱ्या इतराना अनुकरण करण्याचा मोह व्हावा असे हे भयनाट्य आहे.

¤

# अणुयुगाची – अण्वस्त्रप्रसारयुगाची – सुरुवात

१८ मे १९७४. राजस्थानच्या विशाल वाळवंटातील वापरात नसलेल्या एका भागातील सकाळ. पंतप्रधान इंदिरा गांधी साधी साडी नेसून आणि उन्हाचा काळा चष्मा घालून उत्सुकतेने पहात होत्या. ८ वाजून पाच मिनिटे झाली आणि १५ किलोटनचा उद्रेक करीत एक भयकर स्फोट झाला. हा उद्रेक हिरोशिमावर टाकण्यात आलेल्या अणुबॉंबइतका होता. तो त्याच्यापेक्षा बऱ्याच लहान परमाणु-उपकरणाने केला होता. त्या वाळवटातील आसमंत त्या स्फोटाने हादरले आणि वाळूची एक मोठीच टेकडी उसळून आकाराला आली. तोच दिल्लीच्या साउथ ब्लॉकमधल्या कार्यालयात परवलीचे शब्द खणाणले––' बुद्ध स्मित करतो आहे. '

' भारताने शांततेसाठी केलेला अणु–विस्फोट आहे हा. त्यातले काहीही परदेशातले नाही! ' भारतीय आवर्जून सांगत होते. भारताच्या मते गेली जवळजवळ ३० वर्षे–अगदी दुसरे महायुद्ध संपले तेव्हा-पासून सुरू झालेल्या अतिशय जिकिरीच्या प्रयत्नाचे हे फळ होते; पण जग म्हणत होते– ' ही दुसऱ्या अणुयुगाची, अण्वस्त्रप्रसारयुगाची सुरुवात आहे. '

१९७९ मध्ये लंडनहून जॉन कॅंडलर यांनी प्रकाशित केलेल्या रॉबर्ट जंक याच्या ' दि न्युक्लियर स्टेट ' या पुस्तकात म्हटले आहे– 'जगातील मूठभरच अण्वस्त्रधारी देश एकमेकावर अंकुश राखून होते, ते युग इतक्या अल्पवाधीतच समाप्त झाले आहे आता जगभर परस्पराशी अण्वस्त्रसज्जतेची अमर्याद स्पर्धा करण्याचे युग सुरू होत आहे. या वेगाने या शतकअखेरीस प्रादेशिक आणि स्थानिक संघर्षात देखील अणुबॉंबचा सर्रास वापर होण्याची शक्यता दिसू लागली आहे...'

या स्फोटाने भारताच्या समस्त प्रतिमा तडून गेल्या. जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश, नेहरू आणि महात्मा गाधीचा भारत, अहिंसा आणि अलिप्तता याची मूळ वेदी, जागतिक परमाणुनिरस्त्री-करणाची पवित्र हाक देणारी भूमी, अत्यंत दारिद्र्याने आणि रोग-राईने गाजलेला देश, परमाणु-ऊर्जा-विकासासाठी राबवण्याची स्वप्ने पाहणारा आणि शाततेसाठीच अणुशक्तीचा उपयोग करण्याचे आश्वासन देत आलेला भारत... या सर्व प्रतिमा भंगून गेल्या. त्याच भारताने अल्पविकसित देशामध्ये सर्वांआधी परमाणु–उपकरणाचा स्फोट केला होता.

भारताच्या या स्फोटाची आणि त्यासाठी हाती घ्यावयाच्या परमाणु–कार्यक्रमाची सुरुवात १९४५ साली त्याला स्वातंत्र्य मिळ-ण्याच्याही आधीची आहे. टाटा कुटुंबाच्या पैशाने इन्स्टिट्यूट फॉर फंडामेंटल रिसर्चची स्थापना त्या वर्षी झाली. केंब्रिज प्रशिक्षित ख्यातनाम भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा तिचे संचालक होते. भाभानी या संस्थेला मूलभूत संशोधनाचे केंद्र आणि नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताच्या सर्वंकष परमाणु–कार्यक्रमाची झेप–भूमी बन-विले. नेहरूंच्या पाठिंब्याने त्यानी भारताला परमाणुक्षेत्रात इतक्या महत्त्वाकांक्षी मार्गावर अग्रेसर केले की सगळे जग चकित झाले.

भाभाच्या नेतृत्वाखाली भारताने आपल्या युरेनियम आणि थोरियम खनिजाचा पुरेपूर वापर केला ही खनिजे खाणीतून बाहेर काढून साफ करण्याच्या गिरण्या त्यांनी सुरू केल्या. यासाठी भारतात एक नवा उद्योगच सुरू झाला. तुर्भे येथील भारताच्या दोन लहान संशोधनभट्ट्या आणि काही हेवी–वॉटर–संयंत्रे उभारली. त्याच-प्रमाणे इंधननिर्मितीचे सयंत्रही स्थापन केले.

भाभा याचे सर्वांत मोठे यश हे आहे की, त्यांनी जगातल्या तिन्ही बड्या परमाणु–निर्यातक देशांचा आपल्या कार्यक्रमासाठी पाठिंबा आणि मदत मिळवली. हे तीन देश आहेत– कॅनडा, अमेरिका आणि फ्रान्स ! बहुधा जगातील इतर कोणत्याही देशाने, त्यातल्या त्यात कोणत्याही अल्पविकसित देशाने आपल्या मुलकी परमाणु-कार्यक्रमासाठी – किंवा लष्करी परमाणुक्षमता निर्माण करण्याच्या कार्यक्रमासाठी या देशांकडून अशी मनःपूर्वक मदत मिळवली नसेल !

इस्रायलने दिमोना येथे उभारली तसल्याच प्रकारची ४० औष्णिक मेगॅवॅट क्षमतेची ' सायरस ' अणुभट्टी भाभानी कॅनडाकडून मिळवली आणि १९६० च्या जुलैत तीत उत्पादनही सुरू केले. ' सायरस ' ही हेवी–वॉटरभट्टी होती आणि नैसर्गिक युरेनियमचा वापर इंधन म्हणून करून तीत प्लुटोनियम तयार करता येत असे. हेच प्लुटोनियम भारतीयानी आपल्या ' शाततेसाठी परमाणु-विस्फोटात ' वापरले. कोलंबो योजनेच्या अंतर्गत कॅनडाने या भट्टीचा परकी चलनातील सारा खर्च स्वतः सोसला आणि आतरराष्ट्रीय तपासणोची किंवा हमीची कोणतीही मागणी केली नाही. या भट्टीतून निघणाऱ्या सर्व पदार्थांचा वापर फक्त शातताकार्यासाठीच केला जाईल, एवढेच साधे वचन भारताने दिले.

अशाच प्रकारे कोणतीही हमी न मागता अमेरिकेने ' सायरस 'साठी महत्त्वाचे असे २० टन हेवी वॉटर दिले. इतकेच नव्हे आणखी सहा प्रायोगिक हेवी–वॉटर–भट्टीसाठी आणि दोन परिपूर्ण लाइट-वॉटर-भट्ट्यासाठी लागणारे हेवी वॉटरही दिले. या भट्ट्या तारापूरला होत्या. तेथे २०० मेगॅवॅट अणुवीज तयार होणार होती. दोन्ही भट्ट्यांच्या उभारणीचा सुमारे ११.८ कोटी डॉलर्सचा खर्च अमे-

रिकेच्या एजन्सीजने दिला आणि या भट्ट्यांना लागणारे हलके परिष्कृत युरेनियम ३० वर्षे पुरवीत राहण्याचा करारही केला. शिवाय १३०० भारतीयाना परमाणु-तंत्रमंत्राचे प्रशिक्षण देण्याचेही मान्य केले. याहा पुढे जाऊन अमेरिकेने तुर्भे येथे बाँबनिर्मितीचा मार्ग प्रशस्त करणारे एक पुनर्प्रक्रिया-संयंत्रही दिले. 'सायरस' भट्टीतून मिळणाऱ्या प्लुटोनियमवर पुन्हा प्रक्रिया करण्याचा मार्ग त्यामुळे मोकळा झाला. २४ भारतीयांना या प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्याचेही अमेरिकेने स्वीकारले. फ्रान्सनेही भारताला परमाणुक्षेत्रात सहकार्य देण्याचा करार १९५१ मध्ये केला. त्यात विशेषेकरून भारतीय रसायनशास्त्रज्ञांना आणि धातुशास्त्रज्ञांना खास प्रशिक्षण देण्याची व्यवस्था होती. या प्रशिक्षणात वापरलेल्या परमाणु-इंधनातून प्लुटोनियम कसे झाळून घ्यावे याचे शिक्षणही होते असे डॉ. पेरिन यांनीच आम्हाला दिलेल्या मुलाखतीत सागितले.

अशा प्रकारे तिघा बड्या परमाणु-देशांकडून मदत घेऊन भाभा यांनी जरी मुलकी परमाणु-कार्यक्रमाची सर्वंकष रूपरेखा तयार केली असली, तरी त्यांचा कल अण्वस्त्रे बनविण्याकडेच निर्विवादपणे होता आणि त्यांना मदत करणाऱ्या देशांना याची पूर्ण कल्पना होती. १९५८ मध्येच ब्रिटिश नोबेल पारितोषिकाचे मानकरी लॉर्ड ब्लॅकेट यांना भाभांनी सागितले होते की, 'मला अण्वस्त्रे बनवायची आहेत!' आपल्या इतर मित्रानाही ते सांगत असत की, 'अण्वस्त्र-निर्मितीचा मार्ग आमचा आम्हाला मोकळा राखायचा आहे.' फ्रेंच अणुशक्ति-विध्वंसक कार्यासाठी करू नये अशा आशयाची निःसंदिग्ध विधाने जाहीरपणे केली असली, तरी पंतप्रधान या नात्याने मात्र त्यांनी भाभांच्या नेतृत्वाखालील परमाणु-कार्यक्रमाला नेहमीच पाठिंबा दिला आणि 'सायरस' भट्टी किंवा पुनर्प्रक्रिया-संयंत्र याबाबत कोणतीही हमी द्यायचे कटाक्षाने टाळले. भारताचा परमाणु-कार्यक्रम हा शातता-कार्यासाठीच राहील अशी वचने देताना त्यांनी त्यात एक पळवाट ठेवली आणि ती म्हणजे-'शांतता-कार्यासाठी अणु-विस्फोट' करण्याची. अणुबाँबच्या पहिल्या निर्मितीपासून असे विस्फोट शास्त्रज्ञानी व इंजिनियरानी बंदरे खोल करण्यासाठी, नद्याच्या प्रवाहाला नवे वळण देण्यासाठी, धरणाची जलाशये खोदण्यासाठी वापरता येतील का ते पाहण्याचे नाना प्रयोग अनेक देशातून केले आहेत. अमेरिकेने आणि रशियाने असे प्रयोग खूप केले आहेत; पण असे 'शांतता-कार्यासाठी अणुविस्फोट' आणि अण्वस्त्राचे विस्फोट यात पुष्कळ फरक असतो. म्हणूनच भारताने मोठ्या हुषारीने 'शांतता-कार्यासाठी विस्फोट' करण्याची पळवाट राखून ठेवली. त्यायोगे त्याने शांतता आणि विस्फोट दोन्ही मार्ग आपल्यासाठी खुले ठेवले.

१९७९ साली विकासप्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या भारतीय पत्रकार श्याम भाटिया यांच्या 'इंडियाज न्युक्लिअर बाँब' या पुस्तकात फारच उत्कृष्ट अभ्यास सादर केला आहे. ते म्हणतात-'प्रत्यक्षात अणुबाँब तयार करण्यासाठी कामास लागायचा निर्णय ऑक्टोबर

## 'अठरा महिन्यांच्या आत भारतीय शास्त्रज्ञही अणुबाँब तयार करू शकतील!'

मंडळाच्या परराष्ट्र-संबंधविभागाचे माजी प्रमुख डॉ. गोल्डश्मित यांनी तर आम्हाला अगदी स्वच्छ शब्दांत सागितले होते-'भाभाना नेहमी बाँबच हवा होता आणि भारत १९६८ नंतर केव्हाही-तो बनवू शकला असता!'

पण भाभांच्या या उत्साहावर पं. नेहरूंनी सतत अंकुश ठेवला होता. परमाणु-निरस्त्रीकरणाचे आपण मोठेच पुरस्कर्ते आहोत असे ते अभिमानाने सागत; पण अशा या शातिदूत नेहरूनीही परमाणु-अस्त्रनिर्मितीचा पर्याय आपल्यासाठी खुलाच राखला होता. जून १९४६ मध्येच नेहरूनी मुंबईत जाहीरपणे म्हटले होते-'भारतीय शास्त्रज्ञ अणुशक्तीचा उपयोग विधायक कामासाठीच करतील अशी मला आशा आहे; पण भारतावर आक्रमणाचा धोका उभा राहिला, तर सहाजिकच हाती असलेल्या सर्व उपायांनी तो आपले रक्षण करील यातही वाद नसावा.' त्यानंतर दोनच वर्षांनी, एप्रिल १९४८ मध्ये अणुशक्ति-विधेयकावर संसदेत बोलताना नेहरू आणखी दोन पावले पुढे गेले आणि म्हणाले-'या शक्तीचा विकास भारताने शांतता-कार्यासाठीच केला पाहिजे; पण एक राष्ट्र या नात्याने तिचा अन्य कुठल्या प्रकारे उपयोग करण्याखेरीज आमच्यापुढे गत्यंतरच उरले नाही, तर आपल्यापैकी कुणी कितीही धर्मोपदेश केला तरीही आमचे राष्ट्र या शक्तीचा निराळा उपयोग केल्यावाचून राहणार नाही!'

नंतरच्या वर्षात नेहरूंनी अणुशक्तीचा वापर संरक्षण किंवा १९६४ मध्ये चीनने आपल्या पहिल्या अणुबाँबचा स्फोट केल्यानंतर घेण्यात आला. नेहरूंचे निधन होऊन गेलेले होते. १९६२ साली सीमायुद्धात झालेल्या पराभवाच्या आघाततून भारत अद्याप सावरलेला नव्हता. अनेक राजकीय नेते विशेषतः सत्ताधारी काँग्रेस पक्षातील लोकच भारताने अणुबाँब तयार केला पाहिजे अशा मताचे होत चालले होते आणि तसा आग्रहही धरू लागले होते.

भाभासाठी ही सुवर्णसंधीच होती. चीनने अणुबाँब-स्फोट केल्याची वार्ता त्यांनी लंडनमध्ये असताना ऐकली आणि लगोलग एक पत्रकार-परिषद बोलावून त्यांनी जाहीर केले की, 'अठरा महिन्यांच्या आत भारतीय शास्त्रज्ञही अणुबाँब तयार करू शकतील!' नेहरूंचे उत्तराधिकारी सौम्य प्रकृतीचे लालबहादुर शास्त्री याच्यावर दडपण वाढत गेले. शक्य तेवढा काळ त्यांनी त्या दडपणाला दाद दिली नाही; पण नोव्हेंबर सरता सरता त्यांनी भाभांना हिरवा कंदील दाखवला-संपूर्णपणे अणुबाँब तयार करण्यासाठी नव्हे; पण 'शांतता-कार्यासाठी अणुविस्फोट' करण्याकरता!

एव्हाना भारताजवळ 'सायरस' भट्टी आणि तुर्भे येथे पुनर्प्रक्रिया संयंत्र तयार होते. त्यापैकी कशावरही आंतरराष्ट्रीय तपासणी-नियंत्रण नव्हते की कोणतीही (शस्त्रनिर्मिती न करण्याची) हमीही भारताने दिलेली नव्हती. सर्व काम शांतता-कार्यासाठी परमाणु-संशोधनाच्या नावाखाली चालू होते; पण अठरा महिन्यात बाँब तयार करू शकू हा भाभा यांचा आशावाद फारच अवास्तव होता.

ते आणि शास्त्री दोघेही निधन पावले होते. नेहरूकन्या इंदिरा गांधी सत्तेवर आली होती आणि अनंत तंत्रशास्त्रीय अडचणी येत जाऊन भूमिगत–विस्फोट–कार्यक्रमाला उशीर होतच होता. अठरा महिन्यां-ऐवजी त्याला तब्बल १० वर्षे लागली !.

या दहा वर्षांत बाँबनिर्मितीचे कार्य भारताने मोठेच गुपित राखून केले; पण ते तसे पहाल तर एक उघड गुपित होते. म्हणूनच जेव्हा प्रत्यक्ष तो विस्फोट करण्यात आला तेव्हा कुणालाही त्याचे मोठेसे आश्चर्य वाटले नाही.

पाकिस्तानच्या भुत्तोना मात्र भारताच्या या कार्यक्रमाची, अगदी तो सुरू झाला तेव्हापासूनच, हवा लागली होती. पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी पाकिस्ताननेही बाँब बनवला पाहिजे, तरच भारता-पासून निर्माण होत असलेल्या या धोक्यावर आपल्याला मात करता येईल, असे जाहीरपणे मांडायला सुरुवात केली होती. भारताला अशी मदत देण्याचे धोके किती आहेत ते जगाला पटविण्यासाठीही भुत्तोनी बराच आटापिटा सुरू केला होता. पाकिस्तानच्या अणुशक्तिमंडळाचे तेव्हाचे अध्यक्ष डॉ. इशरात उस्मानी यांनी तर आम्हाला दिलेल्या मुलाखतीत स्पष्टच सांगितले की, ' भारताला आणि आम्हाला अणु-भट्ट्या देणाऱ्या कॅनडाला मी आमची चिंता कित्येकदा कळवली होती आणि एकदा तर १९७१ मध्ये कॅनडाचे पंतप्रधान पिअरे ट्रुडू राष्ट्रकुल–परिषदेला सिंगापूरला जात असताना मी त्यांना कराचीतील आमचा परमाणु–कार्यक्रम बघायलाही घेऊन गेलो होतो १९७१ च्या जानेवारीची ती ९ किंवा १० तारीख असावी. मी त्यांना दुपारच्या भोजनाचे आमंत्रण दिले. आपली ही भेट सरकारी बनावी अशी त्यांची इच्छा नव्हती. मलाही याचा आनंदच झाला. इंटरकाँटिनेंटल हॉटेलमध्ये मी त्यांना माझ्या कुटुंबासमवेत भोजनास बोलावले. या प्रसंगी भारताने चालवलेल्या कार्यक्रमाबद्दल आम्हाला फारच काळजी वाटत असल्याचे मी त्यांना अगदी स्पष्ट शब्दांत सांगितले; पण मी त्यांना पटवून देऊ शकलो नाही. कॅन-डियन लोक मला वरचेवर आश्वासन देत गेले की, भारतात सर्व कसे आलबेल आहे. कोणतीही अडचण नाही. आम्हाला काळजी करण्यासारखे काहीही नाही !'

पण खरे म्हणजे कॅनडाला स्वतःलाच काळजी वाटत असल्याचे त्यांनी नंतर मान्य केले. ट्रुडू यांनी इंदिरा गांधींकडेच आश्वासन मागितले की, 'कॅनडाने दिलेल्या अणुभट्टीतून उपलब्ध होणाऱ्या प्लुटो-नियमचा वापर भारत शांतता–कार्यासाठी वा अन्य कोणत्याही कार्यासाठी अणु–विस्फोटके तयार करण्याकरता करणार नाही.' पण त्या मातृस्वरूपिणी कणखर स्त्रीने असे आश्वासन देण्यास चक्क नकार दिला. कॅनडा आणि भारत यांनी केलेल्या मूळ–करारात कोठेही शांतता–कार्यासाठी अणु–विस्फोटके तयार करण्यास मनाई केलेली नव्हती आणि आता त्या करारात बदल करणे ' पक्षपाताचे ' होईल, असे इंदिरा गांधींनी स्पष्टच सांगून टाकले.

त्याच सुमारास (१९६४) जिनिव्हामध्ये सुरू झालेल्या अण्वस्त्र-प्रसारबंदी वाटाघाटीमध्येही भारताने हीच भूमिका घेतली. वास्त-विक असा एखादा करार करायला हवा या कल्पनेचा सुरुवातीचा एक पुरस्कर्ता असूनही भारताने आता ' शांतता–कार्यासाठी अणु–स्फोटकाच्या निर्मितीवर ' बंदी घालण्याच्या कल्पनेला विरोध केला. जिनिव्हा–परिषदेत भारतीय प्रतिनिधीने, अणुबाँब आणि शांतता–कार्यासाठी अणुविस्फोटके यांच्या निर्मितितंत्रात कोणताही फरक नाही हे अमान्य केले नाही; पण त्याचे म्हणणे असे होते की, हा काही या परिषदेपुढील प्रश्न नाही. भारतीय प्रतिनिधीचे म्हणणे होते, ' सुरुंग मुळात लष्करी कामासाठीच बनवण्यात आले होते; पण म्हणून आता त्याचा वापर लष्करी कामासाठी करण्यात येण्याची भीती आहे या सबबीवर गरीब आणि विकासशील राष्ट्रांना त्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यास मनाई करता येणार नाही '

या सर्व इशाऱ्यानंतर, इन्कारांनतर आणि टाळाटाळीनंतर प्रत्यक्षात भारताने केलेल्या अणुस्फोटावर मात्र भारताच्या समर्थक देशांनी काही ऊर बडवून आकांत केला नाही. त्यांच्या प्रतिक्रियात घबराट, आदळआपट, संताप वगैरे काहीही नव्हते. फ्रेंच अणुशक्तिमंडळातील जाणकार सूत्रांपैकी एकाने सांगितले की, ' फ्रान्सने तर उलट भार-ताला अभिनंदनाची तार पाठवली आणि प्लुटोनियम-पुरवठ्यात खूप वाढ करू शकण्यास मदत करील अशी एक फास्ट–ब्रीडर परमाणु–भट्टी उभारायला फ्रान्स मदत करू शकेल ' असेही सुचविले.

भारताने प्रत्यक्षात सरळ अणुबाँब तयार करण्याचा निर्णय घेऊ नये अशा भावनेने अमेरिकेनेही हा विस्फोट शांतता–कार्यासाठीच होता हा भारताचा दावा स्वीकारला. सायरस–भट्टीसाठी आपण स्वतःही हेवी वॉटर आणि पुनर्प्रक्रिया–संयंत्राला हातभार लावल्या-मुळे या विस्फोटासाठी आपलीही मुख्य मदत राहिली आहे हे सत्य दडविण्याचा अमेरिकेने प्रयत्न केला. त्यासाठी परराष्ट्रमंत्री हेन्री किसिंजर यांनी तारापूरच्या दोन्ही अणुकेंद्रांना परमाणुइंधन यापुढेही अमेरिकेने पुरवीत राहिले पाहिजे आणि त्यासाठी कोणतेही आश्वा-सन वा हमी-बिमी घेण्याचे कारण नाही अशी भूमिका घेतली.


फक्त कॅनडा गडबडून गेला. तो चांगलाच बेचैन झाला. भारताला आणखी एक संधी देऊन पहावी म्हणून त्यांनी कित्येक महिने खटपट केली. सायरस–भट्टीतून प्राप्त होणाऱ्या प्लुटोनियमचा वापर कोण-त्याही प्रकारची विस्फोटके तयार करण्यासाठी केला जाणार नाही असे आश्वासन देणारा नवा करार आता तरी इंदिरा गांधी करतील काय, याचाच कॅनडा शोध घेत होता. वाटाघाटींचा घोळ लांबत गेला. भारतीय करार करण्यास नकार देत गेले. अखेरीस कॅनडाने भारताला परमाणु–सामग्री देणे एकदम बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राजस्थानातील कॅंडू–भट्टी उभारण्याचे काम पूर्ण होण्याचे खोळंबले; पण आता हा पुरवठा थांबवण्यात काहीही उपयोग नव्हता. भारतीयांनी एव्हाना बव्हंशी स्वावलंबी परमाणु–उद्योग उभारला होता. इतकेच नव्हे तर परमाणु–निर्यात–व्यवसायात शिरण्याचाही त्यांचा विचार होता

भारताविरुद्ध एकाही देशाने कडक उपाय योजले नाहीत. अण्वस्त्र-प्रसाराला अशाने का कुठे आळा घालता येतो? एकाही देशाने भारताच्या सामान्य विकासासाठी द्यावयाची मदत या परमाणु–प्रश्नाशी निग-डित केली नाही. इतकेच नव्हे तर या विस्फोटानंतर महिन्याच्या आतच प्रगत पाश्चात्य राष्ट्रांनी भारताला द्यावयाच्या मदतीत २० कोटी डॉलर्सची वाढ करण्याचे जाहीर केले.

पण या होत्या तातडतोब झालेल्या प्रतिक्रिया. दूरगामी विचार करता भारताने केलेल्या अणुविस्फोटामुळे घटनाचक्राला एक निरा-ळेच वळण लागले. भारताने केला तो तृतीय विश्वातल्या देशाने केलेला पहिला अणुविस्फोट होता. त्याचा अर्थ आणि परिणाम काय आहे ते अमेरिकेच्या नक्कीच लक्षात आले असले पाहिजे. काही आठवड्यातच अमेरिकेतील अत्यंत कुशाग्र बुद्धीच्या काही धोरण-कर्त्या मंडळींनी अण्वस्त्रप्रसाराच्या एकूणच प्रश्नाचा फेरविचार करायला सुरुवात केली. झाले–गेले ठीकच आहे; पण किमान यानंतर तरी अण्वस्त्रसज्ज राष्ट्रांच्या संख्येत वाढ होऊ न देण्यासाठी–विशेषतः पाकिस्तान आणि इराक यांना त्यापासून परावृत्त करण्या-साठी–काय करायला पाहिजे, निदान त्या दिशेने होणारी भावी अण्वस्त्रेच्छुक देशांची वाटचाल थोपवण्यासाठी तरी काय करायला हवे–याचा आराखडा ते तयार करू लागले. ( क्रमशः )

# कुंपण आणि आकांक्षा

**मंगला गोडबोले**



**मध्यमवर्गीय स्त्रीमनाचा तशाच एका स्वतंत्र मनानं घेतलेला हा कानोसा आहे. स्त्रीत्वाच्या मर्यादांविषयीच खूप बोललं जातं; पण तिचं माणूसपण मांडणारा विरोधी आवाज नेहमीच संस्कृतीच्या कोठडीत कुलुपबंद असतो. स्त्रियांच्या सुखदुःखाचा हा गणिती जमाखर्च नाही. नेमकं सुख कुठे दुखतंय याचा हळुवार शोध या लिखाणात आहे.**

**दर पंधरा दिवसांनी येणारं हे सदर. यातले दोन लेख ९ जुलै आणि २३ जुलै अंकात प्रसिद्ध झाले. हा तिसरा लेख.**

बी. ए. ला असताना आमच्या विजयाला तीस–पस्तीस जणींचा ग्रुप होता. त्यातल्या निम्म्या जणींनी लग्नानंतर पश्चिम आणि मध्यरेल्वेच्या वेगवेगळ्या उपनगरांमध्ये संसार थाटले. काहींनी रास्ता, सदाशिव इत्यादी पेठांची शोभा वाढवली आणि एक तर लग्न करून सातासमुद्रापार गेली ! या जवळ राहिलेल्या मुलींचा जवळ राहण्यामुळेच आणि परदेशी गेलेलीचा परदेशाच्या तेव्हाच्या ग्लॅमरमुळे कुठे ना कुठे, कधी ना कधी संपर्क येत राहिला. सुरुवातीला महिन्याला एक पत्र, पुढे वाढदिवसाला म्हणजेच वर्षाकाठी एखादं, पुढे अपघातानं प्रवासात वगैरे भेटणं हे व्यावहारिक संकेत सुरुवातीच्या भाबडे-पणावर मात करून गेले खरे; पण अगदीच ट्रॅक सुटला आहे असं फारसं कोणाच्या बाबतीत झालं नाही. अपवाद एकट्या कानविंदेचा. तिचा नवरा कोठल्या तरी खाणीमध्ये तंत्रज्ञ होता. होता म्हणजे अजूनही आहे. आता तर तो फार वरच्या पदावर आहे असं म्हणतात; पण आमच्यापैकी बहुतेकींनी त्याला फक्त लग्नात पाहिला. आमच्या वेळी इतक्या लांबच्या स्थळाला मुली ' द्यायला ' पुष्कळसे पालक नाराज असत; पण कानविंदेची घरची परिस्थिती अडचणीची होती. अशातही तिनं ' सोन्याची खाण ' पटकावली म्हणून मांडवभर तिचं कौतुक आणि चेष्टा चालल्याची मला चांगली आठवतेय; पण मधल्या काळात सोनं जितकं दुर्मिळ झालं नाही तितकी कानविंदे दुर्मिळ झाली. ना पत्र-चिठ्ठी, ना पुण्यामुंबईकडे आलं तरी भेटणं. माजी विद्यार्थिनी संमेलन झालं त्या वेळी कुठूनकुठून मुली गोळा झाल्या; पण ही आली नाही! घसघशीत चेक तेवढा पाठवलान नवऱ्याच्या सहीचा. हे म्हणजे अतीच झालं! आमच्या आठवणीतली कानविंदे असामान्य मुळीच नव्हती; पण आयुष्य समरसून जगणारी होती. उघड्या डोळ्यांनी चौफेर बघणारी होती. किरकोळ गोष्टीबद्दलसुद्धा खास स्वतःची मतं बाळगणारी होती. आमच्या वेळीही सुस्त–संथ गृहिणीपणाची नावड बाळगणाऱ्या ज्या काही मोजक्या मुली असत त्यांच्यात ती ठळक होती. काय झालं तिचं? तिच्या आवडी–निवडीचं, मताचं ?

मध्यंतरी एकदा फिल्मी योगायोगानं तिची आई भेटली. पहिला बराच वेळ जावयांचा हुद्दा, बंगला, गाडी, त्या लहानशा गावात त्यांना मिळणारा भाव याबद्दल भरभरून बोलत होती. कुमी काय करते असा विषय निघाला तेव्हा मात्र अडखळली. उगाचच सावरून घ्यायला निघाल्यासारखी म्हणाली, ' ती काय करणार गं ? तिथे काहीच नाही करण्याजोगं. म्हणजे आता सुधारतंय तिथेही थोडफार. पण तेव्हा तरी काहीच नव्हतं.'

' मग कुमी कंटाळली असेल ?'

' कंटाळत्येय कशानं ? पहिल्या पाच वर्षांत दोन मुलं झाली. एरवी घरसंसार आहेच, सणवार, मुलांचे अभ्यास, परीक्षा– चाललंय !'

मला उगाचच त्या 'चाललंय' मधे कुठे तरी ' ढकललय ' ऐकू आलं हळूहळू माहिती कळत गेली. एवढ्या वर्षांमध्ये कुमीच्या नवऱ्याच्या दोन परदेशवाऱ्या झाल्या. फिरती तर असतेच. कुमीची आई मध्यंतरी दहा दिवस तिच्याकडे होती त्यात फार तर दोन-तीन जेवणांना घरातल्यांबरोबर होता म्हणे तो! इतका बिझी! आसपास सगळीच भिन्नभाषिक निम्नस्तरीय वस्ती. येताजाता दोन तोंडदेखले शब्द बोलण्यापलीकडे सहजीवन म्हणावं असं काही नाही. पहिली साता-ठ वर्षं गर्भारपणं, बाळंतपणं यामुळं कानविंदे हलू शकली नाही. आता अभ्यास–परीक्षांच्या चक्रातून तिला उसंत मिळत नाही आणि वर्ष–दोन वर्षांत तिचे दोन्ही मुलगे शिक्षणासाठी पुण्यात आले तरीही ती नवऱ्याला टाकून कुठे जाणार ?

' आता सोड ग. आता तिच्यातही नाही राहिली पहिली धडपड. चार वेळा आम्ही डिवचलं तरी हलतच नाही आता ती. कशासाठी करायचं ? बरोबरच्या तुम्ही मुली कुठल्या कुठं गेलात आणि हिनं आता सुरुवात करायची ? भेटायला वेळ कसला मिळत नाही ? तुला म्हणून सांगते, इथे आली की, चार जणींना भेटण्यापेक्षा टाळायचाच प्रयत्न दिसतो तिचा मला. धड नव्या काही गोष्टी माहीत नसतात, लेटेस्ट काही ऐकलेलं, वाचलेलं नसतं. अज्ञान दाखवायला हिला आवडत नाही. त्रागडच आहे तिचं सगळं. साधी इथं आली तरी बावरल्यासारखी करते !'

ऐकताना मलाच हळहळ वाटली. अशी आत्मविश्वासशून्य, परभृत, सुस्त, निष्क्रिय झाली असेल का ती ? पण बोलणं पुढं न्यायच्या आतच तिच्या आईनं भरतवाक्य म्हटलं, ' तसे आमचे जावई लाखात आहेत ग. तिला कश्शाला कमी पडू देत नाहीत. आणखी त्यांनी तरी काय करावं ? त्यांना वाटत असेल, दागिने करण्यात आणि मोडण्यात मागच्या बायकांचे दिवस मजेत गेले. त्याना नव्हते असले प्रश्न ? चालायचंच. आता तीही सुख मानायला शिकली आहे. '

अशी ही कानविंदे. नुसती खुंट्यासारखी घर धरून बसलेली. आमच्या वेळी म्हणजे बारा-पंधरा वर्षांपूर्वी कानविंदे अपवादात गणली गेली असली तरी आज तीच नियमात दाखल होऊ शकेल ! उद्योगधंद्यांची वाढ,

सरकारी कायदेकानू, खाजगी व्यवसायाला दिलं जाणारं प्रोत्साहन, शहरांवरचा एकूणच ताण कमी करण्याची गरज यामुळे एकीकडे मुलींना लग्नानंतर आड-अप्रगत गावी राहावं लागण्याची शक्यता वाढते आहे, तर दुसरीकडे वाढतं शिक्षण, लग्नाच्या वेळची प्रौढ वयं, पैसा कमवण्याची क्षमता यामुळे मुलींना ते जडही जाणार आहे. 'सा विद्या या विमुक्तये' हे सुभाषित म्हणून ठीक आहे; पण त्या दर्जाची आणि त्या अर्थाची उन्मुक्तता देणारं शिक्षण आज किती जणांना मिळत असेल याची शंका आहे. उलट भरमसाट पदव्यांमुळे स्वतःच्या कुवतीविषयी निर्माण झालेला भ्रम, प्रतिष्ठेच्या खऱ्या खोट्या कल्पना, स्पेशलायझेशनचं अवडंबर इत्यादि शैक्षणिक व सांस्कृतिक कारणांमुळं आजचं शिक्षण माणसांमधली लवचिकता कमीच करण्याच्या मागं आहे. याचे परिणाम लग्नानंतर मुलींवर झाल्याशिवाय कसे राहतील ? विशेषतः अशा 'अडचणीत' पडलेल्या ?


मग यावर तोडगा काय ? आयुष्याच्या ऐनउमेदीच्या काळात कडेला ढकलल्यासारखं, नाराज, निष्क्रिय जीवन त्यांनी जगावं ? सांस्कृतिक उपासमारीचे बळी म्हणून तडफडावं ? आयुष्यात न मिळालेल्या संधींचा हिशेब सोडून द्यावा ? की मोक्याच्या जागी राहून सर्व संधी हातापायाशी असलेल्यांचा नुसताच सतत हेवा करावा ? अर्थात मानण्यातलं सुख, जगी सर्व सुखी..., सुख पाहता जवापाडे, अशा निष्क्रिय तत्त्वज्ञानांचा भरभक्कम आधार त्यांना राहीलच आणि नवऱ्याचं जे सुख तेच आपलंही सुख मानण्याचा सुज्ञ सल्ला देणारे (देणाऱ्या) पुष्कळ भेटतीलच !

पण या सगळ्या गोष्टी जितक्या गैरसोयीच्या तितकाच शहरांच्या वेशीपलीकडे सप्तपदीतलं पाऊल न टाकण्याचा निर्णयही अव्यवहारीपणाचा होईल. मुळात आजही लग्नाबाबत निर्णयाचं स्वातंत्र्य किती मुलींना आहे हा प्रश्नच आहे. होकार देणाऱ्या पहिल्या मुलाच्या गळ्यात निमूट माळ घालणाऱ्यांनी शहर-खेड्याच्या मिजासी कोणाला सांगाव्यात ? म्हणजे शेवटी हा प्रश्न उरतो तो फक्त त्या त्या जोडप्यातल्या सामंजस्याचा. बायकोनं परिस्थितीमधली अपरिहार्यता शक्य तितक्या उमदेपणानं स्वीकारणं आणि नवऱ्यानं परिस्थितीचा काच बायकोवरून दूर करण्याचा शक्य तितका प्रयत्न करणं यातच कुठे तरी या प्रश्नांचं उत्तर दडलेलं असेल. इच्छा असलीच तर वर्षातला ठराविक काळ तिला तिच्या आवडीच्या कामासाठी राहते गाव सोडून जाण्याची मुभा देणं, साहित्यसंस्कृतीतल्या ताज्या घडामोडी तिच्यापर्यंत पोचतील अशा सुविधा देणं, तिच्या कलाछंदांच्या जोपासनेस सहकार्य देणं आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे तिच्या कुचंबणेकडे सहानुभूतीने बघणं हे मार्ग पुरुषांना शक्य आहेत.

जितकी माणसं तितके प्रश्न आणि लग्नासारख्या दोन माणसांच्या तीन पायांच्या लंगडीत तर एकेका प्रश्नाला अनंत कंगोरे फुटलेले ! त्यामुळे शाळाकॉलेजांमधल्या गाइडांच्या उत्साहाने, टाकला प्रश्न की ठोकले उत्तर असे तर कधीच करता येणार नाही; पण मुळामध्ये अशा प्रकारच्या कुचंबलेल्या स्त्रीला काही प्रश्न आहे असं मानलं तरच हे सगळे प्रश्न आणि उत्तरं शोधण्याची ही धडपड ! तुमचं सुख दुखतंय, श्रीमंती दुखणं, तुम्हाला कसला आलाय प्रश्न असं म्हटलं म्हणजे प्रश्नच मिटला.

आमची कार्नविदे नाही का, सुख 'मानायला' शिकली ? □

---



# आपली मुलं

'आपली मुलं' ही लेखमाला सुरू होऊन एक महिना झाला. ९ जुलै अंकात पहिला आणि २३ जुलै अंकात दुसरा लेख प्रसिद्ध झाला. हा तिसरा लेख.

पहिल्या दोन लेखांत लहान मुलांशी कसं बोलायचं, त्यांचं बालपण समृद्ध करण्यासाठी जाणीवपूर्वक त्यांना चांगले अनुभव कसे द्यायचे ते पाहिलं. या अंकात....


---

# आपलं मूल आहे तरी कसं ?

शोभा भागवत

लहानपणी आमच्या शेजारचं कुटुंब आणि आमचं कुटुंब यांची फार दोस्ती होती. शेजारच्या कुटुंबातली सगळी माणसं गोरी. त्यामुळं काळं-गोरं हा कायम चर्चेचा विषय. मी अगदी लहान ४-५ वर्षांची असल्यापासून माझा मुक्काम शेजारीच जास्त. शेजारच्या बाईंना कामात मदत करणं, बाकीच्यांच्या अधेमधे लुडबुड करणं मला आवडायचं. आई म्हणते की, मी तिला म्हणायची, बाहेर कुणाकडे काम केलं की कौतुक करतात म्हणून मला बाहेरच काम करायला आवडतं. सकाळी मला उठायला उशीर झाला तर शेजारचे तात्या उठा उठा विऊताई, सारीकडे उजाडले म्हणत मला उठवायचे. हातात खाऊची पुडी द्यायचे. संध्याकाळी त्याच्याबरोबर फिरायला न्यायचे. एकूण ह्या शेजारच्या घरी मला फारच भाव होता.

पण एक गोष्ट नकळत घडायची. ही सगळी मंडळी मला कौतुकानंच पण 'काळी माऊ' म्हणायची. तेव्हा मला ते फारसं वाईट वाटत नसावं; पण आपण काळ्या आहोत हे पुढं फार दिवस माझ्या मनात घर करून राहिलं. आमची आत्या बोलायला चुणचुणीत हुषार होती. तिचे पण काही बोल



माझ्या मनात असे कायमचे राहिले. एकदा दिवाळीच्या गडबडीत एका किंचित अंधाऱ्या खोलीत मी काही तरी करत बसले होते तेव्हा आत्या तेथे आली आणि मग म्हणाली, ‘ अग बाई, शोभे तू होय ! मला दिसलीच नाहीस अंधारात !’ ती माझ्या वडिलांना म्हणायची, ‘ बापू, आत्तापासून हुंड्याचे पैसे जमवायला लागा. मुलगी खपवताना जड जाईल ’ हे पण माझ्या फार दिवस लक्षात राहिलं आणि त्यामुळंच की काय कुणास ठाऊक हुंडा घेणाऱ्या मुलाशी लग्न करणार नाही, लग्नासाठी कुणाला दाखवून घेणार नाही, हे माझ्या मनात पक्कं झालं आणि प्रत्यक्षात कोणताही समारंभ न करता, हुंडा देणं घेणं, मानपान हे शब्दसुद्धा न उच्चारता अतिशय सन्मानानं आम्ही लग्न केलं. गंमत म्हणजे पत्रमैत्रीतून आमचं लग्न ठरलं. माझा होणारा नवरा तेव्हा अमेरिकेत होता. मी भारतात ! आम्ही एकमेकांना पाहिलेलं नव्हतंच. पत्रांतून मनं जुळली म्हणून लग्न करावंसं वाटलं. मग एकमेकांचे फोटो पाहिले. लग्नासाठी मीच अमेरिकेत जायचं असं ठरलं तेव्हा माझे वडील म्हणाले, आम्ही लग्नासाठी काही पैसे बाजूला ठेवले होतेच. तेव्हा अमेरिकेचं तिकीट मी काढणार. माझे सासरे म्हणाले, ‘ अहो, आम्ही तिला आमची सून मानलं तेव्हा आम्ही तिकीट काढून तिला पाठवणं योग्य !’ आणि तेवढ्यात नवऱ्याचं पत्र आलं की आम्ही दोघांनी लग्न करायचं ठरवलं तेव्हापासूनच ती माझी बायको आहे हे मी मानलंय. तेव्हा तुम्ही कोणी प्रवासाचा खर्च करायचा प्रश्नच येत नाही आणि त्यानंच तिकीट पाठवून दिलं. तेव्हा मी शिकत होते त्यामुळं मिळवती नव्हते.

हे सगळं निघालं हुंडा द्यावा लागेल प्रकरणातून. तर इतक्या सविस्तर लिहायचं कारण असं की, लहानपणापासून आपण काळ्या आहोत हे जे काही मनात पक्कं रुतून होतं ते हळूहळू जायला अनेक वर्षं लागली.

योगायोगानं सासरची सगळी मंडळी पुन्हा गोरीपान ! लग्न ठरवलं तेव्हा एकदा सासूबाईंनी मला विचारलं होतं, ‘तू काळी आहेस हे त्याला कळवलं आहेस का ?’ मात्र त्यांनी ते इतक्या काळजीनं आणि पुढं काही घोळ होऊ नये ह्या हेतूनं विचारलं की ते मला लागलं नाही. माझ्या काळेपणाचा हा एवढाच उल्लेख !

सासूबाई नात्यातल्या एका बाईंची गंमत सांगतात. त्यांच्या एका मुलाची बायको काळी होती. तिला त्या म्हणायच्या ‘ काय मेली काळी घूस आलीय घरात !’ दुसऱ्या मुलाची बायको एकदम गोरीपान! तर म्हणायच्या ‘काय नुसती पांढरी पाल आहे झालं!’ काळे-गोरेपणावरून असे असंख्य वाक्बाण आपण ऐकत असतो; पण त्याचा मुलांवर किती खोलवर परिणाम होत असतो हे आपल्या लक्षात येतच नाही.

कधी याउलट सुंदर दिसणाऱ्या मुलाला विशेषत: मुलीला सगळे लहानपणापासून इतके चढवून ठेवतात की, त्यापायी तिच्या व्यक्तिमत्त्वात कायमचा एक आखडूपणा येतो. मग चर्चा होते ‘ दिसते छान पण फार कॉन्शस आहे नाही ? त्यामुळं सगळं रूप मारलं जातं. ’ नाकापेक्षा मोती जड व्हावा तसं व्यक्तिमत्त्वापेक्षा तिचं सौंदर्य जड होतं.

एकाच घरातल्या दोन मुलांत ही तुलना झाली तर फारच कठीण असतं. हा गोरा तो काळा, ही हुषार तो मठ्ठ, हा धीट ती लाजाळू, ही नाजूक ती दांडगोबा हे सहज दिसणारे मुलांचे विशेष त्यांचे गुण अवगुण ठरतात. एकाच मांजरीला झालेली तीन पिल्लं तीन वेगवेगळ्या रंगांची असतात. एक काळू, एक गोरू, एक भुरू अशी त्यांची सहज नावं ठेवली जातात; पण ते काही त्यांचे गुण ठरू शकत नाहीत; पण माणसात काळं हा चक्क अवगुण ठरतो याचं वाईट वाटतं.

माणसाचं विश्व थोडं व्यापक झालं, अनेक माणसं भेटत राहिली, जवळ येत गेली तर त्याला कळतं की, नुसतं काळं, गोरं, सुंदर, कुरूप, उंच, ठेंगणं यापेक्षा माणसाचं संबंध व्यक्तिमत्त्व, त्याचं मन, त्याची समज, त्याच्या आतली श्रीमंती यांना बाह्य स्वरूपापेक्षा जास्त महत्त्व असतं. ही समज आली की, मग सुंदर असून उथळ असणारी माणसं आकर्षक वाटत नाहीत. नुसतीच देखणी पण मठ्ठ माणसं असह्य होतात, देखणेपणापायी गर्विष्ठ बनलेली माणसं जवळ येऊ शकत नाहीत हे सगळं कळतं कारण ती संपूर्ण माणसं नसतातच. काही जादूनं त्यांचं सौंदर्य गेलं तर ती माणसं म्हणून उरणारच नसतात. याउलट दिसायला जेमतेम असणारी काही माणसं आपल्या व्यक्तिमत्त्वानं सगळी रूपाची उणीव भरून काढतात. त्यांचं बोलणं, त्यांचे विचार, त्यांचा आचार इतका लोभसवाणा असतो की ती त्यापायी आकर्षक, सुंदर भासतात.

तेव्हा समृद्ध व्यक्तिमत्त्व ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट. शरीराचं सौंदर्य त्यानंतर येतं. कारण ते आपल्या हातातलं नसतं ते मिळवण्यासाठी कष्ट करावे लागलेले नसतात हे पक्कं कळणं फार महत्त्वाचं आहे.

हे जसं आपल्याला कळलं पाहिजे तसं ते लहानपणापासून आपल्या मुलांनाही समजलं पाहिजे. सगळी समज काही लहानपणीच येणार नाही; पण निदान स्वत:बद्दलचे काही अहंगंड, न्यूनगंड त्यांच्या मनात रुजू नयेत याची काळजी आपण घेतली पाहिजे.

यासाठी आपलं मूल आहे तरी कसं हे आपल्याला समजून घेता आलं पाहिजे. गुणांच्या आणि अवगुणांच्या ढोबळ वर्गवाऱ्या आपण करत असतोच; पण त्यापलीकडे मूल कसं आहे हे त्याच्या मनात डोकावलं तरच कळू शकतं. त्याचं मन त्याच्याच शब्दांमधून कधी तरी अचानक उलगडत जातं.

आपण कसे आहोत हे समजून घेण्यासाठी मानसशास्त्रात अनेक प्रकारच्या प्रश्नावल्या असतात. ह्या प्रश्नावल्या मोठेपणी नोकरीच्या निवडीच्या वेळी कदाचित समोर येतात,

कधी काही प्रश्न निर्माण होऊन मानसोपचारतज्ज्ञाकडे जावं लागलं तर समोर येतात, कधी एखादं प्रशिक्षण घेताना त्या हाती येतात. मोठेपणी ह्या प्रश्नावल्यांची उत्तरं देताना जाणवतं की, 'अरे, आपण असे आहोत हे अशा स्पष्ट शब्दात आपल्याला कधी जाणवलंच नव्हतं !' माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला एवढे पदर असतात की, त्या पदरा–पदरावर पुन्हा अनेक छटा असतात याबद्दल आपण विचारच केला नव्हता.

ह्या प्रश्नावल्यांमधून स्वतःची–स्वतःबद्दलची कल्पना बाहेर येते. आपल्या व्यक्तिमत्त्वातली आपल्याला आणि लोकांना माहीत असलेला भाग, फक्त आपल्यालाच माहीत असलेला भाग, फक्त लोकांनाच माहीत असलेला भाग आणि कुणालाच माहीत नसलेला अज्ञात भाग आपल्याला उमजत जातो.

अशीच एक प्रश्नावली सोडवत असताना माझी मुलं मागं लागली, 'आम्हाला पण सांग ना काय करतेस ते म्हणून.' मग त्या मूळ इंग्रजी प्रश्नावलीच भाषांतर करून त्यांना दिलं ती प्रश्नावली म्हणजे काही गुण, काही अवगुणांची यादी होती. तुम्ही कसे आहात ते तुम्हीच शोधून काढायचं होतं.

| | | |
|---|---|---|
| ऐटबाज | शूर | आकर्षक |
| आनंदी | लाडका | उदास |
| हुषार | पद्धतशीर | वैताग देणारा |
| भांडखोर | कजूष | उत्साही |
| दयाळू | शिस्तप्रिय | निष्काळजी |
| कर्कश | बेशिस्त | गर्विष्ठ |
| कलावान | बेजबाबदार | साधा |
| आत्मविश्वासपूर्ण | चुणचुणीत | मनमिळाऊ |
| न्यायी | उद्योगप्रिय | मोकळा |
| उतावळा | अस्वस्थ | प्रभावी |
| अधीर | घुबर | आशावादी |
| क्रूर | स्वार्थी | शक्तिवान |
| स्वच्छ | उद्धट | मूर्ख |
| बोलका | वक्तशीर | चटपटीत |
| आज्ञाधारक | निश्चयी | उदार मनाचा |
| विनोदी | भोळा | बावळट |
| गंमत्या | तत्पर | फसव्या |
| दादागिरी करणारा | | मानी |



अशी आणखी खूप विशेषणं ह्या यादीत आहेत.

मुलांना ही यादी देऊन वाचून नुसत्या चूक-बरोबरच्या खुणा करायला सांगितल्या. काही शब्दांचे अर्थ कळेनात तेव्हा त्याच्या संदर्भात त्यांचे अर्थ सांगितले.

खुणा करून झाल्यावर पाहिलं तर मुलांनी इतक्या प्रामाणिकपणे आपल्या काही दोषांवरही खुणा करून ते असल्याचं मान्य केलं होतं ! बहुतेक सगळ्या गुणांवर बरोबरच्या खुणा होत्या त्यावरून मुलांशी बोलणं झालं.

वेळेचं फारसं भान नसलेल्या माझ्या मुलीनं वक्तशीर त्या शब्दावर खूण केली होती. मी तिला म्हटलं, 'आभा, वक्तशीर म्हणजे वेळेवर सगळं करणारी. उठल्याबरोबर तोंड धुणारी, दूध पिणारी, वेळेवर अभ्यासाला बसणारी, वेळेवर जेवणारी, वेळेवर शाळेत जाणारी, वेळेवर परत येणारी असं वागतेस का ग तू ?

'सारखं काय गं वेळेवर वेळेवर म्हणतेस? म्हणजे काय ?' आता ही माझी परीक्षा होती.

'अग, म्हणजे तू उठल्यावर नुसतीच बसून राहतेस. मग काही तरी खेळ काढून खेळतच राहतेस. मांजराशी खेळत बसलीस तर खूप वेळ त्यातच घालवतेस. मग सगळ्याला उशीर होतो अभ्यास पुरा होत नाही, शाळेत जायला गडबड होते; हो की नाही ? म्हणजे मग वेळेवर काही होत नाही!

'मग वेळेवर खेळायचं पण असतं की काय ग लहान मुलाना !'

'हो ना. खेळलं तर पाहिजेच; पण अभ्यासाच्या वेळी अभ्यास. खेळाच्या वेळी खेळ. शाळेच्या वेळी शाळा!'

'पण एखाद्या लहान मुलीला अभ्यासाच्या वेळी खेळायचं असलं तर ? मग ती खेळायच्या वेळी अभ्यास करेल !'

"पण मग ती शाळेत बाईंना काय सांगेल ? बाई तर शाळेच्या वेळातच अभ्यास बघणार ना ! म्हणजे तो सकाळी पुरा केलाच पाहिजे !"

बाई शाळेत अभ्यास बघणार, झाला नसला तर पट्टी मारणार याचा धाक जबरदस्त होता. त्यामुळं मुलीला ते मान्य करावं लागलं; पण वक्तशीरचा अर्थ तिला समजावून देता देता मला असं समजलं की, आपण ज्या वेळा ज्याच्या म्हणून ठरवतो त्या वेळेत बसायचं बंधन मुलावर पडतं. सवय झाली की ते अंगवळणी पडतं; पण प्रत्येकाचा नैसर्गिक कल, झोपण्याचं, जागण्याचं वेळेचं चक्र याला पूर्ण न्याय द्यायचं ठरवलं तर ११ ते ५ शाळा हेही बदलावं लागेल. मग मुलाला खेळावंसं वाटतं तेव्हा खेळायची वेळ असेल, अभ्यास करावासा वाटतो तेव्हा अभ्यास असेल. मधे एक लेख वाचलेला आठवतो. त्यात लेखकानं प्रत्येकानं आपापलं असं नैसर्गिक वेळापत्रक शोधून काढायचं आवाहन केलं होतं त्याप्रमाणे काम केलं तर जास्त प्रभावीपणे काम होतं हा त्याचा अनुभव होता.

शेवटी आमच्या चर्चेत वक्तशीरपणाचा अर्थ मुलीला समजावून देताना ७ च्या आसपास उठणं आणि ११ला शाळेत जायचं असतं म्हणून मधल्या वेळात तोंड धुणं, दूध पिणं, शी, अंघोळ, अभ्यास, जेवण सगळं उरकणं हेच मी सांगते आहे असं माझ्या लक्षात आलं. मुलीच्या सध्याच्या संदर्भात तिला हे कळणं, याच्याशी तिनं जुळवून घेणं हे महत्त्वाचं होतं. माझ्या सोईचं होतं त्यात तिच्या नैसर्गिक प्रेरणा मारल्या जाणं अपरिहार्य होतं.

या गुतागुंतीला माझ्याकडे उत्तर नव्हतं.

'संशयी' ह्या शब्दावर मुलांनी खूण केलेली पाहून मला आश्चर्य वाटलं. मी म्हटलं,

" तू संशयी आहेस का ?"

" हो."

" कशाचा संशय येतो तुला ?"

" मी बाहेर गेलो की आभा माझी मोटार घेईल आणि मोडेल असा संशय येतो."

" असा का संशय येतो ?"

" कारण तिनं तसं केलेलं आहे खूप-वेळा !"

मग जरा थावून तोच म्हणाला, ' म्हणजे मी काही खरा संशयी नाही; पण ती तसं वागते म्हणून मला संशय येतो' मला तुझा नाही संशय येत.

मग मुलगी पटकन म्हणाली, ' हा मला मोटार देत नाही मग मलापण संशय येतो !' मला असं वाटलं की ह्या सगळ्या मोठ्या गुणा-दुर्गुणांची बीजं किती छोटी असतात ते आपल्याला कळलच नव्हतं. मुलांच्या संदर्भात या सगळ्या यादीला विशिष्ट जग होत. तेही प्रत्येकाच जग वेगळं होतं. कधी ते एकमेकावर अवलंबूनही होतं.

पण ह्या शब्दांच्या निमित्तानं अशा काही गोष्टींची मजेत चर्चा झाली हे मला अपूर्वाईच वाटलं आणि यादीतले सगळे गुण आपल्यात असलेच पाहिजेत ही मुलाची इच्छा मोलाची वाटली.

एक दुसऱ्या प्रकारची प्रश्नावली अभ्यासताना मी मजेत मुलाना काही प्रश्न विचारले होते.

'तुला आतापर्यंतच्या शाळेच्या पाच वर्षात जे जे सर आणि बाई होत्या त्यांच्यापैकी कोण सगळ्यात आवडतं ? मुलानी एका शिक्षिकेचं नाव सांगितल आणि आम्हाला आश्चर्य वाटलं! दुसऱ्या एक बाई खूप प्रेमळ होत्या. मुलाचं त्याना खूप कौतुक होतं त्याच त्याला आवडत असतील असं वाटलं होतं. त्याला कारण विचारलं तर तो म्हणाला— " नुसतं प्रेमळ असून काय उपयोग ? चांगलं शिकवलं पण पाहिजे !"

म्हणजे त्याच्या आवडी-निवडीला आम्हाला न दिसलेलं हे एक अदृश्य परिमाण होतं, याचं नवल वाटलं.

आणखी एक प्रश्न दोघांनाही विचारला होता. " बाहेरची माणस आली की तुम्ही त्याच्याशी कसे वागता ?" मुलीनं उत्तर दिलं 'मी त्यांच्याकडे बघून हसते,त्याना नाच करून दाखवते, त्यांच्याशी गप्पा मारते.

मुलगा म्हणाला, " कोणी आलं की आतल्या खोलीत गप्प बसून राहतो. मग ते थोड्या वेळानं म्हणतात, 'अरे, शोनील कुठं गेला मग' मी बाहेर येतो. "

इतके दिवस आम्ही मुलगी धीट आहे; मुलगा लाजरा आहे एवढंच म्हणत होतो; पण त्याच्या लाजरेपणातली ही छटा आम्हाला कळली नव्हती. लोकांशी सवाद साधायचा दोघाचा मार्ग स्वतंत्र होता. मुलालाही लोकांशी बोलावं असंच वाटत होतं; पण त्यांनी आठवण काढल्यावर आपण होऊन जाऊन नाही.

यानंतर आम्हीही आठवणीनं घरात माणसं आल्यावर गपचूप आत बसलेल्या मुलाची आवर्जून आठवण ठेवू लागलो. कारण त्याचे कान बाहेर लागलेले असणार याची जाणीव झाली होती. नाही तर कदाचित आम्हीच म्हटलं असतं, " नाही. तो लाजरा आहे. तो नाही बाहेर यायचा " आणि मुलगा खरंच लाजरा बनला असता.

आता मुलाना विचारण्याच्या प्रश्नांची एक यादीच माझ्याकडे जमली आहे. मुलं आपापल्या मित्र-मैत्रिणीना मुद्दाम घेऊन येतात आणि म्हणतात याला विचार ना ग ते गमतीचे प्रश्न आणि प्रश्नोत्तरं चालू असताना कधी सगळी विचारात पडतात, कधी गोंधळतात, कधी मजेशीर उत्तर पटकन् बाहेर पडलं की खिदळतात. मुलं खेळता-खेळता, बोलता-बोलता अशी स्वतःचं वागणं, स्वतःच्या आवडीनिवडी याबद्दल स्वत.च्याच मनात डोकावताना पाहून असं वाटतं की, आपण स्वत कसे आहोत हे याना लहान वयातच समजू लागेल तेव्हा स्वत ला बदलणं सोपं असतं. तेव्हाच ती बदलू शकतील. अधिक चांगली माणसं होतील. सहजपणे जगू शकतील.

तुला सर्वात वाईट कशाचं वाटतं ? याचं उत्तर बहुतेक मुल कोणी रागावल की, मारलं की असं देतात. असं झालं की जीव द्यावा असं वाटतं. घरातून पळून जावं असं वाटतं, असंही मुल सागतात. हे आई-वडलानी आपापल्या मुलाच्या तोंडून ऐकावंच !

या प्रश्नाच्या उत्तरांमधून मुलाच्या आवडत्या गोष्टी बाहेर येतात, तशाच मुलाच्या खूप खुपणाऱ्या गोष्टीसुद्धा बाहेर पडतात. दिसायला सुरेख असणाऱ्या मुलाला एकदा विचारल होतं—

' तू कसा दिसतोस असं वाटत तुला ?'

' बेकार !'

' आं ? अरे, आम्हाला तर वाटतं तू खूप छान दिसतोस !'

' पण सगळे म्हणतात हा मुलीसारखा दिसतो. "

' हो. छान दिसतोस म्हणूनच तसं म्हणतात. '

' पण मला नाही मुलीसारखं दिसायला आवडत. '

मुलीचं काहीही आवडत नाही असं मुलाचं एक वयच असून त्यातलीच ही प्रतिक्रिया !


एकदा मुलीला विचारलं होतं, ' तू वडलांसारखी आर्किटेक्ट होणार की आईसारखी एम्. ए. होणार ?' तिनं उत्तर दिलं—

'मी आर्किटेक्ट होणार. एम्. ए. खूप


**ज्यांना पहिली अपत्ये मुलीच आहेत आणि पुत्र व्हावा अशी इच्छा आहे त्यांनी संपर्क साधावा.**

**वैद्य एम्. वाय्. परांजपे**
संजीवन चिकित्सक
सदाशिव पेठ, नृसिंह सदन
जनता बँकेसमोर
बाजीराव रोड
पुणे ४११ ०३०

**संजीवन औषधालय**
वैद्य एम्. वाय्. परांजपे
लोटलीकर बिल्डिंग
१ ला मजला, १६, एल्. जे. रोड,
सिटी लाईट सिनेमाजवळ
माटुंगा (प. रे.) मुंबई ४०० ०१६



लांब असतं. आर्किटेक्ट जवळ असतं.'

हे उत्तर ऐकून आम्ही अवाक् झालो. वास्तविक आर्किटेक्ट म्हणजे काय आणि एम्. ए. म्हणजे काय तिला काहीच माहीत नव्हतं. फक्त वडलांचं ऑफिस घरातच आहे त्यामुळे ते सारखे भेटतात; पण आईचं ऑफिस लांब आहे त्यामुळे ती सकाळी गेली की संध्याकाळी येते हे तिला खुपत होतं. आर्किटेक्ट–एम्. ए. याच्या अर्थाच्या जंजाळाशी तिचा काही संबंध नव्हता. तिनं तिला काय वाटतं तेच व्यक्त केलं होतं.

आणि मुलांचं विश्व म्हणूनच सरळ, मोकळं लोभस असतं. ती जे जगतात तेच अनुभवतात आणि तेच व्यक्त करतात. यापेक्षा वेगळं काही असू शकतं हे त्यांच्या कल्पनेतही नसतं.

मुलीनं पहिलीत असताना लो. टिळकांची गोष्ट शाळेत ऐकली आणि ती घरी येऊन सांगत होती–मग टिळकांनी काही शेंगा खाल्ल्या नव्हत्या. ते बाईंना म्हणाले मी नाही शेंगा खाल्ल्या. मी नाही पट्टी खाणार ! मग बाई म्हणाल्या जा घरी ! मग काय त्यांना बरंच झालं की. ते धावत धावत घरी आले. जिना चढले. दारावरची बेल वाजवली. त्यांच्या बाबांनी दार उघडलं आणि म्हणाले, 'अरे, तू आता घरी कसा ? '

अशा वेळी त्या गोष्टीत खरं तर टिळकांच्या वेषात आपलं मूलच शिरलेलं असतं इतक्या आत्मीयतेनं ते प्रत्येक गोष्ट अनुभवत असतं.

हेच मुलाचं विश्व समजून घेण्यासाठी आपण मात्र वेळ काढायला हवा !

तुला कशाचं वाईट वाटतं ?

कशाचा राग येतो ?

काय आवडतं ?

घरात यायला बरं वाटतं का बाहेर ?

अनोळखी माणसाशी बोलायची लाज वाटते ?

आनंद कधी होतो ?

भीती कशाची वाटते ?

राग आला की तू काय करतोस ?

सर जे सांगतात ते सगळं खरं मानतोस?

नशीबवान आहेस असं वाटतं का ? का? का नाही ?

आई वडलांचं तुझ्यावर प्रेम आहे का दुसऱ्या भावंडावर ?

आपल्यापेक्षा हुषार मुलं आवडतात का?

आई वडलांना खूष करण्यासाठी काय करतेस ?

मित्राशी भांडणं होतात ? चूक कोणाची? भांडणं घरी सांगता का ?

हे आणि असे अनेक प्रश्न या यादीत आहेत. मात्र हे प्रश्न परीक्षा घेण्याच्या थाटात मुलाला मानसिक ताण देऊन, बरोबर की चूक उत्तर याचा बाऊ न करता विचारायचे. मुलांना त्यात गंमत वाटली पाहिजे.

खरं तर उत्तरं मुलं देतात आणि परीक्षा आपली होत असते. आपलं मूल कसं आहे हे आपल्याला कळत असतं. त्याच्या घडणीतला आपला वाटा कळत असतो.

मानसशास्त्रात ह्या प्रश्नावल्या देतात तेव्हा त्याच्या उत्तराची काही वर्गीकरणं असतात, त्यावरून त्याचे गुण मोजता येतात. त्यावरून माणसाच्या स्वभावाचं चित्र उभं राहतं. हे सगळं मुलाशी बोलताना करण्याची मला जरूर वाटली नाही; पण मुलांशी संवाद साधायला, त्यांना बोलकं करायला, त्यांना समजून घ्यायला ह्या प्रश्नावल्यांचा छान उपयोग होतो असा अनुभव आला आणि असंही वाटलं की, मानसशास्त्रज्ञांनी पन्नास प्रश्न आपल्याला दिले तरी आपल्या मुलाच्या संदर्भात आणखी पन्नास प्रश्न आपण शोधून काढू शकतो. त्याची उत्तरं आपल्याला समजून घ्यायला शिकलं पाहिजे. कारण त्यांचे संदर्भही आपल्याच घरात विखुरलेले असतात. □

---

## आपण पालक म्हणून कसे आहोत?



आपलं मूल आहे तरी कसं ? या प्रश्नाचा हात धरूनच आपण पालक म्हणून कसे आहोत ? हा प्रश्न पुढे येतो. कधी तरी स्वत:ला हे विचारायला हवं. आपल्या बालसंगोपनाबद्दलच्या, मुलांच्या वागण्यासंबंधीच्या कल्पना कशा तयार होत असतात ? आपल्या लहानपणाशी त्याचा कसा संबंध असतो सध्याच्या काळात त्या बदलण्याची कशी आवश्यकता असते यासाठी पालकांनी अंतर्मुख होऊन स्वत:चे अनुभव पाठवायला हवेत. कारण आज छोटे असताना जे मूल आपल्यावर अपार माया करतं आहे, आपल्या खांद्यावर विश्वासानं मान टाकतं आहे तेच उद्या आपला परीक्षक बनणार आहे. आपण त्याच्या दृष्टीनं कसे आहोत हे तो आपल्याला सांगणार आहे. त्यानं आपल्याला काही चांगलं सांगावं असं वाटत असेल तर आजच स्वत:ला विचारू या–आपण पालक म्हणून कसे आहोत ? याबद्दल पुढील लेखात...

श्याम मानव

# डॉ. इंगोलेंच्या-घरातली भानामती पळाली कशी?

श्याम मानव हे नागपुरातले पत्रकार. 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती' अशा नावानं ते आणि त्याचे काही मित्र यांनी एक संघटना स्थापन केली आहे. 'माणूस' मधून (२ जुलै ८३) नुकतीच त्यांच्या कामाची ओळख करून दिली होती. भानामतीच्या केसेस मानव स्वत: शोधून काढतात. त्याला शास्त्रीय आधार नाही हे सांगतात. त्यानी स्वत: पाहिलेली ही भानामतीची एक कथा.

वसंतनगरातील मेडिकल कॉलेजच्या एका शाखेचे प्रमुख डॉ. इंगोले ह्यांच्या घरी 'भानामतीचा प्रताप' सुरू झाल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचली. दौऱ्याहून नागपुरात परत येताच डॉ. इंगोलेंच्या घरच्या ह्या भानामतीला भेटण्याच ठरलं.

आम्ही अंधश्रद्धाविरोधी अभियानातले काही मित्र दोन ग्रुप्समध्ये पोचलो. सकाळी प्रा. सुधाकर जोशी आणि नागेश चौधरी पोचले. दोन तासानंतर मी आणि प्रा. अनिल ढगे जाऊन पोचलो.

डॉ. इंगोलेंशी चर्चा करताना, ह्या भानामती-प्रकाराची संपूर्ण माहिती गोळा करताना एक विस्मयकारक धक्का बसला. एका अनपेक्षित केसचे आपण साक्षीदार बनतो आहोत याची जाणीव झाली.

भानामतीच्या केसमध्ये सहसा असं कधी घडत नाही. ज्या घरात अशा केसेस घडतात त्या घरातली माणसं आपलं डोकं गमावून बसतात आणि भानामतीच्या तथाकथित भाकड कल्पनांना चटकन बळी पडतात. चागली चांगली, ह्या प्रकारावर आधी विश्वास नसलेली माणसं विश्वास ठेवू लागतात.

ह्या सगळ्या भानामती-प्रकाराचा छडा खरं म्हणजे डॉ. इंगोलेंनी स्वतःच लावलाय. ज्यांना भानामती-प्रकाराची नेमकी काहीच कल्पना नव्हती अशा व्यक्तीनं स्वत.च्या बुद्धीच्या वापरानं ह्या प्रकाराचा नेमका धागा पकडलाय् आणि त्यामुळं भानामतीचा प्रकार बंदही पडला! ह्यासाठीच ही सारी घटना तपशीलवार सांगणं आवश्यक वाटतं. कुणीही शाबूत डोक्याचा माणूस भानामती (ह्या क्षेत्राचं पुरेसं ज्ञान नसतानाही) शोधू शकेल अशी ही घटना आहे.

फक्त हा कौटुंबिक 'मामला' असल्यामुळं कौटुंबिक मन:शांती ढळवू शकणाऱ्या काही घटना आणि नावं मुद्दाम नमूद करायाचं टाळतोय.

२ मार्चला भानामती प्रथम डॉ. इंगोलेंच्या घरी प्रगटली. घराच्या बाहेर एका जागी ७ दगड दिसले. त्यातील ६ दगडावर हळद-कुंकू होतं. सासूबाईंना प्रथम हे दगड दिसल्यावर खळबळ माजली. शेजारच्यांना पहायला बोलावल्यावर टोपल्याखाली झाकून ठेवलेले हे दगड गायब झाले!

त्यानंतर दारात कुठे मीठ तर कुठे कणिक येऊन पडणं सुरू झालं. दाराजवळच्या पायरीवर साखर येऊन पडली.

४ मार्चला डॉ इंगोले घरी परतले, तेव्हा त्यांना दाराजवळच्या पायरीवर साखर पडलेली दिसली.

त्यावर ते गंमतीनं म्हणाले, 'आता आली तर कॉफी यायला हवी' अन् खरंच ४-५ मिनिटांनी कुणाचं लक्ष नसताना त्या स्थळी कॉफी येऊन पडली.

'आता दुधाचीच कमी आहे,' मी सहज बोलून गेलो. कारण भानामती-प्रकारात द्रव पदार्थ येत नाही असं मी ऐकून होतो-

डॉक्टरानी सांगितलं-

आणि थोड्याच वेळात दुधाची साय तेथे येऊन पडली.

घरातले ग्लास, लोणच्याची बरणी ह्याच पद्धतीनं बाहेर जायची. अर्थात हे प्रत्यक्ष जाताना कुणीच पाहिलेलं नसायचं.

### भानामती का थांबली?

खरं म्हणजे ह्यामागे कुणी तरी माण्स आहे हे डॉक्टरांना वाटल्यावर आणि त्यांनी असे तज्ज्ञ बोलावल्यावरच हा प्रकार थांबला. कारण संबंधित व्यक्तीला कळून चुकलं होतं की केव्हाही आपण आता पकडल्या जाऊ शकतो.

आणि असा मनस्ताप देणारे आपण आहोत हे सगळ्या घरच्यांना कळल्यावर काय होईल त्या भीतीपोटीच हा सारा प्रकार थांबला आणि नेहमी असाच थांबतो.

ही बरणी कुठून आली असं विचारल्यावर 'आत्ता आत्ता घरात बरणी होती, इथून तिथं गेली' असं सासूबाईंनी डॉक्टरसाहेबाना सांगितलं. गंजही असाच जाऊन पडला.

दुसऱ्या दिवशी म्हणजे ५ तारखेला सकाळी 'धावा धावा आग लागली' असं सासूबाई ओरडल्या. प्रत्यक्ष दोन रजया पेटत होत्या त्या विझवल्या.

थोड्या वेळानं टांगलेली पँट जळली. घडवंचीवरील गाद्या-रजयाना आग लागली. सगळे आगीचे प्रकार सुरू झाल्यावर मात्र मी हबकून गेलो. आतापर्यंत हा सारा प्रकार मी गमतीनं घेत होतो. मी गंभीर झालो. टोळशास्त्री नावाच्या मांत्रिकाकडे जायला निघालो. मांत्रिकाकडे जाताना पोलिसाना हा प्रकार सागण्यासाठी म्हणून बर्डी-पोलीस-ठाण्यात गेलो. तेव्हा जबाबदार अधिकारी म्हणाले की, 'वो तो भानामती है। हम क्या कर सकते है? किसी अच्छे मांत्रिक की ओर जाव!'

शेवटी मी मांत्रिकाकडे गेलो. त्यांनी मंत्रवून दिलेला धागा दुपारी १२ वाजता बांधला. त्यानी सांगितलं तसं केलं; पण भानामतीचे प्रकार सुरूच राहिले. डॉक्टरानी सविस्तर सांगितलं.

दुपारी पुन्हा कपडे पेटल्यावर मात्र डॉक्टरानी घरातले सगळे पेटण्यासारखे कपडे गोळा केले आणि समोर दिवाणखान्यात कपड्याचा गठ्ठा बांधून ठेवला. प्रत्येक खोलीत एक एक बकेट पाणी ठेवलं आणि एक एक माणूस बसवून ठेवला.

अर्थात ह्यामुळं जळण्याचे प्रकार बंद झाले.

कुणी समोर असताना एकही प्रकार घडत नाही, एवढं मात्र डॉक्टरांच्या आतापर्यंतच्या अनुभवावरून लक्षात आलं होतं.

पुन्हा ३-४ च्या दरम्यान कुंकू, हळद, कणिक दारात येऊन पडली. त्या वेळी डॉक्टरांनी मुद्दाम कणकेचा डबा शोधला. त्यात तीन बोटं दिसली आणि एकदम डॉक्टरसाहेबांचं डोकं विचार करू लागलं.

आतापर्यंत हे सारे प्रकार एखाद्या अमानवी शक्तीचे असावेत असं त्यांनाही वाटायला लागलं होतं; पण तीन बोटं दिसताच मात्र त्याच्या विचाराचा सांधा वेगळ्याच दिशेनं लागला.

हे सारे प्रकार कुणी तरी माणूसच करत असला पाहिजे. हे काम मानवी शक्तीचंच

मग डॉक्टरानी पोलीसकमिशनर श्री. व्यकटाचलम् ह्याना फोन केला. काही फिंगर प्रिंटतज्ज्ञाना पाठवण्याची विनंती केली.

एक ग्लास बाहेर आला होता. त्यावरचे बोटांचे ठसे तपासले असते तर नक्की व्यक्ती मिळाली असती.

पण ग्लास येण्याच्या आतच तो ग्लास इतर ग्लासामध्ये जाऊन मिसळला.

हे घडण्याआधीच डॉक्टर घरात मोठ्यानं म्हणाले होते की, तज्ज्ञ येण्याच्या आत हा ग्लास एक तर गायब तरी होईल अथवा त्यावरचे ठसे तरी पुसले जातील.

आणि झालही तसेच.

ठसेज्तज्ञ आले. ' अहो साहेब, भूताचे ठसे सापडत नसतात. त्यांची आणि माणसाची बोटं सारखी असली तरी भुताच्या बोटांतून माणसासारखा द्रव बाहेर पडत नसल्यामुळं भुताचे ठसेच उमटत नाहीत. म्हणून काहीच मिळणार नाही ' असं साऱ्यांनी बोलणं सुरू केलं. तरी डॉक्टरानी आग्रह केल्यामुळं त्यानी ठसे तपासले; पण अर्थात ठसे सापडलेच नाहीत.

एव्हाना डॉक्टरांची खात्रीच झाली होती की, हा सारा प्रकार कुणी तरी माणूसच करतय. त्यानी घरातल्या एका व्यक्तीला दुरून नजर ठेवायला सांगितली त्याला एक व्यक्ती काही तरी वस्तू ठेवताना दिसली. झाल व्यक्ती सापडली. तिला घरातून हलवण्याचा निर्णय घेण्यात आला आणि भानामतीचे सारे प्रकार बंदच झाले.

चर्चेच्या शेवटी डॉक्टर विश्वासानं म्हणाले की,'कुठेही भानामतीचा प्रकार घडत असला तर मला सांगा. मी अवघ्या दोन तासात भानामती बंद करतो !'

खरं म्हणजे आदल्या दिवशी मांत्रिकाकडे स्वत हून जाणाऱ्या व्यक्तीत कुठलीही भानामती शोधण्याचं आव्हान पेलण्याइतपत स्वतःच्या शोधप्रक्रियेतूनच आत्मविश्वास निर्माण व्हावा ही गोष्टच अत्यंत महत्त्वाची आहे.

आज डॉ इंगोलेच्या घरची भानामती थांबलीय. त्यानी स्वतःच थांबवलीय; पण घरात मांत्रिक येणं सुरूच आहे. कारण घरच्याना तो प्रकार अतिमानवी शक्तीचाच वाटतोय.

पण पुन्हा ही भानामती सुरू झाली तर ? कारण माझ्या अन् प्रा.अनिल ठुगेच्या तपासप्रक्रियेचे निष्कर्ष वेगळे होते.

आधीचा स्वत चा माझा अनुभव, डॉ. अब्राहम कोवुरांसारख्या तज्ज्ञाचे लिखित अनुभव आणि डॉ इंगोलेंसारखं कौटुंबिक इनव्हॉल्व्हमेंट ( ह्या प्रकारात) नसल्यामुळं आम्ही जास्त तटस्थपणे पाहू शकलो.

मी दीड महिन्याच्या दौऱ्यावर नागपूरबाहेर जाणार आहे. ह्या काळात पुन्हा भानामती सुरू झाली तर खूपच गोंधळ माजला असता. स्वत: डॉक्टर इंगोलेही हादरले असते.

म्हणून एक अत्यंत अप्रिय गोष्ट करावी लागली. त्याच्याशी एकट्यानं दीर्घ वार्तालाप करून विविध शक्यता आणि आमचा निष्कर्ष समोर ठेवावा लागला.

आता डॉक्टर इंगोले पुरेसे तटस्थ झालेत. भानामतीचा प्रकार पुन्हा सुरू झाला तर ते स्वतःच नेमकी व्यक्ती शोधू शकतात. कारण व्यक्ती शोधण्याची नेमकी प्रक्रिया त्याना गवसली आहे.

आता प्रश्न आहे घरच्यांचाच. त्यांचा विश्वास कसा काढायचा ? त्याच्यासमोर सत्य कसं मांडायचं ? घरातले मांत्रिक कसे बद करायचे ? भानामती म्हणजे नेमकं काय असतं हे मी सोदाहरण समजावून सांगण्याची तयारी डॉ इंगोलेच्या घरीच दर्शवली होती; पण घरचे लोक एवढे भडकले होते की ते बोलायलाच तयार नव्हते !

डॉक्टर इंगोलेंना अब्राहम कोवुरांचं 'बिगॉन गॉडमेन' 'गॉडस्, डेमनस् ॲन्ड डेव्हिल्स ही दोन पुस्तकं वाचून ती घरच्या सुशिक्षित माणसांना वाचायला द्या असा आग्रह करणं एवढंच माझ्या हातात होतं. तेवढंच मी केलं. बस्स ! □

## भानामती कशी थांबते ?

भानामतीच्या नावाखाली कुणी तरी घरातली व्यक्ती हे सारे प्रकार करीत असते.

मानवीशक्तीशिवाय कपडे जळणं वा वस्तू हलणं शक्य नाही एवढं लक्षात ठेवलं की भानामतीची व्यक्ती लवकर शोधता येते.

१) सगळे प्रसंग, घटना घडताना नेमकी कोणती व्यक्ती हजर होती.

२) दरवेळी वा जास्तीत जास्त प्रसग कुणी पाहून बोंब ठोकली.

३) सगळ्या व्यक्तींच्या मुलाखतीतून वरील दोन गोष्टीशी जास्तीत जास्त संबंधित असणारी व्यक्तीच भानामती करीत असते.

अर्थात त्यासाठी खूपच काळजीपूर्वक एक एक व्यक्ती गळत गळत जाऊन शेवटची व्यक्ती निर्विवादपणे उरल्यावरच तशी खात्री करून घ्यावी.

त्या व्यक्तीला विश्वासात घेऊन 'तू हे सारं करतेस मला माहीत आहे. हयापुढे थांबव अन्यथा घरच्याना सांगीन–' एवढ सांगितल्यावर ती व्यक्ती जर हे सारे प्रकार कॉन्शस लेव्हलवर करीत असेल तर थांबते. पुन्हा असे प्रकार करीत नाही.

पण सबकॉन्शस लेव्हलवर जर असे प्रकार ती करत असेल तर मात्र ह्या साध्या सांगण्यानं ती थांबत नाही. त्यासाठी तिला हिप्नॉसिसखाली घेऊन तशी 'हिप्नॉटिक सजेशन' द्यावी लागते. त्यानंतर मात्र हे प्रकार थांबतात.

भानामतीच्या नावाखाली एखादी व्यक्तीच हे सारे प्रकार करीत असते हे निर्विवादपणे किमान तीन हजार केसेस तपासल्यानतर सिद्ध झालेय. ¤

## मांत्रिक थांबवू शकतो का ?

खरं म्हणजे मांत्रिक एक तर ढोंगी वा मुळातच अंधश्रद्ध असल्यामुळे तो भानामती थांबवूच शकत नाही कारण व्यक्तिशोधप्रक्रिया त्याच्या खिजगणतीतही नसते.


फक्त जर भानामतीचा प्रयोग करणारी व्यक्ती स्वतःच अतिशय अंधश्रद्ध असली आणि मांत्रिकाच्या तथाकथित मंत्रशक्तीला घाबरणारी असली तरच ती कधीकधी मांत्रिकाच्या प्रयोगानंतर थांबते;

पण बहुधा मांत्रिक हा भानामती–दोष दुसऱ्यावर ढकलतात. त्यामुळं त्या व्यक्तीला रान मोकळं मिळून दुसऱ्यावर दोष ढकलता येऊन बिनबोभाट हे प्रकार चालू ठेवता येतात.

मांत्रिकाच्या नादी लागल्यानं हे प्रकार बऱ्याचदा वाढल्याचं त्यामुळेच आढळतं. डॉ. इंगोलेंच्या केसमधे म्हणूनच सारे मांत्रिक वा देव्या ( एका कुलकर्णी नावाच्या बाईच्या अंगात देवी येतेय. त्याच्याकडेही ते गेले होते. ) अपयशी ठरल्या असत्या कारण त्या प्रकारातली व्यक्ती देवी वा मांत्रिकाला घाबरणारी नव्हती.

खरं म्हणजे मंत्रशक्तीनं भानामती थांबवण्याचा आव आणणारे सारे एक तर ढोंगी तरी असतात नाही तर सायकिक पेशंट तरी असतात वा अंधश्रद्धेचे बळी असतात. ¤

# अमिताभ, काय बरं बिनसलं ?



एक अमिताभ बच्चन !
लाखो हृदयांची धडकन...
कोटचवधी प्रेक्षकांची जान...
आपण त्याचे चाहते.
म्हणूनच त्याचा प्रत्येक चित्रपट अगदी आवर्जून बघतो.
त्याच्या अभिनयाची, संवादफेकीची, भरदार आवाजाची
तोंड फाटेपर्यंत स्तुती करतो.
चघळायला एक चित्रपट बरेच दिवस पुरतो.
तोपर्यंत त्याचा दुसरा येतोच
आणि स्तुती, कौतुकाचं चक्र चालूच राहातं;
पण हळूहळू कुठे तरी, काय तरी बिनसायला लागलं.
अमिताभचा चित्रपट पाहूनही
अबोलपणे बाहेर पडू लागलो.
एवढंच नाही तर
अमिताभच्या चित्रपटांची उत्कंठेनं वाट बघणं,
फर्स्ट डे फर्स्ट शोसाठी जिवाचा आटापिटा करणं—
वगैरे वगैरे कमी व्हायला लागलं.
'पाहू या सावकाश—घाई काय एवढी ?'
असे विचार मनात यायला लागले.
त्या वेळेसच स्पष्टपणे जाणवलं की,
अमिताभ आणि आपल्यामध्ये
दरी निर्माण होते आहे.
कारण ?
त्याच्यातून हरवून गेलेला बाबू मोशाय ?
त्याच्या अभिनयाला पडलेली चौकट ?
त्याचा पडद्यावरचा तोच तो अंगार ओकणं?
की ऊठसूट सूडाची भाषा बोलत मारामाऱ्या करणं ?
एके काळी अंगाला वस्त्र आणि पोटाला अन्न
देणाऱ्या नोकरीवर लाथ मारून
बाहेर पडलेल्या अमिताभच्या
अभिनय—कारकीर्दीची इतिश्री
'अँग्री यंग मॅन' या जनमानसात रुळलेल्या
प्रतिमेशीच होणार होती का ?
निश्चितच नाही.
निदानपक्षी अमिताभला तसं अभिप्रेत नसावं.
त्यामुळंच वाटतं की—
रुळलेल्या प्रतिमेचा अमिताभला एवढा हव्यास का ?
मध्यंतरी अपघाताच्या वेळेस मिळालेल्या
विश्रांतीच्या काळात
आपण आत्मपरीक्षण केल्याचं
त्यानं आवर्जून सांगितलं.
पुन्हा पुन्हा सांगितलं.
त्या वेळेस आशेचा एक किरण चमकला.
वाटलं—अमिताभच्या अभिनयाला लागलेलं
ग्रहण आता सुटणार !
पण हे वाटणं वाटणंच राहणार बहुतेक.
कारण शेवटी अमिताभलाही
इमेजचा मोह सुटला नाहीय.
हा मोह कशासाठी ?
**पैशासाठी !**
— तो तर त्यानं चिक्कार मिळवलाय.
चित्रपटसृष्टीत सर्वांत जास्त रेट त्याचा आहे.
**कलेची जपणूक ?**
— हा हेतू प्रामाणिकपणे मनात धरणारा
एका विशिष्ट प्रतिमेशी अडून राहणारच नाही.
**मानसिक समाधान ?**
— इमेजच्या खोडचात अडकून पडल्याचं दुःख
कधी—मधी त्याच्या बोलण्यात उमटतच आहे.
**कीर्ती ?**
— तिनं तर त्याच्या पायावर लोळण घेतलीय.
त्याच्याइतका पाठिंबा आजतागायत कुणालाच
इतक्या मोठ्या प्रमाणावर
आणि इतक्या प्रदीर्घ कालावधीपर्यंत
मिळालेला नाहीय.
**मग चित्रपटसृष्टीत पाय रोवून उभं राहण्यासाठी ?**
— तो उमेदवारीचा काळ
अमिताभने केव्हाच पार केलाय.
म्हणजे यातलं कुठलंच कारण नाही.
मग साहजिकच मनात येतं
अमिताभनं आपल्या करियरचा गंभीरपणे
विचार करण्याची वेळ आली आहे का ?
अमिताभच्या बाबू मोशायची
अजून सगळ्यांना तितकीच ओढ आहे.
तरीही अमिताभचा या भूमिकांवर बहिष्कार का ?
तशा त्यानं 'अँग्री यंग मॅन' इमेजच्या काळातही
भावुक भूमिका केल्या.
नाही असं नाही.
पण ते चित्रपट पडले.
म्हणजे असा हळुवार अमिताभ
प्रेक्षकांना तितकासा भावला नाही, म्हणून
अमिताभनं त्यांच्याकडे पाठ फिरवली म्हणे.
तिथूनच अमिताभचा
क्रुद्ध युवकाच्या चौकटीतला
अभिनयाचा एकांगी प्रवास सुरू झाला;
पण मुळात अमिताभच्या भावुक भूमिका का पडल्या ?
'अँग्री यंग मॅन'च्या वाढत्या प्रस्थामुळेच ना ?

त्यात एक प्रकारचा यांत्रिकपणा आला.
आज अमिताभला 'स्टार' ही उपाधी
लावताना काहीच वाटत नाही; पण
'अॅक्टर' म्हणताना क्षणभर अडखळल्या-
सारखं होतं.
हा दोष कुणाचा ?
कदाचित त्या वेळेस,
चित्रपटसृष्टीतील उमेदवारीच्या काळात
टक्के-टोणपे खाल्ल्यानंतर अमिताभलाही
या बेफाम यशाचं कौतुक वाटलं असेल.
'अँग्री यंग मॅन' इमेजची आगळी-वेगळी
भूल पडली असेल.
त्यामुळे त्या वयाला, त्या काळाला अनुसरूनच
तो वागला असं म्हणायला लागेल
किंवा जे भल्याभल्यांना टाळू टाळू म्हणूनही
टाळता आलं नाही–
ते अमिताभलाही टाळता आलं नाही.
पण तेव्हा ते टाळता आलं नाही
ते आताही टाळता येऊ नये–
अशी परिस्थिती मुळीच नाही.
त्या वयात, त्या काळात
अमिताभनं असा विचार केला असेल तर,
त्यात गैर काहीच नाही.
पण आज या काळात, या वयात
अमिताभनं तोच विचार कायम ठेवणं
म्हणजे एक प्रकारे अभिनयाची हार
पत्करणंच !
कारण शेवटी एका कलाकारानं
आपल्या अभिनयाला अशा प्रकारच्या
मर्यादा घालणं केव्हाही सयुक्तिक नाही.
तसंच कुठल्याही इमेजशिवाय चित्रपटसृष्टीत
यशस्वी होता येतं,
असं संजीवकुमारचं ढळढळीत उदाहरण
डोळ्यासमोर असताना
अमिताभसारख्यानं इमेजचा बाऊ का करावा?
त्यातून इमेजचं हे बुजगावणं किती दिवस
पुरेल ?
अशी एक अवसानघातकी शंका आहेच.
कारण अमिताभच्या आधी
राजेश खन्नाचा काळ होता रोमँटिक
इमेजचा !
त्याच ते मान वाकडी करत बोलणं,
मिचमिच्या, मिष्किल नजरेनं बघणं–
त्याच्या अदाकारीवर प्रेक्षकवर्ग जाम खूश
होता.
पोरीबाळी त्याचीच स्वप्नं बघत होत्या;
पण त्याच्यातही शेवटी एकसुरीपणा आला.
त्यातूनही महत्त्वाचं म्हणजे तो काळ !
महागाई, भ्रष्टाचार, बेकारीला ऊत आलेला.

नुसतं प्रेमाचं स्वप्नरंजन
कुणाच्या गळी उतरणार ?
त्यामुळं अन्यायानं भडकून उठणारा नायक
ही अमिताभची प्रतिमा जनमानसाच्या
प्रतिमेशी तंतोतंत जुळली
आणि अमिताभच्या चित्रपटांचं स्वरूप
हे फक्त स्वप्नाचं न राहता
त्याला वास्तवतेची जोड मिळाली.
समाजमनाचं नातं या प्रतिमेशी साधलं गेलं
आणि प्रेक्षक अमिताभच्या मागं लागले.
सुपरस्टार राजेश खन्ना होत्याचा नव्हता
झाला.
अमिताभ–युगाचा प्रारंभ झाला.
राजेश खन्नाच्या रोमँटिक इमेजचा
कंटाळा येण्याचं कारण
स्टायलायसेशन हे जितकं होतं
तितकंच त्यात जाणवणारा नकलीपणा,
वेगडीपणा
हेही होतं.
अमिताभच्या प्रचलित क्रुद्ध युवकाच्या
प्रतिमेतही
हा दोष आहेच.
त्याच्या अन्यायाचा प्रतिकार उमटतो
तो भन्नाट मारामारीतून.
हे करणं सामान्य जीवनात शक्य नाही.
मारामारी तर दूरच; पण
अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची-
तोही एकट्यानं–
शक्यता किती कमी, हे प्रत्येक सामान्य
माणूस
आपल्या मनाशी पक्कं जाणून आहे.
त्यामुळं 'अँग्री यंग मॅन' इमेजचा बुरखाहा
प्रेक्षकांना नवीन काही मिळालं तर
फाडायला वेळ लागणार नाही.'
'प्रेक्षकाना जोपर्यंत चालतंय तोपर्यंत या
भूमिका करणार'
हं अमिताभचं विधान जबरदस्त गोंधळात
पाडणारं !
नसत्या शंका-कुशंका मनात निर्माण करणारं.
याचा अर्थ प्रेक्षकानी स्वतःहून पाठ
फिरवेपर्यंत
अमिताभ इमेजचं गंध उगाळीत राहणार
का ?
आणि प्रेक्षक पाठ फिरवणारच नाहीत–
असं अमिताभचं म्हणणं असेलच तर
ते फार धाडसाचं होईल!
कारण इथं अशी खात्री देता येणं अशक्यच.

एके काळी इथं दिलीपकुमारचा
कोण वचक होता!
किती उदो उदो होत होता!
कदाचित आज अमिताभ भोगतोय
ते ते सर्व त्या काळात दिलीपकुमार भोगत
होता;
पण असं असूनही
दिलीपकुमारचा हटवादीपणा पाहून
शेवटी प्रेक्षकांनी पाठ फिरवलीच!
त्यामुळंच अमिताभनं आता वेळेवारीच
यशाच्या शिखरावर असतानाच
मानानं या प्रतिमेचा निरोप घेतला तर ?
कारण आम्ही ज्याच्या अभिनयावर
मनापासून प्रेम केलं–
त्या अमिताभकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवावी
हे कसं पटावं–सहन व्हावं ?
आणि अमिताभनं 'अँग्री यंग मॅन' इमेजचा
निरोप घ्यावा याचा अर्थ त्यानं
चित्रपटसृष्टीचाच निरोप घ्यावा
असा हेतू मुळीच नाही.
असा हेतू मनात बाळगण्याचं
आणि त्यातूनही कडी म्हणजे
तो कागदावर उतरवण्याचं
औधत्य आम्ही निश्चितच करणार नाही.
फक्त राहून राहून एकच वाटतं
'शक्ती', 'नास्तिक', 'खुद्दार' वगैरे
त्याच्या चित्रपटांना लागलेली ओहोटी–
हे कशाचं लक्षण ?
नुकताच त्याचा 'महान' लागलाय.
त्याची तिहेरी भूमिका.
पुन्हा एकदा मन भूतकाळात जातं
आणि आठवतो दिलीपकुमारचा 'बैराग !'
अशीच दिलीपकुमारची तिहेरी भूमिका
असलेला;
पण सबकुछ दिलीपकुमार असलेला
हा चित्रपट पडला !
त्या सुमारासच दिलीपकुमारनं पडद्याकडे
पाठ फिरवली,
मग उगाचच मनात यायला लागतं–
आता पुढं ?
फक्त इतिहासाची पुनरावृत्तीच !
मनाच्या या कासावीस अवस्थेतच
कागदावर शब्द उमटायला लागतात
एक अमिताभ बच्चन !
लाखो हृदयांची धडकन...

–शुभदा रानडे